CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २१३ | पाने १६+८ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपण चोवीस तास स्वयंसेवक आहोत. आपल्या दैनंदिन जीवनात हे सूत्र कसे प्रकट होईल? याचा विचार करताना चार पैलू ध्यानात येतात. व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक आणि सामाजिक असे हे चार पैलू आहेत.

**- स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा वापर केल्यास लावणार 'मकोका'

**| मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती**
**| बालगुन्हेगारांची वयोमर्यादा १६ वर्षे करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवणार**



पावसाळी अधिवेशन



**मुंबई, ३० जून**

**स्वतःच्या फायद्यासाठी लहान बालकांचा गुन्हेगारी टोळ्यांमध्ये किंवा अमली पदार्थांच्या तस्करीसाठी वापर करणाऱ्या मुख्य सूत्रधारांवर आणि संघटित गुन्हेगारीत सहभागी असलेल्या व्यक्तींवर थेट 'मकोका'सारखी संघटित गुन्हेगारीविषयक कठोर कलमे लावण्यात येतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत केली. तर, बालगुन्हेगारांसाठीची सध्याची १८ वर्षांची वयोमर्यादा कमी करून ती १६ वर्षे करण्याबाबतचा अधिकृत प्रस्ताव महाराष्ट्र सरकार लवकरच केंद्र शासनाकडे पाठवणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.**

जालना जिल्ह्यातील अल्पवयीन मुलांच्या वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीबाबत आमदार अर्जुन खोतकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विचारलेल्या उपप्रश्नाच्या चर्चेत भाग घेताना मुख्यमंत्र्यांनी ही मोठी घोषणा केली. विधिसंघर्षित बालकांना थेट अटक न करता बालगृहात ठेवण्याच्या कायदेशीर तरतुदींचा गैरफायदा काही सराईत गुन्हेगार घेत असून, मुलांचा वापर करून गंभीर गुन्हे घडवून आणत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

या संदर्भातील एका विशिष्ट घटनेचा दाखला देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, लातूर येथे घडलेली घटना ही कौटुंबिक वादातून झालेली वैयक्तिक स्वरूपाची घटना आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस करत असून, गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झालेल्या विधिसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. मात्र, सध्या १६ वर्षांखालील मुलांकडूनही अनेक गंभीर गुन्हे घडत असल्याचे समोर येत आहे. या पृष्ठभूमीवर बालगुन्हेगारीच्या वाढत्या प्रवृत्तीचे संपूर्ण वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी राज्य सरकारतर्फे एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात येणार आहे.

सभागृहात विचारण्यात आलेल्या एका उपप्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी या संदर्भात राज्य सरकारकडून राबवल्या जाणार्या प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजनांची माहिती दिली. बालगुन्हेगारीला सुरुवातीलाच आळा घालण्यासाठी पोलिसांच्या वतीने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांसाठी नियमितपणे जनजागृती मोहीम राबवली जात आहे. यामध्ये सायबर सुरक्षा, समुपदेशन आणि व्यसनमुक्तीबाबत विद्यार्थ्यांना तज्ज्ञांमार्फत विशेष मार्गदर्शन केले जाते. याशिवाय, ज्या भागांमध्ये अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता जास्त असते, त्या संवेदनशील आणि धोकादायक परिसरांमध्ये पोलिसांकडून नियमित गस्त घालून प्रतिबंधात्मक कारवाया तीव्र करण्यात आल्या आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

### 'एल निनो' जलसंधारणासाठी इष्टापत्ती

यंदाच्या पावसाळ्यात 'एल निनो'च्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या टंचाईवर मात करण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. एल निनोचे हे संभाव्य संकट जलसंधारणासाठी इष्टापत्ती मानून, राज्यात कमी कालावधीत पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. विशेषतः राज्यातील नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने धडक कार्यक्रम राबविण्यावर त्यांनी भर दिला आहे. विधान भवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित एका उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

# व्याप्त काश्मीर झाले मुक्त!

**आंदोलकांची घोषणा; भारताची सीमा खुली करणार, लष्कराला हुसकावून लावणार**



रावलकोट येथील ईदगाह मैदानावर पाकिस्तानी सरकारच्या दडपशाही विरोधात आंदोलन करणारे नागरिक

**रावलकोट, ३० जून**

पाकिस्तानी सरकार आणि लष्कराच्या बेबंदशाहीविरोधात व्याप्त काश्मीरचे लोक एकवटले आहे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रोखून नागरिकांना वेठीस धरणाऱ्या पाकिस्तानी सरकारच्या जोखडातून आम्ही मुक्त झालो आहोत. व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानचा आता काहीही संबंध राहिलेला नाही, अशी घोषणा मंगळवारी आंदोलनाचे नेतृत्व करणारे जम्मू आणि काश्मीर आवामी ॲक्शन कमिटीचे (जेएएसी) नेते सरदार अमन खान यांनी केली. त्यांच्या घोषणेनंतर रावलकोट येथील ईदगाह मैदानावर जमलेल्या लाखो आंदोलकांनी जल्लोष केला.

व्याप्त काश्मिरात पाकिस्तानी सरकारच्या दडपशाहीविरोधात गेल्या २२ दिवसांपासून ठिकठिकाणी निदर्शने सुरू आहेत. रावलकोट येथील ईदगाह मैदानावर दीड लाखांपेक्षा अधिक लोक जमलेले असून, त्यांनी जेएएसीच्या नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. ईदगाह मैदानात आंदोलकांना संबोधित करताना अमन खान यांनी उघडपणे जाहीर केले की, व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानचा काहीही संबंध राहिला नाही, हा प्रदेश पाकिस्तानचा भाग नाही. आम्ही पाकिस्तानी सुरक्षा दलाला हुसकावून लावून भारताची सीमा खुली करणार आहे. आता या प्रदेशाचे निर्णय आम्हीच घेणार असून, पाकिस्तानपासून मुक्त होण्यासाठी सर्व नागरिकांचा आम्हाला पूर्ण पाठिंबा मिळाला. पाकिस्तानी लष्कराने आमचा अन्नपुरवठा रोखला, त्यामुळेच आम्हाला हा निर्णय घ्याला लागला. व्याप्त काश्मीरातील लोक हुकूमशहाला (शहबाज शरीफ आणि आसिम मुनीर) सहन करणार नाही. भारताच्या पाठिंब्याने आम्ही लोकशाही सरकार स्थापन करणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. ◂ (वृत्तसंस्था)

### नागरिकांवर उपासमारीची वेळ

गेल्या १५ दिवसांपासून त्यांनी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रोखल्याने नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. रुग्णालयात उपचारासाठी औषधी नाही, जेवणासाठी अन्न नाही. पाकिस्तानी सरकार व्याप्त काश्मीरच्या लोकांना सामूहिक मृत्यूदंडाची शिक्षा देण्याच्या प्रयत्नात आहे. परिस्थिती कायम राहिल्यास लोकांना प्राण वाचवण्यासाठी पर्यायी मार्ग शोधावे लागतील.

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात पुन्हा घसरण

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात मंगळवारी प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले. जून महिन्याच्या डेरिव्हेटिव्ह्ज एक्सपायरीच्या दिवशी फार्मा, रियल्टी आणि कन्झ्युमर ड्युरेबल क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रांमध्ये झालेल्या चौफेर विक्रीमुळे दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. राष्ट्रीय शेअर बाजाराचा 'निफ्टी' २३,९०० अंकांच्या खाली स्थिरावला. मंगळवारी सकाळी बाजाराची सुरुवात तेजीसह झाली होती, मात्र पहिल्याच तासात ही तेजी मावळली. त्यानंतर दिवसभर बाजार चढ-उतारांच्या हिंदोळ्यावर राहिला. बाजाराच्या शेवटच्या तासात विक्रीचा दबाव प्रचंड वाढला, ज्यामुळे निफ्टी २३,८२९.२० या सत्रातील नीचांकी पातळीवर पोहोचला.

### 'टीईटी' सूत्रधाराच्या पत्नीला अटक

**ठाणे :** टीईटी पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ताची पत्नी सुमन कुमारीला पाटण्यातून अटक केली. पोलिस पेपरफुटी प्रकरणाात तिच्या भूमिकेचा तपास करत आहेत. बिजेंद्र गुप्ता हा बिहारमधील समस्तीपूरचा रहिवासी आहे. त्याला अटक करण्यासाठी भिवंडी पोलिस दिल्ली, हरयाणा, आग्रा आणि बिहारमध्ये छापे टाकत आहेत. भिवंडी पोलिसांनुसार, सुमन कुमारीला बिहारमधील पाटणा येथे अटक करण्यात आली आहे. टीईटी पेपरफुटीमध्ये पैशांच्या हस्तांतरणाची माहिती सुमन कुमारीला देण्यात आली होती. प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर सुमन, पती बिजेंद्र गुप्ता आणि या प्रकरणातील नेटवर्कच्या सदस्यांच्या संपर्कात होती.

# आजपासून 'एचएसआरपी' प्लेट नसल्यास कारवाई

**मुंबई, ३० जून**

राज्यामध्ये जुन्या वाहनांवर अतिसुरक्षित नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी शासनाने आतापर्यंत तब्बल पाच वेळा मुदतवाढ दिली. मात्र, या सवलतीचा गैरफायदा घेत ज्या वाहनधारकांनी अद्यापही या नियमाकडे पाठ फिरवली आहे, त्यांच्यावर आजपासून कठोर कारवाईची कुऱ्हाड कोसळणार आहे. परिवहन विभागाने यासंदर्भात अत्यंत कडक पावले उचलली असून, राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवून दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

नागरिकांची आणि वाहनांची सुरक्षा ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. वाहनधारकांची गैरसोय होऊ नये आणि त्यांना पुरेसा वेळ मिळावा, यासाठी प्रशासनाने आतापर्यंत तब्बल पाच वेळा मुदतवाढ दिली. मात्र, पुरेशी संधी आणि वेळ देऊनही ज्यांनी अद्याप आपल्या वाहनांवर अतिसुरक्षित नंबर प्लेट बसवलेली नाही, त्यांच्यावर आजपासून राज्यभरात कोणतीही गय न करता कठोर कारवाई केली जाईल. ◂ (तभा वृत्तसेवा)

# देशांतर्गत अर्थव्यवस्था लवचीक

**भारतीय रिझर्व्ह बँकेचा अहवाल**



**मुंबई, ३० जून**

बँकिंग आणि गैर-बँकिंग क्षेत्रातील भक्कम ताळेबंदाच्या आधारावर देशांतर्गत वित्तीय व्यवस्था लवचीक राहिली आहे, असे भारतीय रिझर्व्ह बँकेने मंगळवारी जारी केलेल्या वित्तीय स्थिरता अहवालात (एफएसआर) म्हटले आहे.

मजबूत भांडवल व तरलता साठा (लिक्विडिटी बफर), मालमत्तेच्या गुणवत्तेत होणारी निरंतर सुधारणा आणि स्थिर नफाक्षमता यांच्या आधारे अनुसूचित व्यावसायिक बँका (एससीबी) सुरक्षित आणि सुस्थितीत आहेत. संभाव्य धक्के पेलण्यासाठी बँकिंग प्रणाली सक्षम स्थितीत आहे, असे आर्थिक तणाव चाचणीत दिसून आले. प्रतिकूल परिस्थितीतही एकूण भांडवल गुणोत्तरे नियामक निकषांच्या तुलनेत सुरक्षित पातळीवर राहण्याचा अंदाज आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

भक्कम भांडवली आधार, समाधानकारक नफाक्षमता आणि सुधारत असलेली मालमत्तेची गुणवत्ता यांच्या जोरावर गैर-बँकिंग वित्तीय कंपन्याही आर्थिकदृष्ट्या सक्षम राहिल्या आहेत. मात्र, नजिकच्या काळात 'एआय' आधारित सायबर हल्ले सर्वांत महत्त्वाचे आव्हान राहणार आहे, असे अहवालात म्हटले आहे.

सततचे संघर्ष आणि पुरवठा साखळीतील अखंडित व्यत्यय असूनही जागतिक अर्थव्यवस्था लवचीक राहिली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे उत्पादकतेत संभाव्य वाढ होण्याबाबतच्या आशावादाचा याला काही प्रमाणात आधार मिळाला आहे, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी नमूद केले. ◂ (वृत्तसंस्था)




बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी मंगळवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. बिहारमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांवर यावेळी चर्चा झाली. बिहारचे सार्वजनिक बांधकाम मंत्री कुमार शैलेंद्र उपस्थित होते

### ५४ कोटींचे सोने जप्त; तस्कराला अटक

**गुवाहाटी, ३० जून**

आसाममधील गुवाहाटी पोलिसांनी एका कारवाईत सुमारे ३८ किलोग्रॅम सोने जप्त केले आहे. या सोन्याची बाजारातील किंमत अंदाजे ५४ कोटी रुपये आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका व्यक्तीला अटक केली आहे. गत काही वर्षांतील गुवाहाटीमधील ही सर्वात मोठी सोन्याची जप्ती असल्याचे मानले जात आहे. पोलिसांनुसार, गुप्त माहितीच्या आधारे लताशील पोलिस ठाण्याच्या पथकाने खरघुली परिसरात एक विशेष मोहीम राबवली. ◂ (वृत्तसंस्था)

# जुलैमध्येही सरासरीपेक्षा कमी

**नवी दिल्ली, ३० जून**

पावसाची मासिक सरासरी जुलै महिन्यातही सामान्यपेक्षा कमीच राहील, असा चिंता वाढवणारा मासिक अंदाज भारतीय हवामान विभागाने मंगळवारी वर्तवला. जुलै महिन्यात दीर्घकालीन सरासरीच्या (१९७१-२०२०) ९४ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतात जुलैमध्ये दीर्घकालीन सरासरी पर्जन्यमान सुमारे २८०.४ मिमी इतके असते. दीर्घकालीन सरासरी म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रदेशात ठराविक कालावधीत पडलेल्या पावसाची, दीर्घ कालावधीच्या (साधारणपणे ३० ते ५० वर्षे) आकडेवारीवरून काढलेली सरासरी होय.

जुलै महिन्यात देशाच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र, वायव्य आणि ईशान्य भारत, पूर्व-मध्य भारत आणि पूर्व द्वीपकल्पीय क्षेत्रातील काही भागांत सरासरी किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितले. जूनमध्ये संपूर्ण भारतात पावसाची सुमारे ४० टक्के तूट नोंदवली गेली. यात मध्य भारत सर्वाधिक प्रभावित झाला असून, तिथे ५०.४ टक्के तूट होती. १९०१ नंतरच्या काळात जून महिन्यातील पावसाची ही पाचवी सर्वात कमी (९९.५ मिमी) नोंद ठरली.

मान्सूनच्या हंगामातील हे सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान पाच प्रमुख कारणांमुळे होते, असे मोहपात्रा यांनी सांगितले. यातील पहिले म्हणजे, मॅडेन-ज्युलियन ऑसिलेशनचा (एमजेओ) प्रतिकूल टप्पा आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### बंगळुरूमध्ये २५ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**बंगळुरू, ३० जून**

बंगळूरू पोलिसांनी शहराच्या विविध भागांत छापे टाकून २५.२३ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले.याप्रकरणी १७ जणांना अटक केली आहे. विशेष म्हणजे, अटक केलेल्यांमध्ये तीन परदेशी नागरिकांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुब्रमण्यनगर, मडीवाळा, राजाजीनगर, व्हाईटफील्ड, टिळकनगर, यशवंतपूर आणि इंदिरानगरसह विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत प्रतिबंधित अमली पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या छाप्यांदरम्यान, पोलिसांनी अमली पदार्थांची तस्करी तसेच सिगारेट्स आणि इतर तंबाखू उत्पादने कायद्याचे उल्लंघन करून विविध ब्रँडच्या तंबाखू उत्पादनांच्या अवैध उत्पादनाचे गुन्हे दाखल केले. याप्रकरणी अटक केलेल्यांमध्ये तीन परदेशी नागरिक इतर राज्यांतील आठ रहिवासी आणि सहा स्थानिक रहिवाशांचा समावेश आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# गोऱ्हेंऐवजी अचानक सचिन अहिर मैदानात

**रात्रीतून फिरली चक्रे, ठाकरे गटाला झटका**

**मुंबई, ३० जून**

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या काहीही घडू शकते याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी कालपर्यंत महायुतीकडून निलम गोर्हे यांचे नाव सर्वात आघाडीवर असताना, रात्रीतून अचानक अत्यंत गोपनीय पद्धतीने राजकीय चक्रे फिरली. सकाळ उजाडताच उबाठा (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे विधान परिषद सदस्य सचिन अहिर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत गुप्ततेने राबवलेल्या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत ठाकरे गटाला मुंबईत बसलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि अनपेक्षित धक्का मानला जात आहे.

विधान परिषदेतील संख्याबळ आणि ज्येष्ठता पाहता निलम गोऱ्हे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल,अशीच चर्चा राजकीय वर्तुळात आणि माध्यमांमध्ये सुरू होती. मात्र, ३० जून रोजी शिंदे सरकारच्या वर्धापन दिनाचा मुहूर्त साधत विरोधकांना सर्वात मोठा धक्का देण्याची रणनीती महायुतीच्या चाणक्यांनी आखली. ठाकरे गटाचे मुंबईतील अत्यंत आक्रमक आणि ग्रासरूटचे नेते म्हणून ओळखल्या जाणार्या सचिन अहिर यांना महायुतीच्या गळाला लावून थेट उपसभापती पदाची उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. यामुळे सकाळी विरोधकांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. ◂ (तभा वृत्तसेवा)

# अहिरांच्या प्रवेशाने तांत्रिक चुकांची 'हॅट्ट्रिक'

**विधान परिषदेत ठाकरे गटाची कायदेशीर कोंडी**

तभा विशेष

**मुंबई, ३० जून**

महाराष्ट्राच्या राजकारणात मंगळवारी एका मोठ्या राजकीय भूकंपाची नोंद झाली. उद्धव ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय मानले जाणारे विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करून सर्वांनाच धक्का दिला. शिंदे गटानेही तत्काळ राजकीय खेळी करत त्यांना विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची उमेदवारी जाहीर केली आणि ठाकरे गटाला चारी मुंड्या चित केले. या एका राजकीय खेळीने केवळ राज्यातील समीकरणेच बदलली नाहीत, तर महाविकास आघाडीचा (मविआ) कायदेशीर आणि तांत्रिक अभ्यासाचा अभाव पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणला आहे.



राजकीय आणि विधिमंडळ कायद्यांच्या आघाडीवर महाविकास आघाडी नेहमीच कमी पडल्याचे वारंवार दिसून आले आहे. या चुकांची सुरुवात तत्कालीन विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्या घाईघाईने दिलेल्या राजीनाम्यापासून झाली. या एका निर्णयाने मविआ सरकारसाठी मोठा घटनात्मक पेच निर्माण केला होता. त्यानंतर सत्तासंघर्षाच्या काळात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येण्यापूर्वीच, बहुमत चाचणीला सामोरे न जाता उद्धव ठाकरे यांनी थेट मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयालाही नंतर सरकार पुनर्स्थापित करता आले नाही. आता सचिन अहिर यांच्या निमित्ताने मविआकडे विधिमंडळ कामकाजाचा आणि कागदोपत्री नोंदींचा अभ्यास नसल्याचे प्रकर्षाने समोर आले असून, ही त्यांच्या तांत्रिक चुकांची 'हॅटट्रिक'च मानली जात आहे. या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विधान परिषदेतील एक अत्यंत महत्त्वाचा आणि ताजा ऐतिहासिक दाखला दिला आहे. ७ जुलै २०२३ रोजी विधान परिषदेच्या तत्कालीन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उबाठा गटातून थेट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. जेव्हा नीलम गोऱ्हे उपसभापती झाल्या, तेव्हा त्या 'धनुष्यबाण' या अधिकृत चिन्हावरूनच परिषदेत निवडून आल्या होत्या. शिंदे गटात प्रवेश केल्यानंतरही त्यांचे उपसभापतीपद अबाधित राहिले, कारण तांत्रिकदृष्ट्या त्या मूळ पक्षात आणि मूळ चिन्हावरच होत्या. सचिन अहिर यांच्या बाबतीतही नेमका हाच नियम आणि हाच पायंडा लागू होतो. त्यामुळे अहिर यांच्यावर अपात्रतेची कारवाई अशक्यप्राय मानले जात आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### विधान परिषदेत 'शिवसेना' एकच!

सचिन अहिर यांच्यावर पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत अपात्रतेची कारवाई होईल, अशी जोरदार चर्चा ठाकरे गटाकडून सुरू आहे. मात्र, विधानभवनातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार ही कारवाई निव्वळ अशक्य आहे. कारण, फुटीनंतर केवळ कामकाजाच्या सोयीसाठी गटनेतेपदे दिली गेली. पण तांत्रिकदृष्ट्या विचार केल्यास, अनिल परब हे गटनेते आहेत, पण नक्की कोणत्या पक्षाचे? हा मोठा कायदेशीर प्रश्नच आहे. कारण, उबाठा गट किंवा शरद पवार गटाने फुटीनंतर कोणतीच अधिकृत कागदोपत्री नोंद केलेली नाही किंवा तशी मागणीच केलेली नाही. त्यामुळे आजही कागदावर केवळ मूळ पक्षच अस्तित्वात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# टीईटी घोटाळ्याचे कवित्व

शिक्षण ही कोणत्याही राष्ट्राची सर्वात मोठी गुंतवणूक मानली जाते. इमारती उभारता येतात, वर्गखोल्या अद्ययावत करता येतात, पुस्तके छापता येतात, अभ्यासक्रम बदलता येतात, तंत्रज्ञान विकत घेता येते; पण उत्तम शिक्षक निर्माण करण्यासाठी कोणताही शॉर्टकट नाही. पैसे देऊन शिक्षकाला नोकरी मिळू शकते, मात्र त्याच्याकडून शिक्षण मिळू शकत नाही. शिक्षक घडवावा लागतो आणि तो तसा आहे काय यासाठी त्याचे मूल्यांकन करावेच लागते. शिक्षक हा समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक पायाभरणीचा कारागीर असतो. म्हणूनच शिक्षक निवडीची प्रक्रिया जितकी निर्दोष, तितके राष्ट्र अधिक सुरक्षित असते. त्या प्रक्रियेवर संशय निर्माण झाला की त्याचे पडसाद वर्गखोलीच्या चार भिंतींपलीकडे जातात आणि दीर्घकाळ त्याचे परिणाम जाणवत राहतात.

दिवसागणिक नवे-नवे खुलासे ज्यात होत आहेत, अशा महाराष्ट्रातील टीईटी पेपरफुटीच्या घोटाळ्याने हाच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. प्रश्नपत्रिका फुटणे, गुणांमध्ये फेरफार, बनावट प्रमाणपत्रे, दलालांचे जाळे आणि प्रशासकीय संगनमत हा सारा एका चौकडीचा गेम दिसतो. शिक्षण क्षेत्राला जडलेल्या आजाराची ही लक्षणे आहेत. प्रत्येक वेळी काही आरोपी अटक होतात, चौकशी समित्या नेमल्या जातात आणि काही महिन्यांनी विषय मागे पडतो. पुढच्या भरतीत पुन्हा एखादा नवा घोटाळा समोर येतो. याचा अर्थ व्यक्ती बदलत असतात; पण व्यवस्था बदलत नाही. एका तत्त्वज्ञाचे सुप्रसिद्ध वचन आहे. तो म्हणतो- ''राष्ट्राची शक्ती औपचारिक आणि अनौपचारिक अशा शिक्षणातून विकसित होत असते.'' त्या शिक्षणाची पहिली अट म्हणजे शिक्षकावर असलेला समाजाचा विश्वास. तोच डळमळीत झाला, तर अभ्यासक्रम कितीही आधुनिक असला तरी त्याचा उपयोग शून्य ठरतो. टीईटीची संकल्पना गुणवत्तेच्या संरक्षणासाठी होती. शिक्षक भरतीवर पैसा, शिफारस आणि राजकीय दबाव यांचा प्रभाव कमी व्हावा, हा तिचा हेतू. कारण आधीच आपल्या शिक्षण क्षेत्राला भयंकर कीड लागलेली आहे. गेल्या काही दशकांत खाजगी शाळा-महाविद्यालयांमध्ये भरभक्कम डोनेशन्स घेऊन शिक्षक भरती केली गेली. ज्याला दोन वाक्ये निर्दोष इंग्रजी लिहिता येत नाही, तो इंग्रजीचा मास्तर झाला. ज्याला नकाशा कसा पाहावा हे कळत नाही, तो भूगोलाचा शिक्षक झाला. त्यामुळे किमान दोन पिढ्यांचे नुकसान झाले. त्यातून दिसणारे चित्र असे की, पदव्या भरपूर असतात, पण पाच-सात ओळींचे पत्र नीट लिहिता येत नाही. साधा अर्ज करता येत नाही. स्वतःच्या नावाचेच स्पेलिंग चुकविणारे लोकही यांच व्यवस्थेतून निर्माण झाले आहेत. त्यांना साधे-सोपे भाषांतर करता येत नाही. इंग्रजी तर सोडा, मराठीही धड येत नाही. अशा पिढ्यांना रोजगार कसा मिळणार आणि मिळाला तरी तो टिकणार कसा, याचा कुणीही विचार केला नाही. यावर अनेक उपाय झाले. टीईटी हा त्यातलाच एक उपाय. पण, तिचे पेपर फोडण्याचा पराक्रम आपल्या लोकांनी केला. आता त्याची फळे हजारो शिक्षक भोगत आहेत.

नीटच्या पेपरफुटीच्या पाठोपाठ टीईटीचा पेपर फुटला. म्हणजे विद्यार्थ्यासाठीचेच नव्हे तर मास्तरांसाठी असलेले पेपरही फोडले गेले. त्याचे कारण म्हणजे शॉर्टकट मारण्याची आपल्या समाजाला असलेली वाईट सवय. या सवयीने अनेक पिढ्यांचे नुकसान होतेय, हे कुणाच्याही गावी नाही. परीक्षेचा पेपर फुटतो तेव्हा दोष फक्त एका व्यक्तीपुरता नसतो. पेपर फोडणाऱ्यांकडे गिऱ्हाईक असतात म्हणून ते ते करतो. दोघांनाही लोभ असतो. पेपर फोडणाऱ्याला पैशाचा आणि फुटलेला पेपर घेऊन परीक्षेला बसणाऱ्याला शॉर्टकटने आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा. ''काम झाले की झाले, बाकी काहीही पाहायचे नसते,'' हा दृष्टिकोन आणि गुणवत्तेपेक्षा भ्रष्ट मार्ग शोधण्याची प्रवृत्ती हे याचे खरे कारण होय. कष्टाला आणि प्रामाणिकपणाला किंमत नाही आणि भ्रष्ट मार्गाने जो यशस्वी झाल्याचे दाखवत असतो, त्याच्या चढत्या कमानीला अंत नाही, अशी आपल्या समाजाची स्थिती. अशात पेपरफुटीसारखी प्रकरणे घडणारच. कोणतीही पेपरफूट ही एका व्यक्तीच्या लोभातून घडत नाही, हेही तेवढेच खरे. प्रश्नपत्रिका तयार करणारा, ती छापणारा, वाहतूक करणारा, सुरक्षित ठेवणारा, परीक्षा घेणारा आणि निकाल प्रक्रिया सांभाळणारा या संपूर्ण साखळीत कुठेतरी जबाबदारीचे सकारण विस्मरण झाले असते. अनेक हातांमधून जाणाऱ्या प्रक्रियेत प्रत्येकाची जबाबदारी थोडीथोडी विरघळते आणि शेवटी दोष कोणाचा, हा प्रश्नच अनुत्तरित राहतो. म्हणून प्रत्येक घोटाळ्यानंतर आरोपी शोधण्याइतकेच महत्त्वाचे काम म्हणजे मूळ प्रक्रिया तपासणे आणि तिच्या प्रत्येक टप्प्यावर तिची वळणे योग्य होती काय, याचा छडा लावणे. तशी चौकशी सुरू झाली आहे, याचे समाधान वाटते. परंतु, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याचीही तजवीज सरकारला करावी लागेल.

टीईटी पेपरफुटीच्या दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहेच. ती होईलही. पण, प्रश्नपत्रिका व्यवस्थापनासाठी एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, प्रत्येक टप्प्याचे डिजिटल लॉगिंग, स्वतंत्र तांत्रिक लेखापरीक्षण, परीक्षा संस्थांचे नियमित बाह्य ऑडिट आणि गैरव्यवहार उघड करणाऱ्यांना कायदेशीर संरक्षण हे सारे आता अत्यंत आवश्यक आहे. कारण प्रत्येक पेपरफुटीनंतर चौकशी समिती नेमण्याची परंपरा आहे. पण त्या समित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी कोण करते आणि ती योग्यरीत्या झाली की नाही याचे मूल्यांकन कोण करतो, हा प्रश्न कायम अनुत्तरित राहिलेला आहे. आता तरी तसे घडू नये. शिक्षक भरतीची प्रक्रिया ही पारदर्शकच असली पाहिजे. आणि त्यासाठी टीईटीसारखी परीक्षा ही अत्यंत काटेकोरपणे घेतली गेली पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भरती प्रक्रियेतील विलंब. वर्षानुवर्षे भरती रखडते. लाखो उमेदवार अनिश्चिततेत अडकतात. अशा वातावरणात दलाल, एजंट आणि अवैध व्यवहार करणाऱ्यांचे रान माजते. परीक्षा जितकी कठीण आणि भरती जितकी विलंबित, तितकी भ्रष्टाचाराची कीड वाढत जाते. त्यामुळे नियमित, कालबद्ध भरती हीसुद्धा भ्रष्टाचारविरोधी उपाययोजनाच आहे. शिक्षक मान्यतेसाठी लाखो रुपये शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना द्यावे लागतात, हे आता उघड गुपित आहे. शिक्षण खाते प्रचंड भ्रष्टाचाराने पोखरलेले आहेच. शालार्थ घोटाळ्यात त्याची अत्यंत कुरूप बाजू उघड झाली. आता टीईटीचा पेपर फुटला आणि त्याची चौकशी सुरू झाली. शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात व्यक्तींपेक्षा संस्थात्मक जबाबदारी जास्त आहे. सरकार ही अनेक संस्था-यंत्रणा संचालित करणारी व्यवस्था आहे. त्यामुळे सरकारची जबाबदारी सर्वात मोठी. सरकारने ही कारवाई पुढे नेताना हे लक्षात घेतले पाहिजे की, शिक्षण क्षेत्रातील चूक किंवा भ्रष्टाचार इतर क्षेत्रांपेक्षा अधिक गंभीर असतो. निकृष्ट रस्ता काही वर्षांनी पुन्हा बांधता येतो. चुकीचा आर्थिक निर्णय दुरुस्त करता येतो. परंतु अयोग्य शिक्षकामुळे झालेली बौद्धिक हानी अनेक पिढ्यांपर्यंत भरून निघत नाही. शिक्षक भरती ही केवळ रोजगाराची प्रक्रिया म्हणून पाहण्याची चूक आपण वारंवार करतो. प्रत्यक्षात ती राष्ट्राच्या मानवी भांडवलातील सर्वात महत्त्वाची गुंतवणूक असते. ही गुंतवणूक सार्थकी लावायची असेल तर टीईटीवरील विश्वास पुनर्स्थापित करावा लागेल. त्यासाठी सरकारला दोषींवर कठोर कारवाई करावी लागेल आणि प्रामाणिक व कष्टाळू उमेदवारांना चांगली संधी मिळेल, याची काळजी घ्यावी लागेल. प्रत्येक उमेदवाराला हे निश्चित वाटले पाहिजे की त्याच्या उत्तरपत्रिकेचे मूल्य त्याच्या गुणवत्तेने ठरणार आहे, कोणाच्या संपर्काने किंवा व्यवहारामुळे नाही. टीईटी पेपरफूट घोटाळ्याचे कवित्व हेच सांगते आहे. सरकारच्या म्होरक्यांना त्याचे महत्त्व कळेल तो शिक्षणाच्या दृष्टीने सुदिन. ■

## विशेष

### प्रा. सुखदेव बखळे

# पुन्हा मोनोरेल...

मुंबईमध्ये मोनोरेल सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे शहरातील गर्दी कमी करणे आणि पर्यायी सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध करून देणे हा होता. पारंपरिक रेल्वेमार्ग आणि रस्त्यांवर वाढत असलेल्या ताणामुळे नवीन वाहतूक व्यवस्थेची गरज निर्माण झाली होती. मोनोरेल ही एका उंच मार्गिकेवर धावणारी आधुनिक रेल्वे प्रणाली आहे. कमी जागेत उभारता येणारी आणि शहरी भागात प्रभावीपणे कार्य करू शकणारी ही व्यवस्था अनेक देशांमध्ये यशस्वी ठरली आहे. मुंबईतही या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवाशांना जलद आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुंबई मोनोरेलचा मार्ग चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक असा सुमारे २० किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गामुळे पूर्व उपनगरांपासून दक्षिण-मध्य मुंबईपर्यंतचा प्रवास अधिक सोपा होतो. पहिला टप्पा २०१४ मध्ये सुरू झाला तर दुसरा टप्पा २०१९ मध्ये कार्यान्वित झाला. सुरुवातीच्या काळात या प्रकल्पाबाबत मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या; मात्र काही तांत्रिक समस्या, मर्यादित गाड्या आणि देखभालीशी संबंधित अडचणी यामुळे मोनोरेलला अपेक्षित यश मिळू शकले नाही, तरीही या मार्गाचे महत्त्व कायम राहिले. मोनोरेल सुरू करण्यासाठी प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. नवीन रोलिंग स्टॉकची जोडणी, सुरक्षा व्यवस्थेतील बदल आणि प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) सिग्नलिंग प्रणालीचा वापर यामुळे संपूर्ण नेटवर्क अधिक विश्वासार्ह बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आजच्या काळात कोणतीही वाहतूक व्यवस्था स्वतंत्रपणे प्रभावी ठरत नाही. विविध वाहतूक साधनांमध्ये सुलभ बदल करता येणे हेच यशस्वी वाहतूक व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य असते. चेंबूरमधील ही जोडणी त्याच दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पूर्व उपनगरांमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना या पुनरारंभाचा थेट फायदा होणार आहे. चेंबूर, कुर्ला, टिळकनगर, वडाळा आणि आसपासच्या परिसरातील लोकांना कमी वेळेत आपल्या गंतव्यस्थानी पोहोचता येईल. रस्त्यांवरील वाहतूक कोंडीमुळे अनेकदा प्रवाशांचा मौल्यवान वेळ वाया जातो. सार्वजनिक वाहतुकीचा प्रभावी पर्याय उपलब्ध झाल्यास हा वेळ मोठ्या प्रमाणात वाचू शकतो.

येत्या काळात कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी मोनोरेल हा नव्याने एक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा पर्याय ठरू शकतो. याशिवाय मेट्रोशी जोडणी झाल्यामुळे शहरातील इतर भागांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक विकास यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. उत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध असणाऱ्या भागांमध्ये गुंतवणूक वाढते, रोजगार निर्मिती होते आणि व्यावसायिक संधी निर्माण होतात. मोनोरेलच्या पुनरारंभामुळे पूर्व उपनगरांमधील अनेक भागांमध्ये व्यावसायिक हालचाली वाढू शकतात. लहान-मोठे उद्योग, दुकाने, सेवा व्यवसाय आणि रिअल इस्टेट क्षेत्रालाही याचा सकारात्मक परिणाम जाणवू शकतो. गाड्यांची नियमित उपलब्धता, वेळेचे पालन, स्वच्छता, सुरक्षा आणि प्रवाशांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद या बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी सुलभ तिकीट प्रणाली, एकात्मिक प्रवास कार्ड आणि इतर वाहतूक साधनांशी समन्वयावरही भर देणे आवश्यक आहे. मुंबईमध्ये मेट्रो नेटवर्कचा विस्तार वेगाने सुरू आहे. त्यासोबत मोनोरेलचे प्रभावी पुनरुज्जीवन झाले, तर शहराला बहुआयामी वाहतूक व्यवस्था मिळू शकते. रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि बस सेवा यांचे एकात्मिक जाळे उभे राहिल्यास मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत मोठे परिवर्तन घडू शकते. भविष्यात अशा प्रकल्पांमुळे नागरिकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुंबईसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जाऊ शकते. मुंबई मोनोरेलचे पुनरागमन ही केवळ एका वाहतूक सेवेची पुनर्सुरुवात नाही, तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेतील नव्या अध्यायाची सुरुवात आहे. प्रशासनाने सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह सेवा दिल्यास मोनोरेल मुंबईच्या वाहतुकीतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनू शकते. त्यामुळे मुंबईकरांच्या अपेक्षा आता या पुनरारंभाकडे लागल्या आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून दररोज लाखो लोक रोजगार, शिक्षण, व्यवसाय आणि विविध कारणांसाठी शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास करतात. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि मर्यादित रस्ते यामुळे वाहतूक कोंडी ही मुंबईकरांसमोरील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक बनली आहे. या पृष्ठभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार आणि आधुनिकीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. मुंबई मोनोरेलची संकल्पना २००८ मध्ये पुढे आली. वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी सार्वजनिक वाहतूक प्रणालीची गरज निर्माण झाली होती. त्यातून मोनोरेल प्रकल्पाचा जन्म झाला. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून शहरातील दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये कमी जागेत प्रभावी वाहतूक व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न होता. या प्रकल्पाचे दोन टप्प्यांमध्ये उद्घाटन करण्यात आले. पहिला टप्पा वडाळा ते चेंबूरदरम्यान ८.८ किलोमीटर लांबीचा असून २ फेब्रुवारी २०१४ रोजी सुरू झाला. दुसरा टप्पा वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यान ११.२ किलोमीटर लांबीचा असून ४ मार्च २०१९ रोजी प्रवाशांसाठी खुला करण्यात आला. सुरुवातीला या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले गेले; मात्र विविध तांत्रिक आणि व्यवस्थापकीय अडचणींमुळे मोनोरेलला अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नाही. काही काळानंतर सेवा मर्यादित स्वरूपात सुरू राहिली आणि नंतर व्यापक सुधारणा करण्यासाठी ती स्थगित करण्यात आली.

मोनोरेल सेवा बंद करण्यामागे अनेक कारणे होती. प्रवाशांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था आवश्यक होती. याशिवाय आधुनिक सिग्नलिंग प्रणालीची गरजही जाणवत होती. त्यामुळे प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीटीबीसी) तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या तंत्रज्ञानामुळे गाड्यांचे संचालन अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम होते तसेच नवीन रोलिंग स्टॉक, सुरक्षा यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि देखभाल व्यवस्थेतील सुधारणा यासाठीही मोठ्या प्रमाणात काम करण्यात आले. या सर्व सुधारणांसाठी काही काळ सेवा स्थगित ठेवणे अपरिहार्य होते. आता ही कामे जवळपास पूर्ण झाली असून मोनोरेल पुन्हा सेवेत येण्यास सज्ज आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

### गिरीश शेरेकर

# पेरण्या थांबल्या, उत्पादनावर परिणाम

अल निनोच्या प्रभावाने पाऊस लांबेल हा अंदाज गेल्या अनेक दिवसांपासून हवामानावर अभ्यास करणाऱ्या विविध संस्थांनी व्यक्त केला होता. त्यानुसार पाऊस लांबला आहे आणि पेरण्या सुद्धा थांबल्या आहेत. पेरण्या जेवढ्या लांबतील तेवढा शेत पिकाच्या उत्पादनावर परिणाम होईल. राज्यात कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर अशी आठ विभागीय महसुली मंडळे आहेत. खरीप पिकांचा विचार करायचा झाल्यास राज्यात प्रामुख्याने सोयाबीन, तूर, कापूस या प्रमुख पिकांसह मूग, उडीद, मका, ज्वारी, भात, नाचणी, भुईमूग, लाल कांदा ही पिके आहेत. या पिकांच्या पेरणीचे प्रमाण विभागनिहाय कमी-जास्त आहे. राज्यात १ ते २९ जून दरम्यान सरासरी २००.७ मिमी. पाऊस अपेक्षित होता. मात्र, प्रत्यक्षात तो १११.१ मिमी. झाला आहे. मागच्या वर्षी तो १९९ मिमी. झाला होता. सध्या जवळपास ५० टक्के पाऊस कमी झाला असल्याने शेतकऱ्यांची तयारी जरी पूर्ण असली तरी त्यांना पेरणी करणे शक्य झालेले नाही. शासनाने सुद्धा पेरणीची घाई न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्यांच्याकडे सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांनी धाडस दाखवून पेरणी केली आहे. पण, ते प्रमाण खूपच कमी आहे. पावसाअभावी पेरण्या उलटण्याची शक्यता जास्त असल्याने कोणी हिंमत केलेली नाही. जून अखेरपर्यंत राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी ४८ तालुक्यांमध्ये अपेक्षित सरासरीच्या ० ते २५ टक्के, ८४ तालुक्यांमध्ये २५ ते ५० टक्के, ११२ तालुक्यांमध्ये ५० ते ७५ टक्के, ६९ तालुक्यांमध्ये ७५ ते १०० टक्के आणि ४२ तालुक्यांमध्ये अपेक्षित सरासरीच्या १०० टक्के पाऊस झाला आहे. याचाच अर्थ नियमानुसार १११ तालुक्यांमध्ये सध्या पेरणीयोग्य स्थिती आहे. राज्यात खरपी पिकाचे सरासरी एकूण क्षेत्र १४४.३६ लाख हेक्टर आहे. २९ जूनपर्यंत फक्त १०.९५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. त्यात कपाशी ७.२७, सोयाबीन १.१९, तूर ०.८३, मका ०.८७ लाख हेक्टरवर असून उर्वरित क्षेत्रात अन्य पिके पेरण्यात आली आहे. त्याची एकूण टक्केवारी ८ आहे. मागील वर्षी याच कालावधीत ७६.३१ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. सरासरी त्याची टक्केवारी ५३ होती. यावरून यंदाच्या परिस्थितीचा अंदाज येतो. विभागनिहाय आकडेवारी पाहिली तर राज्यात सर्वांत कमी कोकण विभागात खरिपाचे ३.९२ लाख हेक्टर क्षेत्र असून तेथे फक्त १ टक्का, नाशिक विभागात खरिपाचे क्षेत्र २०.३३ लाख हेक्टर आहे. येथे १३ टक्के, पुणे विभागात खरिपाचे लागवड क्षेत्र १२.५६ लाख हेक्टर असून आतापर्यंत फक्त ३ टक्के, कोल्हापूर विभागात खरिपाचे ७.२५ लाख हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत फक्त १० टक्के पेरणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात २१.४२ लाख हेक्टर क्षेत्र खरिपाचे आहे. तेथे आजपर्यंत ८ टक्के पेरणी आटोपली. लातूर विभागात खरिपाचे क्षेत्र २८.३१ लाख हेक्टर असून मंगळवार ३० जूनपर्यंत येथे फक्त ३ टक्के तर नागपूर विभागात १८.९६ लाख हेक्टर क्षेत्र खरिपाचे असून आतापर्यंत ८ टक्के पेरणी झाली आहे. राज्यात सर्वाधिक खरिपाचे क्षेत्र अमरावती विभागात ३१.६१ लाख हेक्टर आहे. येथे आजच्या तारखेत ३.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच फक्त १० टक्के पेरणी झाली आहे.

खरिपाचे क्षेत्र व आजपर्यंत झालेल्या पेरणीची आकडेवारी धक्कादायक आहे. त्यावरून यंदाच्या खरीप हंगामाची दिशा आणि दशेचे आकलन होते. चालू आठवड्यात पाऊस सामान्यच राहण्याची शक्यता असल्याने पेरण्यांना किती वेग येईल ही शंकाच आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित पावसाच्या सरासरी ७५ टक्के पाऊस झाला तरच शेतकऱ्यांकडून पेरणीची घाई होऊ शकते. राज्यातल्या १११ तालुक्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. जी काही १० टक्के पेरणी झाली आहे, ती याच तालुक्यांमध्ये आहे. सोयाबीनची पेरणी फारफार तर १५ जुलैपर्यंत करता येते. त्यानंतर केली तर उत्पादनात मोठी घट येते. याचप्रमाणे खरिपातल्या प्रत्येक पिकाचे आयुष्यमान ठरले आहे. त्याचा पेरणी, मशागतीचा व काढणीचा कालावधी कमी-अधिक प्रमाणात निश्चत आहे. सुरुवातीलाच हे चक्र काही कारणाने खंडित झाले किंवा लांबले तर त्याचा थेट परिणाम उत्पादनावरच होतो. स्वाभाविकपणे शेतकऱ्यांचे उत्पन्न देखील कमी होते. त्याचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर पडतो. राज्यातल्या प्रत्येक विभागाची सध्या जी स्थिती आहे, त्यानुसार खरीप हंगामावर अडचणीचे ढग घोंगावत आहे. यातून बळीराजाची सुटका होऊन सर्वांना दिलासा मिळावा हीच अपेक्षा वरुणराजाकडून आहे. ■

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

### प्रा. दिलीप जोशी

# नवविधा भक्ती : उद्धाराचा मार्गसोपान!

आजपर्यंत आपण सातसमुद्र, पर्वत, ऋषी अशी सप्त बाबींची माहिती पाहिली. आता नवरस, नवग्रह, नवरात्र, नवद्वार अशी नऊची मालिका पाहूया. नवविधा भक्ती आपल्या संस्कृतीचे संरक्षक कवच आहे. विविध मार्गाने त्या जगन्नाथाला 'कर्ता करविता तूच' असल्याचे सांगून आर्त हाक मारणे याला भक्तिमार्ग म्हणतात. या ब्रह्मांडाचे जाते चालविणारा तो पांडुरंग परमात्मा त्याला आळविण्याचे नऊ प्रकार म्हणजे नवविधा भक्ती. भक्तिशास्त्रात प्रामुख्याने दोन प्रकारच्या नवविधा भक्ती सांगण्यात येतात.

१) श्रीमद्भागवत महापुराणात भक्त प्रल्हादाने आपले पिता म्हणजे हिरण्यकश्यपूला भक्तीचे महत्त्व सांगताना नऊ भक्ती सांगितल्या. त्याचा अत्यंत प्रसिद्ध श्लोक आहे-

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥'**

२) नवविधा भक्तीचा दुसरा प्रकार भगवान श्रीरामचंद्र आणि शबरी यांच्यातील संवादात श्रीरामचरितमानसात दिला आहे. त्याची चौपाई अशी-

'प्रथम भगति संतन्ह कर संगा। दूसरि रति मम कथा प्रसंगा।।
गुर पद पकंज सेवा तीसरि भगति अमान।
चौथि भगति मम गुन गन करइ कपट तजि गान।
मन्त्र जाप मम दृढ़ बिस्वासा। पंचम भजन सो बेद प्रकासा।।
छठ दम सील बिरति बहु करमा। निरत निरंतर सज्जन धरमा।।
सातवँ सम मोहि मय जग देखा। मोतें संत अधिक करि लेखा।।
आठवँ जथालाभ संतोषा। सपनेहुँ नहिं देखइ परदोषा।।
नवम सरल सब सन छलहीना। मम भरोस हियँ हरष न दीना।।'

आज आपण श्रीमद्भागवत महापुराणातील नवविधा भक्तीचा विचार करू. यामध्ये नऊ प्रकारच्या भक्ती सांगितल्या आहेत-

**१) श्रवण भक्ती** – श्रीमद्भागवत पुराणात विदित या भक्ती प्रकारात श्रवण म्हणजे ऐकणे अर्थात भगवंताचे गुणगान, चरित्र, लीला, स्वरूप याबद्दल निरंतर ऐकत राहणे होय. सतत भगवंताबद्दल श्रवण केल्याने भगवंताचा संपूर्ण परिचय होऊन देवाविषयी प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी वाढीस लागते.

**२) कीर्तन भक्ती** – कीर्तनभक्तीत माणूस प्रथम श्रवण करतो, त्यानंतर तो बोलतो. कीर्त म्हणजे लयबद्ध स्तुती, गौरव, गुणगान करणे. गायन करून भक्तिरसात तल्लीन होण्याचे साधन म्हणजे कीर्तन. टाळ, मृदंग, संगीताच्या साथीने देहभान विसरून भगवंताप्रति तन्मय होणे म्हणजे कीर्तन. वीणा आणि चिपळ्या घेऊन देवर्षी नारद 'नारायण नारायण' ही लयबद्ध आर्त हाक भगवंताला देतात. स्वतः भगवंत नारदांना सांगतात की,

**'नाहं वसामि वैकुण्ठे योगिनां हृदये न च।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद।**

**३) स्मरण भक्ती** – या भक्तीत मानव करीत असलेल्या प्रत्येक कृतीत भगवंताचीच आठवण ठेवणे. 'दलिताकांडीता तुज गाईन अनंता' हीच भावना या भक्तीत असते. त्यासाठी भक्त प्रल्हादाप्रमाणे सतत जप, मंत्र, नामस्मरण किंवा भरताप्रमाणे प्रत्येक कृती म्हणजे रामकार्य. .

**४) पादसेवन भक्ती** – या प्रकारात भगवंताच्या किंवा सद्गुरूंच्या चरणांची सेवा म्हणजे पादसेवन भक्ती होय.

**'पादसेवन तेचि जाणावे, काया वाचा मनोभावे ।**
**सद्गुरूचे पाय सेवावे,सद्गति कारणे ।।'**

यामध्ये १) प्रत्यक्षात सद्गुरूंचे पाद्यपूजन, त्यांच्या सहवासात राहून त्यांची मनोभावे, समर्पित अंतःकरणाने सेवा करणे. २) जेथे संतांचे पाय लागले अशा तीर्थस्थानी जाऊन तेथे पादुका पूजन. ३) दीनदलितांची सेवा. या तीन प्रकारात पादसेवन भक्ती करता येईल.

**५) अर्चन भक्ती** – श्रद्धायुक्त अंतःकरणाने सगुण साकार परमेश्वराची विधिवत पूजा म्हणजे अर्चनभक्ती. सोप्या भाषेत सांगू... पूजेचे ताट तयार करून मूर्तीची पूजा म्हणजे अर्चन भक्ती. षोडशोपचारे, पंचोपचारे विधिवत शास्त्रोक्त पूजा म्हणजे अर्चन भक्ती. अशी पूजा विधिवत किंवा मानस पूजा असू शकते. पूजा हा शब्द पूजपासून तयार होतो. पूजचा एक अर्थ पुष्पांनी पूजा होते. फुले वाहण्यासाठी मूर्ती पाहिजे. त्यासाठी निर्गुण निराकार अमूर्त परमेश्वराला सगुण साकार मूर्त स्वरूपात पाहणे जरूरीचे.

**६) वंदन भक्ती** – शरणागत होऊन भगवंताला, सद्गुरूला नमस्कार करणे याला वंदन भक्ती म्हणतात. विनम्रभावाने, लीन होऊन दंडवत प्रणाम म्हणजे वंदन भक्ती. आपण जेव्हा एकमेकांना भेटतो तेव्हा हात जोडून नमस्कार म्हणतो. ही वंदन भक्तीची प्राथमिक अवस्था आहे.

**'पंढरीच्या लोका नाही अभिमान, पाया पडे जन एकमेका !'**

एकमेकांना पांडुरंग समजून, माउली, संत समजून वारकरी मंडळी एकमेकांच्या पाया पडतात. हीच वंदनभक्ती आहे. भगवंताच्या चरणांवर दंडवत करणे नामे वंदनभक्ती. या भक्तीसाठी स्वतःला न्यून समजावे लागते. स्वभावात विनम्रता जाणीवपूर्वक धारण करावी लागते.

'सहावी भक्ती ते वंदन, करावे देवाशी नमन ।
संत साधू आणि सज्जन, नमस्कारित जावे ॥'

देवाला, सूर्याला, सद्गुरूला, भक्ताला, ज्ञानी, तापसी आणि योग्यांना, वडीलधाऱ्यांना नमस्कार म्हणजे वंदन भक्ती होय.

**७) दास्य भक्ती** – भक्तिशास्त्रातील सर्वात गोड भक्ती प्रकार म्हणजे दास्य भक्ती होय. भक्ताने देवाचा, सद्गुरूचा दास बनून राहणे. सेवक बनून निरपेक्ष, विनम्र भावाने आज्ञाधारक बनून सेवा करणे म्हणजे दास्यभक्ती.

**८) सख्य भक्ती** – भक्तीचा हा आठवा प्रकार म्हणजे देवाप्रती मैत्री भाव ठेवून त्याची भक्ती करणे. तो आपला सखा आहे हे मानले तर देव आणि भक्त यांच्यात द्वैत किंवा दुरावा राहण्याची शक्यता कमी. एकदा मैत्रीचा भाव आला तर तिथे दबाव, जोरजबरी राहत नाही तर हार्दिक नाते देव आणि भक्तात निर्माण होते.

**९) आत्मनिवेदन भक्ती** – नवविधा भक्तीतील सर्वात अंतिम प्रकार म्हणजे आत्मनिवेदन भक्ती आहे. आत्मनिवेदन म्हणजे आपल्या मनातील सर्व देवाला सांगणे. निवेदन शब्दात नि वद म्हणजे आपल्याला जे पाहिजे ते आपल्याहून सामर्थ्यवंतासमोर कृतज्ञतापूर्वक आणि विश्वासाने सांगणे. आत्मनिवेदन भक्तीत भक्त आपल्या मनातील सर्व निःसंकोचपणे शरणभावे देवाला सांगतो. देव भक्ताला प्रतिसाद देतो. आत्मनिवेदन जीवीच्या जिवलगाशीच होऊ शकते. तो फक्त देव असतो. अनन्यभाव ठेवून ईश्वराला सांगायचे असेल तर पराकोटीची श्रद्धा कमवावी लागते. संत नामदेव महाराजांनी निवेदन केले आणि भगवंतांनी निवद म्हणजे नैवेद्य ग्रहण केला. त्यासाठी निरातिशय आर्त हवे. आपण दररोज झोपण्यापूर्वी देवाजवळ सर्व सांगा. हीच आत्मनिवेदन भक्ती होईल. नवविधा भक्तीतील एका जरी भक्तीसाठी अचूक प्रयत्न केला तर ऐहिक आणि पारलौकिक सुखाची प्राप्ती होतेच. ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### निसर्गाशी स्पर्धा नव्हे, सहजीवनाची गरज

आज जगभर हवामानातील बदल ही केवळ वैज्ञानिक चर्चा राहिलेली नाही, तर ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील कठोर वास्तव बनली आहे. कुठे मुसळधार पावसामुळे पूर, तर कुठे दीर्घकाळ दुष्काळ, कुठे असह्य उष्णतेच्या लाटा, तर कुठे अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान. या सर्व घटनांमधून एकच संदेश स्पष्ट होतो निसर्ग बदलाचे परिणाम शेवटी सर्वांनाच भोगावे लागतात. माणसाने विज्ञान, तंत्रज्ञान आणि विकासाच्या नावाखाली निसर्गावर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला. जंगलतोड, डोंगरांची तोडफोड, नद्यांचे अतिक्रमण, भूजलाचा अमर्याद उपसा, प्रदूषण आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. काही काळासाठी हा विकास लाभदायक वाटला, परंतु आता त्याची किंमत संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागत आहे. निसर्गाशी स्पर्धा करण्याची मानवी वृत्ती आज संकटाचे मूळ ठरत आहे. निसर्गावर माणसाचे वर्चस्व कधीच टिकू शकत नाही. निसर्ग शांत असतो, पण त्याचा समतोल बिघडला की त्याचे परिणाम अत्यंत भीषण स्वरूपात समोर येतात. विजांचा वाढता प्रकोप, उष्णतेच्या लाटा, भूस्खलन, वणवे आणि पाणीटंचाई ही त्याचीच उदाहरणे आहेत. या संकटाचा सर्वाधिक फटका शेतकरी, मजूर आणि सामान्य नागरिकांना बसतो. पिकांचे नुकसान, पाण्याची कमतरता, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक अस्थिरता यामुळे ग्रामीण तसेच शहरी जीवन विस्कळीत होत आहे. हवामान बदल हा आता भविष्यातील नव्हे, तर वर्तमानातील गंभीर प्रश्न आहे.

आज गरज निसर्गाशी संघर्ष करण्याची नाही, तर त्याच्याशी समतोल सुसंवाद साधण्याची आहे. वृक्षलागवड, जलसंधारण, पर्यावरणपूरक विकास, प्रदूषण नियंत्रण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा संयमी वापर ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. शासनाने कठोर पर्यावरणीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे जितके आवश्यक आहे, तितकेच नागरिकांनीही आपल्या जीवनशैलीत बदल करणे महत्त्वाचे आहे. निसर्ग कोणाचाही शत्रू नाही; परंतु त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना तो कठोर इशारा देतो. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. कारण निसर्गाचे संरक्षण म्हणजेच मानवजातीचे भविष्य सुरक्षित करणे होय. निसर्गाशी स्पर्धा करून नव्हे, तर त्याच्यासोबत सहजीवन स्वीकारूनच पुढील पिढ्यांना सुरक्षित, समृद्ध आणि संतुलित पर्यावरण देणे शक्य होईल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

■■■

### ईव्ही कारसाठी १०० टक्के सवलतीचे नवे धोरण



दिल्ली सरकारने ईव्ही कारसाठी अनेक सवलती १ जुलैपासून जाहीर केल्या आहेत. तीस लाख रुपयांपर्यंत इलेक्ट्रिक कारला कर व नोंदणी शुल्कात शंभर टक्के सवलत देण्यात येणार आहे. इलेक्ट्रिक दुचाकी खरेदी केल्यास पहिल्या वर्षी तीस हजार, दुसऱ्या वर्षी वीस हजार तर तिसऱ्या वर्षी दहा हजार रुपये अनुदान मिळणार आहे. तीन चाकी इलेक्ट्रिक वाहन खरेदी केल्यास पहिल्या वर्षी पन्नास हजार, तर एन-१ या श्रेणीतील वाहनावर खरेदीत तब्बल एक लाखापर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे. जुने चारचाकी वाहन स्क्रॅप केल्यास व इलेक्ट्रिक वाहन घेतल्यास वाहनमालकांना एक लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. १ जानेवारी २०२७ पासून केवळ इलेक्ट्रिक वाहनांचीच नोंद होईल, तर १ जुलै २०२८ पासून नवीन पेट्रोल व डिझेलवरील वाहने यांना परवानगी दिली जाणार नाही. दिल्ली सरकार यासाठी येत्या चार वर्षात १५००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. राजधानी प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. दिल्ली शहरात प्रदूषण भयंकर असल्याने ही सवलत जाहीर करणे आवश्यक होते. आता दिल्लीत नजीकच्या काळात ईव्ही कार मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जातील व त्याचा फायदा पर्यावरणाला होईल. आज पुणे, मुंबई शहरात सुद्धा पेट्रोल व डिझेलची वाहने प्रचंड आहेत व त्यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा काही सवलती दिल्यास येथेही त्याचा चांगला परिणाम होईल. आज प्रदूषण कमी करणे ही काळाची गरज आहे.

**शांताराम वाघ**/पुणे

■■■

### तळमळीने मांडलेले विचार

'नसरापूरचा निकाल अपवाद नव्हे, नियम व्हावा' तरुण भारतमधील मंगळवार, ३० जूनचा अग्रलेख वाचला. अग्रलेखातून खरोखरंच तळमळीने मांडलेले अभ्यासपूर्ण मौलिक विचार मनाला भावले. तसे पाहता गुन्हा घडल्यापासून अवघ्या पंधरा दिवसांत पोलिस यंत्रणा आणि न्यायालयाकडून सर्व मुद्यांचा कसोशीने अभ्यास करून उचित निर्णय दिला. कौतुक करावे थोडेच. या अनुषंगाने चिमुरडीला न्याय मिळाला. माझ्या मते, या निकालामुळे भविष्यात घडणाऱ्या अशा प्रकरणांना चाप बसण्यास मदत होईल. ■

**डॉ. राहुल भोसले**/९८९०४६१८८६

सोलापूर तरुण भारत https://epaper.dainiktarunbharat.com/

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, जून ९, २०२६/ज्येष्ठ १९, शके १९४८

# अधिसूचना

सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०००३२.
दिनांक ०९ जून, २०२६.

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम**

क्रमांक-खाक्षेसं-२०२४/प्र.क्र.११८/भाग-१/माढा/रस्ते-८.- ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकच्या तरतूदींनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' म्हणून करण्यात आला आहे) पवनार ते पत्रादेवी (नागपूर-गोवा) महाराष्ट्र शक्तीपीठ द्रुतगती महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र. १० यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त महामार्ग'' असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदी अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,-

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे;

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींव्यतिरिक्त उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उप-विभागीय अधिकारी, उप-विभाग माढा, जिल्हा सोलापूर यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

## अनुसूची

संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन

तालुका : माढा जिल्हा : सोलापूर

| अ. क्र. | गाव | भूमापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १) | धानोरे | ९० | ०.१३.२३ |
| २) | धानोरे | १३३ | ०.२८.८० |
| ३) | धानोरे | १३५ | ०.१२.५० |
| ४) | धानोरे | १३७ | ०.१३.४९ |
| ५) | धानोरे | १३९ | ०.२१.६५ |
| ६) | धानोरे | १४० | ०.५५.५६ |
| ७) | धानोरे | १४१ | ०.५९.२६ |
| ८) | धानोरे | १४३ | ०.६६.३९ |
| ९) | धानोरे | १४४ | ०.५१.२५ |
| १०) | धानोरे | १४५ | ०.५२.२७ |
| ११) | धानोरे | ७४ | ०.२१.२८ |
| १२) | धानोरे | १४६ | ०.९४.२१ |
| १३) | धानोरे | १४८ | १.०३.३४ |
| १४) | धानोरे | ११५ | ०.४२.१४ |
| १५) | धानोरे | १२९ | ०.१३.७८ |
| १६) | धानोरे | १३४ | ०.०९.१३ |
| १७) | धानोरे | १३८ | ०.८१.७३ |
| १८) | धानोरे | १४२ | ०.३५.७९ |
| १९) | धानोरे | ८८ | ०.३८.३७ |
| २०) | धानोरे | ८९ | ०.३१.९९ |
| २१) | धानोरे | १३० | ०.१२.५६ |
| २२) | धानोरे | १३२ | ०.२९.०५ |
| २३) | धानोरे | ११६ | ०.४४.३३ |
| २४) | धानोरे | ११८ | ०.०८.६२ |
| २५) | धानोरे | १२८ | ०.२५.८४ |
| २६) | धानोरे | ९९ | १.००.६७ |
| २७) | धानोरे | ११७ | ०.२३.६४ |
| २८) | धानोरे | ४० | ०.००.०३ |
| २९) | धानोरे | ८ | ०.४०.२० |
| ३०) | धानोरे | ५ | ०.३०.६१ |
| ३१) | धानोरे | ९ | ०.३२.३५ |
| ३२) | धानोरे | १० | ०.२०.५५ |
| ३३) | धानोरे | १२ | ०.१८.३६ |
| ३४) | धानोरे | १३ | ०.३२.६० |
| ३५) | धानोरे | १५ | ०.४०.७४ |
| ३६) | धानोरे | ४ | १.१९.३३ |
| ३७) | धानोरे | ११३ | ०.५०.६९ |
| ३८) | धानोरे | ११४ | ०.३८.२५ |
| ३९) | धानोरे | १०० | ०.५३.४७ |
| ४०) | धानोरे | १०३ | ०.४२.५४ |
| ४१) | धानोरे | १०१ | ०.४३.०९ |
| ४२) | धानोरे | ३६ | ०.६७.२० |
| ४३) | धानोरे | १०२ | ०.२७.९३ |
| ४४) | धानोरे | ६ | १.०२.९६ |
| ४५) | धानोरे | ३५ | २.४८.४१ |
| ४६) | धानोरे | ३७ | ०.००.४१ |
| ४७) | धानोरे | ३३ | १.६६.९० |
| ४८) | धानोरे | ३४ | २.२२.५९ |
| ४९) | धानोरे | ३२ | १.७६.५० |
| ५०) | धानोरे | ३१ | १.२१.२४ |
| ५१) | धानोरे | २६ | ०.३३.५० |
| ५२) | धानोरे | एनए लगत गट नं.९९,१००,१०१,९०,१०३ | ०.२०.७४ |
| ५३) | धानोरे | रस्ता लगत गट नं.१४,१५,४०,३५,३४ | ०.२७.८२ |
| ५४) | धानोरे | एनए लगत गट नं.१०३,१०२,९०,१०१ | ०.१६.५६ |
| ५५) | मानेगांव | ५७६ | ०.०३.९६ |
| ५६) | मानेगांव | ५७९ | २.७३.३५ |
| ५७) | मानेगांव | ५८० | ४.३९.५४ |
| ५८) | मानेगांव | ५८६ | ०.००.०१ |
| ५९) | मानेगांव | ५८७ | १.६९.७५ |
| ६०) | मानेगांव | ५८९ | १.८९.१५ |
| ६१) | मानेगांव | ६०२ | २.७५.०६ |
| ६२) | मानेगांव | ६०३ | १.६१.८९ |
| ६३) | मानेगांव | ६०४ | ०.१४.९९ |
| ६४) | मानेगांव | ६०५ | ०.२२.७९ |
| ६५) | मानेगांव | ६०६ | ०.८६.४२ |
| ६६) | मानेगांव | ६५० | ०.०४.२३ |
| ६७) | मानेगांव | ६५१ | ०.००.४६ |
| ६८) | मानेगांव | ६५३ | ०.२९.२५ |
| ६९) | मानेगांव | ६५४ | ०.३२.७६ |
| ७०) | मानेगांव | ६५५ | ०.४१.०६ |
| ७१) | मानेगांव | ६५६ | ०.३९.२० |
| ७२) | मानेगांव | ६५७ | ०.३०.८९ |
| ७३) | मानेगांव | ६५८ | १.७२.७९ |
| ७४) | मानेगांव | ६५९ | ०.६४.२३ |
| ७५) | मानेगांव | ६६२ | ०.६३.८७ |
| ७६) | मानेगांव | ६६३ | ०.७२.६१ |
| ७७) | मानेगांव | ६६४ | ०.७६.६१ |
| ७८) | मानेगांव | ६६५ | ०.१९.०२ |
| ७९) | मानेगांव | ८२५ | १.९९.८६ |
| ८०) | मानेगांव | ८२६ | १.७१.९२ |
| ८१) | मानेगांव | ८२७ | १.१५.४९ |
युक्रेनने गेल्या आठवड्यात रशियाच्या ऊर्जा केंद्रांना लक्ष्य करत जोरदार हल्ले चढवले. याला प्रत्युत्तर म्हणून सोमवारी रात्री रशियाच्या वायुदलाने युक्रेनची राजधानी कीव्ह शहरासह विविध प्रदेशात ड्रोन-क्षेपणास्त्राचा मारा केला. यात २५ लोकांचा मृत्यू आणि शंभरपेक्षा अधिक जखमी झाले. या हल्ल्यात कीव्ह शहरातील पायाभूत सुविधा आणि निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या. राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी हल्ल्याचा निषेध करत युरोपियन देशांना शस्त्रांचा पुरवठा वाढवण्याची मागणी केली.

रशियन क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या हल्ल्याने युक्रेन हादरला. युक्रेनच्या पायाभूत सुविधा आणि निवासी इमारतींना लक्ष्य करत शेकडो ड्रोनचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात झापोरिझिया, डनिप्रो शहरात मोठा विध्वंस झाला. इमारतीच्या ढिगाऱ्यातून आतापर्यंत २५ नागरिकांचे मृतदेह बाहेर काढले, तर शंभरपेक्षा अधिक जखमींना रुग्णालयात भरती करण्यात आल्याची माहिती झेलेन्स्की यांनी एक्सवरील पोस्टमधून दिली. त्यांनी रशियाचा हल्ला दहशतवादी कृत्य असल्याचे त्यांनी सांगितले. झापोरिझिया शहरात रशियन ड्रोन एका प्रवासी बसला धडकले, ज्यात एका मुलासह तीन जण ठार झाले. सुमी प्रदेशात झालेल्या ड्रोन हल्ल्यात १२ नागरिकांचा मृत्यू झाला. ◂ (वृत्तसंस्था)

### आठ प्रदेशांमधील वीजपुरवठा विस्कळीत

रशियन हल्ल्यांमुळे युक्रेनच्या आठ प्रदेशांमधील वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. झेलेन्स्की यांनी पुन्हा एकदा युरोपला आवाहन करताना म्हटले की, रशियन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांना रोखण्यासाठी युरोपने आपली संरक्षण यंत्रणा आणि क्षेपणास्त्र प्रणाली मजबूत केली पाहिजे. या भीषण हल्ल्यांपासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी बॅलिस्टिक विरोधी क्षमतांची युक्रेनला तातडीची गरज आहे. ■

### संघर्षविरामाची शक्यता नाहीच

गेल्या काही महिन्यांत युक्रेनने रशियन तेल प्रकल्पांवर ड्रोन हल्ले तीव्र केले आहेत. या हल्ल्यांमुळे रशिया आणि त्याच्या ताब्यातील प्रदेशात इंधनाचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. युक्रेनच्या हल्ल्यांमुळे रशियामध्ये इंधनाचे संकट निर्माण झाल्याचे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी प्रथमच मान्य केले. पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागत असून जनतेमध्ये प्रचंड संताप आहे. असे असूनही, पुतिन यांनी माघार घेण्यास स्पष्टपणे नकार दिला. पर्यायाने दोन्ही देशात संघर्षविरामाची शक्यता मावळली आहे. ■

# अमरनाथ यात्रा : भाविकांना टोकन वितरण सुरू

## जम्मूमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था

**जम्मू, ३० जून**

जम्मूमध्ये मंगळवारी अमरनाथ यात्रेसाठी टोकन वितरणाची प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत पार पडत आहे. प्रशासनाने यात्रेकरूंच्या सोयीसाठी १० टोकन वितरण केंद्रे उभारली आहेत. एकूण १,६०० टोकन जारी करण्यात आले आहे. यापैकी ८०० पहलगाम मार्गासाठी तर ८०० टोकन बाल्टाल मार्गासाठी आहेत.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, ज्या यात्रेकरूंना मंगळवारी टोकन मिळाले आहेत ते पवित्र यात्रेला निघण्यापूर्वी बुधवारपासून आपली नोंदणी पूर्ण करू शकतील. टोकन वितरण सुरळीत आणि सुरक्षितपणे व्हावे, यासाठी तावी नदीच्या काठावर कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरात सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले असून सर्व यात्रेकरूंसाठी सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यासाठी अधिकारी संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.



भाविकांना टोकन वितरीत करताना अधिकारी

### आज ई-केवायसी आणि आरएफआयडी नोंदणी

अमरनाथ यात्रेसाठी जम्मू जिल्हा प्रशासनाने १८ जागेवरच नोंदणी आणि टोकन काउंटर उभारले आहेत. यापैकी दहा टोकन काउंटर तावी रिव्हरफ्रंट सेंटर येथे कार्यरत आहेत, तर इतर गीता भवन, राम मंदिर (जुनी मंडी), भगवती नगर आणि रेल्वे स्टेशन येथे आहेत. टोकन वितरण सकाळी ६:०० वाजता पारदर्शकपणे सुरू करण्यात आले. प्रत्येक भाविकांना कुटुंबातील सदस्यांसह रांगेत उभे राहणे, आवश्यक आहे. प्रत्येक पात्र व्यक्तीला केवळ एकच टोकन दिले जाते. टोकन धारकांची ई-केवायसी आणि आरएफआयडी नोंदणी टोकन वितरणाच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी केली जाणार आहे.

### ३ जुलैपासून सुरु होणार यात्रा

अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होत असून ती २८ ऑगस्टला संपणार आहे. यात्रेकरूंची पहिली तुकडी २ जुलै रोजी जम्मू येथील भगवती नगर यात्री निवास येथून निघेल.

समुद्रसपाटीपासून ३,८८० फूट उंचीवर असलेले हे गुहा मंदिर काश्मीर हिमालयातील अनंतनाग जिल्ह्यात आहे. यात्रेकरू एकतर लांबचा, पारंपरिक पहलगाम बेस कॅम्प मार्ग किंवा लहान बाल्टाल मार्गाने येतात. ◂ (वृत्तसंस्था)

## अनंतनागमध्ये हेरॉईन जप्त, तस्कराला अटक

**श्रीनगर, ३० जून**

जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी अनंतनाग जिल्ह्यात एका कथित ड्रग तस्कराला अटक करत त्याच्या ताब्यातून २.६१३ किलो हेरॉईन जप्त केले आहे. या अमली पदार्थाची काळ्या बाजारात २० कोटी रुपये किमत आहे, अशी माहिती पोलिस प्रवक्त्याने दिली.

हलमुल्ला येथे पोलिस नियमित तपासणी करत असताना संशयावरुन एक कार थांबवली. पोलिसांनी कारची झडती घेतली असता त्यात हेरॉईनचे चार पाकिटे सापडली. दरम्यान, पोलिसांनी कारमध्ये सापडलेले अमली पदार्थ जप्त करुन कारचालक इश्तियाक अहमदची झडती घेतली असता त्याच्याकडेही एक पाकीट सापडले. ◂ (वृत्तसंस्था)

# फंड व पेन्शनची रक्कम काढून देण्यासाठी लाच घेताना महापालिकेतील लिपिकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

महापालिकेत सेवा बजावून निवृत्त झालेल्या एका कर्मचाऱ्याची पेन्शन व फंडाची रक्कम काढून देण्यासाठी चार हजार रुपयांची लाच घेणाऱ्या महापालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या एका लिपिकास सोलापूरच्या एसीबी पथकाने मंगळवार, दि.३० जून २०२६ रोजी निराळे वस्ती भागात अटक केली. पंकज जगन्नाथ महाले (वय-३२, रा.जुनी पोलीस लाईन जवळ, निराळे वस्ती, सोलापूर. मूळ रा.उंबरपाडा, ता.जव्हार, जि.पालघर) असे अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.



यातील तक्रारदाराचे वडील हे महापालिकेमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागात बिगारी म्हणून नोकरीस होते. दि.३१ मे २०२६ रोजी ते सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर मिळणारे पेन्शन, फंड व इतर शासकीय रकमा मंजूर करुन देण्यासाठी तक्रारदार यांनी त्यांच्या वडिलांच्या वतीने ९ जून रोजी अर्ज दाखल केला होता. यातील आरोपी पंकज महाले हा कनिष्ठ श्रेणी लिपिक म्हणून कार्यरत आहे. त्याने अर्जाप्रमाणे शासकीय रकमा मंजूर करून देण्यासाठी यातील तक्रारदाराकडे दहा हजार रुपये लाच म्हणून मागितले. त्यापोटी यापूर्वी ६ हजार रुपये स्वीकारले. दरम्यान तक्रारदाराने याबाबत येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून याबाबत तक्रार दिली.

एसीबी पथकाने तक्रारी अर्जाची पडताळणी करून सापळा लावला असता आरोपी पंकज महाले हा तक्रारदाराकडून चार हजार रुपये स्वीकारताना रंगेहात सापडला. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यास बुधवारी न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांनी दिली.

# परिस्थिती गंभीर झाल्यास जामिनाचा विचार करू

## आसारामला आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरवण्याचे निर्देश

**नवी दिल्ली, ३० जून**



अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित बाबा आसारामला सर्वोच्च न्यायालयाने आणखी एक झटका दिला. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने त्याला जामीन देण्यास नकार दिला. तसेच राजस्थान सरकारला उत्तरासाठी नोटीस बजावत आसारामची प्रकृती गंभीर झाल्यास किंवा त्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाचा विचार केला जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि शील नागू यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायासनाने मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, शिक्षेला स्थगिती देण्यात आलेली नाही. तुरुंग प्रशासनाला आसारामला आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरवण्याचे निर्देश दिले आहे. राजस्थान सरकारला दोन आठवड्यांच्या आत उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. राज्य सरकारची बाजू ऐकल्यानंतरच पुढील कोणताही निर्णय घेतला जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान, आसाराम यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील डी. एस. नायडू यांनी सांगितले की, त्यांचे वय ८० वर्षांपेक्षा जास्त असून ते अनेक आजारांनी ग्रस्त आहेत. या युक्तिवादावर न्यायालय म्हणाले, केवळ वय किंवा आजारपणाच्या आधारावर जामीन मंजूर केला जाऊ शकत नाही. भविष्यात आसाराम यांच्या जीवाला धोका असेल, अशी परिस्थिती निर्माण झाल्यासच जामिनाचा विचार केला जाईल, असे न्यायासनाने तोंडी सांगितले.

२७ मे रोजी राजस्थान उच्च न्यायालयाने आसाराम यांची शिक्षा आणि जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली. तथापि, उच्च न्यायालयाने त्यांना पोस्को कायद्यांतर्गत काही गंभीर आरोपांमधून निर्दोष मुक्त केले. ◂ (वृत्तसंस्था)

# ग्रामीण पोलीस दलातील १३ पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

ग्रामीण पोलीस दलात प्रशासकीय आणि विनंतीवरून मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील १३ पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी काढले आहेत. २ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेले, पदोन्नतीने हजर झालेले किंवा विनंतीवरून बदली मिळालेल्या पोलीस निरीक्षकांचा आणि सहाय्यक पोलीस निरीक्षकांचा यामध्ये समावेश आहे.

त्याप्रमाणे कुंदन गावडे यांची वैराग येथून सोलापूर तालुका पोलीस ठाणे, दिपक पाटील नियंत्रण कक्ष येथून मोहोळ पोलीस ठाणे, पोलिस निरीक्षक अविनाश पवार यांची नियंत्रण कक्ष येथून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, बाळू भरणे वाहतुक शाखा येथून टेंभुर्णी पोलीस ठाणे, अमुल कादबने यांची नियंत्रण कक्ष येथून वैराग पोलीस ठाणे, दशरथ वाघमोडे यांची पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथून माळशिरस पोलीस ठाणे, तयुब मुजावर यांची पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथून पंढरपूर शहर पोलीस ठाणे, सुरेश चिल्लावार यांचे अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे येथून पंढरपूर तालुका पोलीस ठाणे, विकास दिंडुरे यांची माळशिरस पोलीस ठाणे येथून सायबर पोलीस ठाणे, दिपक बरडे नियंत्रण कक्ष येथून जिल्हा वाहतुक शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कड यांची आर्थिक गुन्हे शाखा येथून सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे, कमलाकर गड्डीमे यांची नियंत्रण कक्ष येथून आर्थिक गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथून बार्शी तालुका पोलीस ठाणे (प्रभारी) येथे बदली करण्यात आली आहे.


## नगर परिषद नळदुर्ग

जा.क्र. २७५७/नपन/भांडार/निविदा/२०२६ दि. ३०/०६/२०२६

**वार्षिक जाहीर निविदा सन २०२६-२०२७**

नळदुर्ग नगर परिषदतर्फे सर पात्र उत्पादक / अधिकृत विक्रते अनुज्ञप्ती नोंदणीकृत कंत्राटदार / धारकांकडून नगर परिषदमार्फत जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात येते की, सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता भांडार विभागामार्फत खालील कामाचे तिबार वार्षिक निविदा व्दिलिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

**द्विलिफाफा ऑफलाईन**
१. संगणक दुरुस्ती व तत्सम साहित्य पुरवठा (दुसरी वेळ)
२. न.प. कार्यालयांतर्गत कुशल ऑपरेटर व कामगार पुरवठा (दुसरी वेळ)
३. सीसीटीव्ही कॅमेरा पुरवठा व दुरुस्ती तत्सम साहित्य पुरवठा (तिसरी वेळ)
४. दिवाबत्ती देखभाल दुरुस्ती करणे (तिसरी वेळ)
५. हायमास्ट देखभाल दुरुस्ती करणे (तिसरी वेळ)
६. विद्युत साहित्य पुरवठा करणे (तिसरी वेळ)
७. पाणी पुरवठा विभागात आवश्यक साहित्य पुरवठा (तिसरी वेळ)
८. सीडी वर्क करणे नळदुर्ग शहरातील नाली दुरुस्ती करणे /किरकोळ कामे करणे. (पहिली वेळ)

**ई - निविदा**
९. ब्लिचिंग पावडर पुरवठा (दुसरी वेळ)
१०. तुरटी पुरवठा करणे (दुसरी वेळ)

वरील निविदा दि. ०१/०७/२०२६ ते ०७/०७/२०२६ सायं ०५.०० वाजेपर्यंत निविदा विक्री व भरणा करण्यात यावी मुदतीनंतर आलेल्या निविदा स्वीकारले जाणार नाही. निविदेतील अटी व शर्ती नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर दाखविण्यात आली आहेत. तसेच ई निविदा विषयक https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार नगर परिषदेने राखून ठेवले आहे. याबाबत वेगळी कारणे दिली जाणार नाही.

| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
|---|---|---|
| भांडार विभाग प्रमुख | मुख्याधिकारी | अध्यक्ष |
| नगर परिषद नळदुर्ग | नगर परिषद नळदुर्ग | नगर परिषद नळदुर्ग |





**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### दुचाकीस्वाराच्या जखमीस कारणीभूत; चारचाकी चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३० जून-**

महामार्गावर कोणतीही सुरक्षा उपाययोजना न करता कार उभी केल्यामुळे झालेल्या अपघातात एक १९ वर्षीय तरुण जखमी झाला आहे. ही घटना १७ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास याराणा हॉटेलसमोर घडली. याबाबत राहुल देविदास राऊत (रा.चिंचोली एमआयडीसी, सोलापूर) यांनी फिर्यादी दिलेल्या फिर्यादीनुसार फौजदार चावडी पोलिस ठाण्यात चारचाकी वाहनचालकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी राहुल राऊत हे एम.एच.१३ ई.टी.१३८८ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन चिंचोळी एमआयडीसीकडून सोलापूरकडे जात होते. याराणा हॉटेलसमोर एम.एच.२० ई.ई.३८३९ या क्रमांकाच्या चारचाकी चालकाने बेजबाबदारपणे महामार्गावर वाहन उभे केले होते. सुरक्षेच्या दृष्टीने टेललॅम्प, इंडिकेटर किंवा पार्किंग लाईटचा वापर केला नव्हता. त्यामुळे फिर्यादीला अंदाज आला नसल्याने त्याची दुचाकी चारचाकीला धडकली. यात फिर्यादीच्या डोक्याला, छातीला व पोटाला गंभीर दुखापत झाली आहे. अपघातानंतर चारचाकी चालक घटनास्थळावरुन पसार झाला.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक दहा दिवसांत पूर्ण करावे

**सोलापूर, दि. ३० जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक दहा दिवसात पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आ.देवेंद्र कोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत एका निवेदनाद्वारे करण्यात आली. या शिष्टमंडळात महापालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, प्रा.देवेंद्र मदने, प्राचार्य सिध्दारुढ बेडगनूर, रामभाऊ वाकसे, राज बंडगर, नगरसेविका अश्विनी चव्हाण, वनिता पाटील, नगरसेवक म्हेत्रे आणि गोविंद काळे, विनोद मोटे, रुपेश खटके, शंकर बंडगर, यलगोंडा सातपुते, सूर्यकांत होनमाने यांचा समावेश होता.

### सोलापुरात दाढी-कटिंगच्या दरात आजपासून १० टक्के वाढ

**सोलापूर, दि. ३० जून-**

वाढती महागाई, दुकानांचे वाढलेले खर्च आणि सलून व्यवसायिकांच्या मागण्यांचा विचार करून सोलापूर शहरातील दाढी व कटिंगच्या दरात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय नाभिक दुकानदार बहुउद्देशीय संस्था, सोलापूरने घेतला आहे. ही दरवाढ १ जुलै २०२६ पासून लागू होणार असल्याची माहिती संस्थेचे शहराध्यक्ष वैभव शेटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या निर्णयानुसार कटिंगचा दर १२० रुपयांवरून १३० रुपये, दाढीचा दर ६० रुपयांवरून ७० रुपये करण्यात आला आहे. शहरातील सर्व सलूनमध्ये १ जुलैपासून नवीन दरानुसार शुल्क आकारले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी पदाधिकाऱ्यांची नावे जाहीर करण्यात आली. ती याप्रमाणे; शहराध्यक्ष-वैभव शेटे, उपाध्यक्ष-बापूसाहेब काळे व भारत शिंदे, सचिव-श्रीकांत राऊत, सहसचिव-प्रभाकर भालेकर, कार्याध्यक्ष-प्रभाकर राऊत, खजिनदार-संतोष राऊत, प्रसिध्दी प्रमुख-सचिन चौधरी, कार्यकारिणी सदस्य-संजय चिखले, गणेश वाघमारे, प्रकाश शिंदे, मनोज डिंगे, आनंद वाघमारे. या पत्रकार परिषदेला पांडुरंग चौधरी, श्रीकांत राऊत, बापूसाहेब काळे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### टीईटी मुक्तीसंदर्भात संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने खासदारांना निवेदन

**सोलापूर, दि.३० जून-**

शिक्षण हक्क कायद्यामध्ये २३ फेब्रुवारी २०१३ रोजी केलेल्या बदलान्वये सन २०१० पूर्वीच्या कार्यरत शिक्षकांना टीईटी परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. या कायद्यामध्ये बदल करून सन २०१० पूर्वी कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट देण्यात यावी, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद सोलापूर शाखेच्या वतीने सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे व राज्यसभेच्या खासदार डॉ.ज्योती वाघमारे यांना देण्यात आले. सन २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा करण्यात आला व सन २०१३मध्ये या कायद्यामध्ये बदल करून प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी बंधनकारक करण्यात आली. प्रत्यक्षात सन २०१० पूर्वी कार्यरत असणाऱ्यांना ही परीक्षा बंधनकारक करण्याची गरज नव्हती, असेही या निवेदनात म्हटले आहे. या शिष्टमंडळात पुणे विभाग संयोजक डॉ.सचिन लादे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सुनील जगताप, आप्पाशा धनशेट्टी, अंबादास खराडे, दत्तात्रय येडगे, महादेव भोसले, भारत पाटील आदी उपस्थित होते.

# जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी नागरिकांची फरफट

## ■ शाळा प्रवेश, वारस नोंदणी, शासकीय योजनांवर परिणाम ■




### नव्या मंजुरी प्रक्रियेचा फटका, जिल्ह्यात हजारो अर्ज प्रलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून-**

शासनाच्या नव्या मंजुरी प्रक्रियेने सोलापूर जिल्ह्यात जन्म व मृत्यू दाखल्यांच्या वितरणाचा वेग मोठ्या प्रमाणात मंदावला आहे. जिल्ह्यात सुमारे २ हजार जन्म नोंदी आणि ६ हजार मृत्यू नोंदी मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. शाळा प्रवेश, वारस नोंदणी, आधार, पासपोर्ट, विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांची अक्षरशः धावपळ सुरु आहे.

शासनाने ३० दिवसांनंतर आणि एका वर्षाच्या आतील जन्म-मृत्यू नोंदींच्या मंजुरीची प्रक्रिया बदलल्यानंतर जून या कालावधीत दररोज सुमारे शेकडोंच्या संख्येत अर्ज जिल्हा निबंधक कार्यालयात दाखल झाले. त्यामुळे कार्यालयावर कामाचा मोठा ताण निर्माण झाला असून मंजुरी प्रक्रियेत मोठा बॅकलॉग तयार झाला असल्याचे सांगण्यात येते.

प्रत्येक अर्जासाठी ओटीपी पडताळणी, कागदपत्रांची तपासणी आणि ऑनलाइन मंजुरीची प्रक्रिया करावी लागत आहे.एका अर्जासाठी ५ ते १० मिनिटांचा कालावधी लागत असल्याने दररोज अत्यल्प अर्जांचा निपटारा होत आहे. परिणामी नागरिकांना अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असून ग्रामीण भागातील नागरिकांची गैरसोय अधिक वाढली आहे.

मूळ नोंदी ग्रामपंचायतींकडे उपलब्ध असतानाही मंजुरीचे अधिकार जिल्हास्तरावर केंद्रीत केल्यामुळे पडताळणी प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यातच प्रत्येक मंजुरीसाठी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीवर संपूर्ण प्रक्रिया अवलंबून असल्याने कामकाजाचा वेग आणखी मंदावला असल्याचे दिसून येत आहे.

#### स्पष्ट कार्यपध्दतीचा अभाव; अधिकारी, कर्मचारी संभ्रमात

क्युआर कोडयुक्त जन्म दाखल्यांची वाढती मागणी आणि स्पष्ट कार्यपद्धतीच्या अभावामुळे अधिकारी-कर्मचारीही संभ्रमात असल्याचे चित्र आहे. परिणामी, सर्वाधिक फटका शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आणि वारस नोंदणीसाठी मृत्यू दाखल्याची गरज असलेल्या कुटुंबांना बसत आहे.

## पदोन्नती परीक्षेसाठी अधिकाऱ्यांची कसून तयारी; जिल्हा परिषदेत दोन दिवसीय विषयवार प्रशिक्षण यशस्वी

### कायदे, सेवा नियम, कार्यालयीन कामकाज आणि ई-ऑफिस व्यवस्थापन विषयी मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून-**

महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) प्रवेशोत्तर परीक्षा २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद, सोलापूरतर्फे आयोजित करण्यात आलेले दोन दिवसीय विषयवार प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न झाले. पदोन्नतीस पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना अभ्यासक्रमातील विविध कायदे, नियम आणि प्रशासकीय कामकाजाचे सखोल ज्ञान मिळावे, याउद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, शिस्त व अपील नियम, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, अभिलेख व्यवस्थापन, जिल्हा परिषद प्रवेश नियम, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, माहितीचा अधिकार अधिनियम, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, अंदाजपत्रक, निधी पुनर्विनियोजन, आकस्मिक खर्च नियम तसेच शासन निर्णय व परिपत्रकांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले असून ॲड. राजेश देशपांडे, अविनाश गोडसे, प्रदीप सगट, अजितकुमार देशपांडे, राजेंद्र बारगड, हरीष मेत्रस, आनंद जाधव, अरुण वाघमोडे आणि शिवराज राठोड यांनी विषयतज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी परीक्षेतील महत्त्वाचे मुद्दे, प्रशासकीय कामकाजातील बारकावे, कायद्यांची अंमलबजावणी आणि कार्यालयीन कार्यपद्धती याबाबत सखोल माहिती दिली.

## महापालिकेच्या दोन अधीक्षकांना सहायक आयुक्तपदी पदोन्नती

### विनोद कुलकर्णी, युवराज गाडेकर यांच्या नियुक्तीस शासन मान्यता




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून-**

सोलापूर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील दोन कार्यालयीन अधीक्षकांना सहायक आयुक्तपदी पदोन्नती देण्यास महाराष्ट्र शासनाने अखेर मंजुरी दिली आहे. यामध्ये विनोद कुलकर्णी आणि युवराज गाडेकर यांचा समावेश असून, नगर विकास विभागाने आज मंगळवारी याबाबत शासन निर्णय जारी केला. विशेष म्हणजे महापालिकेच्या इतिहासात प्रथमच स्थानिक आस्थापनेतील अधिकाऱ्यांना संधी मिळाली. महापालिका प्रशासनात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोलापूर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार ही पदोन्नती मंजूर करण्यात आली आहे. सहायक आयुक्त पदाची वेतनश्रेणी ४१,८०० ते १,३२,३०० रुपये अशी आहे.या पदोन्नतीसाठी १९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीत शिफारस करण्यात आली होती.

यानुसार महानगरपालिकेमधील कार्यरत २ कार्यालयीन अधीक्षक यांना सहायक आयुक्त पदावर पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संदर्भाधिन दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर केला आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय ठरावानुसार प्रस्ताव महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने सर्व बाबींची पडताळणी करून दोन्ही अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीस मान्यता दिली. शासनाच्या आदेशानुसार आता महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पुढील प्रशासकीय कार्यवाही करून संबंधित अधिकाऱ्यांना सहायक आयुक्तपदी पदोन्नतीचे आदेश निर्गमित करावेत, असे निर्देशही शासनाने दिले आहेत.

नगर विकास विभागाचे उपसचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या आदेशानुसार हा शासन निर्णय जारी केला आहे. भूमी मालमत्ता विभागाचे अधीक्षक विनोद कुलकर्णी आणि मिळकत कर विभागातील अधीक्षक युवराज गाडेकर या दोन अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीमुळे महापालिका प्रशासनात समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी गाडेकर आणि कुलकर्णी यांचा पुस्तक देऊन सत्कार केला. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, लिपिक परमेश्वर सुळगावकर उपस्थित होते.

#### सोलापूर महापालिकेच्या इतिहासात प्रथमच स्थानिक अधिकाऱ्यांना संधी

सोलापूर महानगरपालिकेचा आकृतीबंध २८ डिसेंबर २०२१ रोजी, तर सेवा प्रवेश नियमांना १५ डिसेंबर २०२२ रोजी शासनाची मंजुरी मिळाली होती. या आकृतीबंधानुसार सहायक आयुक्तांची सहा पदे मंजूर आहेत. त्यापैकी पात्र ठरलेल्या दोन कार्यालयीन अधीक्षकांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी तातडीने राज्य शासनाकडे पाठविला. पाठपुरावा केला. तत्कालीन उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव तयार केला होता. राज्य शासनाने अखेर या पदोन्नतीस मंजुरी दिली. विशेष म्हणजे, सोलापूर महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच स्थानिक आस्थापनेतील अधिकाऱ्यांना सहायक आयुक्तपदी पदोन्नतीची संधी मिळाली आहे.

## डॉक्टर डे निमित्त डॉ.सतीश कोपूरवाड यांचा विशेष सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून**

राष्ट्रीय डॉक्टर्स डे आणि सीए डे निमित्त आरोग्य व आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा विशेष गौरव करण्यात येणार असून, यंदाच्या पुरस्कारासाठी सोलापूरचे जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) डॉ. सतीश कोपूरवाड यांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची ही दखल आहे.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि डी.एस.टी.एस. मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, १ जुलै रोजी शिवदारे कॉलेज, सोलापूर येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. डॉ. कोपूरवाड यांनी यापूर्वी नांदेड येथे माता बाल संगोपन अधिकारी पदावर विशेष कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेत शासनाने सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्ती दिली.

या सोहळ्यात डॉ. राजेंद्र अग्रवाल, डॉ.विद्याधर बोराडे, डॉ.रिझवान-उल-हक, डॉ.मीनल चिडगुपकर, डॉ.प्रशांत गाडे, चार्टर्ड अकाउंटंट श्रीधर रिसबूड, चंद्रकांत रच्चा यांचाही गौरव करण्यात येणार आहे.

## घरातून साडेचार लाखांचे सोन्याचे दागिने चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.३० जून-**

सिद्धेश्वरनगर परिसरातील एका घरातून सुमारे ४ लाख ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेले. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेवणसिद्ध दुर्गप्पा कट्टीमणी (वय ७३, रा. सद्धेश्वरनगर, बार्शी) यांच्या घरी झालेल्या झालेल्या या घटनेतील दागिन्यांची किंमत सुमारे ४ लाख ३० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# मनपा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर, अंगणवाडी मदतनीसांच्या प्रश्नांवर आमदार देवेंद्र कोठे यांनी उठविला आवाज

### प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मंत्री अदिती तटकरे आणि डॉ. प्रकाश आबिटकर यांच्याकडून आश्वासन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

मनपा रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर, अंगणवाडी मदतनीसांचे प्रश्न, अतिरिक्त हृदयरोग रुग्णवाहिका आणि सार्वजनिक आरोग्य परिचारिकांच्या प्रश्नांवर आमदार देवेंद्र कोठे यांनी सोमवारी विधानसभेत आवाज उठविला. आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडलेल्या या प्रश्नांवर उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच आरोग्य मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनी या प्रश्नांची सोडवणूक करण्याची आश्वासन दिले.

सोलापूर महानगरपालिकेतील विशेष तज्ञ डॉक्टरांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे डॉक्टरांना आणि रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मागील आठवड्यात तज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे स्वतः आरोग्य अधिकाऱ्यांना प्रसूती करावी लागली होती, याकडे लक्षवेधत आमदार देवेंद्र कोठे यांनी विशेष तज्ञ डॉक्टरांची मानधन वाढ न रोखता तत्काळ मानधन वाढ करावी अशी आग्रही मागणी केली. सोलापूर शहराच्या चारही बाजूंना विविध तीर्थक्षेत्रे आहेत. त्यामुळे सोलापूर शहरात येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. शासकीय राजशिष्टाचारामुळे अनेकदा शासनाची रुग्णवाहिका वापरात असते. परिणामी त्यावेळेला एखाद्या रुग्णाला रुग्णवाहिकेची गरज भासल्यास आरोग्य विषयक अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासाठी अतिरिक्त कार्डियाक रुग्णवाहिका मिळावी, अशी मागणीदेखील आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी केली. सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सार्वजनिक आरोग्य परिचारिकांच्या ४ हजार ३०० रुपये ग्रेड पे मिळण्यासाठी चा ठराव मंजूर होऊनदेखील हा विषय अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे या मागणीची लवकरात लवकर पूर्तता करावी, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी यावेळी केली.

अंगणवाडी मदतनीस या पदावरून अंगणवाडी सेविका या पदावर पदोन्नतीने मिळालेल्या कर्मचाऱ्यांना मुख्य सेविका व पर्यवेक्षिका या पदाच्या परीक्षेत बसण्यास परवानगी देण्याची मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी याप्रसंगी सभागृहात केली. अंगणवाडी सेविका यांना मुख्य सेविका व पर्यवेक्षिका पदाच्या परीक्षेत बसण्यास शासनाकडून संधी उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु समशिक्षणावर भरती झालेल्या अंगणवाडी मदतनीस मात्र सदरच्या परीक्षेत बसण्यास परवानगी नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यामुळे शासनाने त्यांना या पदाच्या परीक्षेत बसण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी सभागृहात केली.

आमदार देवेंद्र कोठे यांनी शहरातील विविध समाज घटकांच्या प्रश्नांना सभागृहात वाचा फोडल्यामुळे या प्रश्नांच्या सोडवणुकीला गती मिळाली आहे.

#### आमदार देवेंद्र कोठे यांच्या मागण्यांना दोन्ही मंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडलेल्या अंगणवाडी मदतनीसांच्या प्रश्नावर बोलताना महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी अंगणवाडी मदतनीस यांच्या पदोन्नतीबाबत सकारात्मक पावले उचलणार असून अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढवण्याबाबतही शासन सकारात्मक असल्याचे सांगितले. तर आरोग्य मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनीही आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडलेला प्रश्न समजून प्रश्नांची सोडवणूक करणार असल्याचे सांगितले.

#### आमदार देवेंद्र कोठे यांनी मानले तालिका सभापतींचे आभार

पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर बोलण्याची वेळ संपलेली असतानाही आमदार देवेंद्र कोठे यांनी सर्वसामान्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या प्रश्नांवर बोलण्याच्या केलेल्या विनंतीला मान देऊन तालिका सभापती समाधान आवताडे यांनी बोलण्याची संधी दिली. त्याबद्दल आमदार देवेंद्र कोठे यांनी त्यांचे आभार मानले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४८८

**बुडतो भवसागरी । मज काढी बा मुरारी ।।**

अनेक मोठमोठे सागर असले तरीही भवसागर हा भयानक सागर आहे, हे सत्य आहे. भवसागराला मायेचा सागर असेही म्हणतात. दुसऱ्या शब्दांत संसार हा मायेचा सागर आहे. हा मायेचा सागर सांसारिक जीवाला सहजपणे आपल्यात विलिन करून घेतो. खरे म्हणजे मानवी जीवन हे या मायासागरातून बाहेर पडण्यासाठी आहे. या महासागरातून त्यालाच बाहेर पडता येते, जो मी कोण आहे? या प्रश्नाचे खरे उत्तर जाणतो. नाशवंत देहाच्या आणि सत्ता, संपत्तीच्या बळावर जो स्वत:ला मी म्हणतो तो या मायासागरातून बाहेर पडू शकत नाही. मीपणा म्हणजेच या सागरात बुडवण्याचे प्रभावी साधन होय. याच्या उलट हा नाशवंत देह म्हणजे मी नव्हे असे समजणे म्हणजे या मायासागरातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधणे होय. ज्याकडे मीच शिल्लक राहात नाही, त्याच्याकडे ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, लोभ आदि शिल्लक राहात नाहीत. या सर्वांचे अस्तित्व नसणे म्हणजे मायासागरात पोहण्याचा किंवा तरून जाण्याचा बिनअडथळ्याचा मार्ग सापडणे होय. असा मार्ग सापडण्यासाठी संतसहवास आवश्यक असतो. संत सहवासाने तरता येते हे सत्य आहे. आपणही इतर जीवाप्रमाणे माया, मोह, मत्सर, काम, क्रोध आदिचे दगड धोंडे सोबत घेऊन या मायासागरात बुडत आहोत. पण आता संत सहवास लाभल्याने आपण यातून तरून जाऊ. यासाठी पांडूरंगांनी कृपा ठेवावी.



**बुडतो भवसागरी । मज काढी बा मुरारी ।।,**

अशी सेनाजींनी पांडूरंगाला विनंती केली आहे. सेनाजी महाराजांना अशी विनंती करण्याची आवश्यकता नाही, असे आम्हास वाटते. कारण ते सदैव पांडुरंगांच्या कृपाछत्रातच आहेत. तरीही त्यांनी अशी विनंती केली आहे, यावरुन आपण किमान संतांना तरी विनंती केली पाहीजे, असे आम्हास वाटते.

माया ही सांसारिकाला तिची अनुभूती दिल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे संसाराच्या मायासागराने कमी अधिक प्रमाणात संतांनाही त्याची अनुभूती दिली आहे, असे म्हणता येईल. चोखोबारायांचे मेहुणे वंका महाराज या मायासागरातून बाहेर काढण्याची विनंती भगवंताला करतांना, **भवाचिया डोहीं बुडतों वेळोवेळां । कां न ये कळवळा तुज देवा ।।, वंका म्हणे तुम्ही जरी मोकलिलें । कवणातें वहिले शरण जाऊं ।।,** असे म्हणतात. भगवंता तूच मला या मायाजाळातून बाहेर काढ. तुज जर बाहेर नाही काढले तर मग मी कोणाकडे जाऊ. खरे आहे, माया हा त्याचाच खेळ असल्याने तोच या मायाजाळातून बाहेर काढू शकतो. संतांना या मायाजाळातून बाहेर पडावे वाटते. संसारिकाला संसार मायाजाळ वाटतच नाही. त्यामुळे बाहेर पडण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. संत वचन वाचले पाहीजेत. म्हणजे संसार मायाजाळ असल्याचे लक्षात येते. संसारात राहून संसारापेक्षा वेगळे राहण्याचे संत शिकवतात. संतांची ही शिकवण संसाराच्या मायाजाळातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवते. जीवनाचा आनंद घ्यायचा असेल तर मायाजाळातून बाहेर पडता आले पाहीजे. जय जय राम कृष्ण हरी ।।.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. १ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ कृ. प्रतिपदा**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- पूर्वाषाढा (०६.५०)**
**योग - ऐंद्र (१६.०३)**
**करण - तैतिल (२०.३९)**
**राहू काल : बुधवार**
**दु. १२.०० ते ०१.३०**

**दिनविशेष :**

**महाराष्ट्र कृषी दिन:** महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे जनक आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती.

**राष्ट्रीय डॉक्टर दिन :** पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि प्रसिद्ध डॉक्टर बिधान चंद्र रॉय यांच्या जन्म व स्मृतिदिन.

**चार्टर्ड अकाउंटंट दिन:** सन १९४९ मध्ये 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' ची स्थापना झाली.

**जीएसटी दिन:** १ जुलै २०१७ रोजी भारतात 'वस्तू आणि सेवा कर' लागू करण्यात आला,

# चेंडोमिलन वाद्य, कांतारा नृत्याविष्काराने कारहुणवी सोहळ्याला चार चाँद

## १५० वर्षांची परंपरा उत्साहात; हजारो नागरिकांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

शेळगी येथील माजी पोलिस पाटील श्री जगदीश मल्लिकार्जुन पाटील यांच्या घराण्याच्या वतीने गेल्या सुमारे दीडशे वर्षांपासून अखंडपणे साजरा होत असलेला कारहुनवी (बैलपोळा) उत्सव यंदाही पारंपरिक उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. यंदाच्या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते केरळ येथून विशेष निमंत्रित करण्यात आलेले चेंडोमिलन वाद्याविष्कार आणि कांतारा नृत्याविष्कार. या दोन्ही कलाप्रकारांनी उपस्थितांची मने जिंकत संपूर्ण मिरवणुकीला वेगळीच रंगत आणली.

उत्सवाची सुरुवात सकाळी मानकरी श्री जगदीश मल्लिकार्जुन पाटील यांच्या वाड्यासमोर गाय आणि बैलांच्या विधिवत पूजनाने झाली. नैवेद्य अर्पण केल्यानंतर परंपरेनुसार मानाच्या सहा बैलजोड्यांना पाटील वाड्यासमोर भाशिंग बांधण्यात आले. त्यानंतर शेळगी गावठाणातून बैलजोड्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान केरळच्या पारंपरिक ढोलवादनाचा आविष्कार असलेल्या चेंडोमिलन वाद्यपथकाने दमदार तालांवर वातावरण भारावून टाकले. त्याचबरोबर लोककला आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा कांतारा नृत्याविष्कार पाहण्यासाठी पंचक्रोशीतश्ील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ढोलांच्या गजरात आणि नृत्याच्या आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण मिरवणुकीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मिरवणुकीच्या मार्गावर शेळगी परिसरातील सुवासिनींनी बैलजोड्या तसेच मानकरी श्री जगदीश पाटील यांचे औक्षण करून पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. गावातील प्रमुख मार्गांवर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अनोख्या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घेतला. मिरवणूक गावच्या वेशीवर पोहोचल्यानंतर परंपरेनुसार मानाचा कर तोडण्यात आला आणि कारहुनवी सोहळ्याची सांगता करण्यात आली. या सोहळ्यास श्री सिद्धेश्वर जत्रेचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू, नंदीफणाचे मानकरी सोमनाथ मेंगाने, मल्लिकार्जुन देवस्थानचे ट्रस्टी अध्यक्ष श्री जगदीश मल्लिकार्जुन पाटील, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शैलेश पाटील, नगरसेवक अविनाश पाटील, केदार पाटील, विश्वजीत नंदीमठ, शिवानंद मेंडके, दिलीप पाटील, राजशेखर पाटील, रेवणसिद्ध यलशेट्टी, सिद्धाराम धप्पाधुळे, नागनाथ बाळशेट्टी, चंद्रकांत रमणशेट्टी, कल्याणी बोरगावकर, अनिल यलशेट्टी, अनिल पाटील, चंद्रकांत पाटील यांच्यासह शेळगी परिसरातील ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दीडशे वर्षांची परंपरा जपत आधुनिक सांस्कृतिक सादरीकरणाची जोड दिल्याने यंदाचा कारहुनवी उत्सव विशेष आकर्षणाचा ठरला.



## सोमपा मुलींची उर्दू शाळा सेंट्रल येथे शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. ३० जून-**

समाचार चौक येथील सोलापूर महानगरपालिका मुलांची उर्दू सेंट्रल शाळा येथे विद्यार्थिनींना इनफ़क़क फिसाबिलिल्लाह ग्रुपच्यावतीने मोफत शैक्षणिक साहित्य वाटप जमाते अहले हदीसचे प्रमुख मौलाना ताहेर बेग मोहमदी, जाकिर पठान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका शाहीन शेख व सर्व शिक्षक वर्ग, समाज सेवक बादशाह शेख, मौलाना अनवर मुत्तावली, मौलाना फुरकान रामपुरे, युनुस शेख, सैफुल्लाह शेख, याहया शेख, ओसामा बेग, रियाज पटेल, माजीद बागवान आदि उपस्थित होते.

## सिद्धेश्वर आर्किटेक्चर डिप्लोमा विभागाचा एमएसबीटीई परीक्षेचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई) मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या एप्रिल २०२६ मधील परीक्षेत येथीलश्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, डिप्लोमा इन आर्किटेक्चर विभागातील प्रथम वर्ष डिप्लोमा इन आर्किटेक्चरचा एकूण निकाल ८२ टक्के तर द्वितीय व तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला.

नुकत्याच सुरू झालेल्या महाविद्यालयाने प्राप्त केलेले यश हे उल्लेखनीय असल्यामुळे सर्व स्तरांवरून महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक होत आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यानी त्यांचे कौतुक केले आहे.

**गुणानुक्रमे यशस्वी विद्यार्थी : प्रथम वर्ष :** श्रुतिका एस. बंदी (८५.५० टक्के), आदित्य राठोड यांनी (८४.२५) कनक एस. पटेल (८३.१३), **द्वितीय वर्ष :** अनिकेत सुरवसे (८०.३४ टक्के), ज्योती एस.चलगेरी (७३.४९), साक्षी एस. गवळी (७२.४६)

**तृतीय वर्ष :** आकांक्षा पोटाबत्ती (८७.८० टक्के), श्रुती विडप ( ८६.२०)ज्योतीरादित्य लोहार (८२.२०).



## डॉ. अंबादास भासके यांना आदर्श प्राध्यापक पुरस्कार

**सोलापूर, दि. ३० जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील प्रा. डॉ. अंबादास भासके यांना आदर्श प्राध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात हा पुरस्कार प्रा. डॉ. औदुंबर मस्के, माजी नगरसेवक बबलू गायकवाड, पत्रकार संगप्पा कांबळे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सूत्रसंचालन सुधाकर कसबे व मनिषा तुपसाखरे यांनी केले, तर डॉ. सिद्धार्थ तळभंडारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कसबा गणपतीच्या रथोत्सवात शेतकऱ्यांचा गौरव

### शहरातून उत्साहात मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

शहरातील कसबा गणपतीच्या वतीने सोमवारी सायंकाळी पारंपरिक उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, भक्तिमय वातावरण आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी कसबा गणपती शेतकरी संघटनेच्या वतीने विविध भागांतील कष्टकरी शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शेती आणि अन्न उत्पादनासाठी शेतकरी देत असलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



मिरवणुकीत गणेशभक्तांसह शेतकरी, संघटनेचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "बळीराजा हा देशाचा खरा आधार आहे," हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

उपस्थितांनी शेतकऱ्यांच्या सन्मानाच्या या अभिनव उपक्रमाचे स्वागत करत कौतुक व्यक्त केले. कसबा गणपती शेतकरी संघटनेच्या या उपक्रमामुळे धार्मिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली असून, अन्नदात्या शेतकऱ्यांप्रती समाजाचा आदर आणि कृतज्ञतेची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## एमआयडीसी पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन; गावठी कट्ट्यासह तरुणाला अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

एमआयडीसी पोलिसांनी आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवित असताना एका तरुणाला गावठी कट्ट्यासह अटक केली आहे. नितीश अनिल चव्हाण (वय ३२, रा. स्वामी समर्थ मंदिर शेजारी, शिवाजी नगर, बाळे, मूळ रा. होटगी, ता. दक्षिण सोलापूर) असे त्या अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत२७ जून रात्री ११ ते २८ जून पहाटे ४ वाजेपर्यंत कोंबिंग ऑपरेशन राबवण्यात येत होते. या दरम्यान, एमआयडीसी पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सोलापूर-अक्कलकोट रोडवरील बीएसएनएल टॉवरजवळ सर्व्हिस रोडवर एक इसम संशयितरीत्या येणार असून, त्याच्याकडे गावठी कट्टा आहे.या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, कमरेला लपवलेला गावठी कट्टा पोलिसांना मिळून आला. सदरची कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त प्रितम यावलकर, सहायक पोलीस आयुक्त प्रताप पोमण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि उल्फाज शेख, राकेश पाटील, सुहास अर्जुन, नागेशसिंग चव्हाण, अमरसिंग शिवसिंगवाले, अविनाश दिगोळे यांनी बजावली आहे.

## हत्तरसंग येथे शिडीवरून पडल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ३० जून-**

शिडीवर चढताना खाली पडून एक वृद्ध महिला जखमी झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथे घडली. महादेवी रुद्राया बिराजदार (वय ६८ वर्ष राहणार हत्तरसंग ) असे त्या महिलेचे नाव असून त्या २७ जून रोजी सकाळी माझ्या घरामध्ये सीडीवर चढत असताना चक्कर येऊन खाली पडल्या . जखमी झाल्याने त्यांना खाजगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मुलगा सिद्धाराम यांनी आज सोमवारी दुपारी दाखल केले.

## गिझरचे गरम पाणी अंगावर पडल्याने तिघे जखमी

### पाथर्डी येथील घटना

**सोलापूर, दि. ३० जून-**

गिझरचे गरम पाणी अंगावर पडल्याने झोपेतील तिघेजण जखमी झाल्याची घटना कळंब तालुक्यातील पाथर्डी येथे आज सोमवारी पहाटे एक वाजता घडली.

अभिजीत आप्पासाहेब सावंत (वय १८ वर्षे), स्वाती बळीराम पाटील (वय ५० वर्षे ) आणि आप्पासाहेब सुंदरराव सावंत (वय ५० वर्ष, तिघे राहणार पाथर्डी) अशी जखमी मुलगा व आई वडीलाचे नावे असून ते रविवारी रात्री घरात झोपले असता गिझर मध्येगरमकरूनठेवलेल्यापाण्याच्या कँटला पायाचा धक्का लागला. त्यामुळे त्यातील गरम पाणी अंगावर पडले. आई व मुलगा भाजले गेले तर वडील आप्पासाहेब हे किरकोळ जखमी झाले. तिघांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयाचा आज सोमवारी पहाटे पाच वाजता भाऊ प्रशांत सावंत यांनी दाखल केले.

## 'सह्याद्री'मध्ये डी.फार्मसी प्रवेशासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० जून-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे प्रथमवर्ष पदविका/डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले यांनी दिली.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता डी.फार्मसी प्रवेश बाबत मोफत मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे. या सुविधा केंद्रामध्ये बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पदविका (डी.फार्मसी) प्रथम वर्ष प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज दि.३० जून ते दि.१५ जुलै दरम्यान स्वीकारले जाणार आहेत. तात्पुरती मेरिट लिस्ट दि.१७ जुलैला तर अंतिम मेरिट लिस्ट दि.२१ जुलै रोजी आहे.

तरी अधिक माहितीसाठी डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), प्रा.सुरज मणेरी (८००७२२१०८७), प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), पी.एस. लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.



## सौरऊर्जेवर पाणी शुद्धीकरण

### ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचा नाविन्यपूर्ण प्रकल्प

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने येथील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेवर आधारित पाणी शुद्धीकरण प्रणाली विकसित केली आहे. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर असलेला हा प्रकल्प दुर्गम भागांसाठी आणि जिथे वीजपुरवठा मर्यादित आहे, अशा ठिकाणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पासाठी प्रा. सुधन्वा देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. दुरुग रेहान, फुलारी सागर, गायकवाड मिथिलेश, शेख उमर आणि मेंदगुदळे बसवराज या विद्यार्थ्यांनी एकत्रित प्रयत्नांतून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला. या प्रणालीमध्ये सोलर पॅनेलद्वारे ऊर्जा निर्माण करून बूस्टर पंप, प्री-फिल्टर, सेडिमेंट फिल्टर आणि कार्बन फिल्टरच्या साहाय्याने पाणी शुद्ध केले जाते. १२ व्ही ७ए रिचार्जेबल बॅटरी आणि १२व्हीडीसी ॲडॅप्टरच्या वापरामुळे कमी सूर्यप्रकाशातही ही प्रणाली अखंडितपणे कार्यरत राहते. याव्यतिरिक्त, रिले मॉड्यूलद्वारे सौरऊर्जा व बॅटरी यांच्यातील स्विचिंग स्वयंचलितपणे होत असल्याने ही प्रणाली अधिक ऊर्जा कार्यक्षम ठरते. तसेच, एलईडी इंडिकेटरच्या माध्यमातून प्रणालीची कार्यस्थिती सहज समजते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष. एस. ए. पाटील, एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले आणि यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. बी. गदवाल यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शहर गुन्हे शाखेकडून घरफोडी करणारे दोन आंतरराज्य चोरटे जेरबंद

### साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने विजापूर नाका पोलीस ठाणे हद्दीत भरवस्तीत बंद घर फोडून लाखो रुपयांचे दागिने व रोख रक्कम चोरणाऱ्या आंतरराज्य चोरट्याला गजाआड केले आहे.

या कारवाईत पोलिसांनी सुरजितसिंग राजपालसिंग टाक (वय ३५) व त्याचा साथीदार मंजित कुमार (रा. उत्तर प्रदेश) या सराईत गुन्हेगारांसह चोरीचा माल खरेदी करणाऱ्या लक्ष्मण गणेश रणशिंग (वय २७) आणि संतोष विलास साबळे (वय २९, दोघेही रा. हडपसर, पुणे) ,अब्दुल वहिद अब्दुल कादर शेख (वय ४५, रा. रविवार पेठ, पुणे; मूळ रा. पश्चिम बंगाल) या ३ सराफांनाही अटक केली असून, सुमारे १० लाख ६३ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि. २५ मे २०२६ रोजी रात्री साडेआठ ते २६ मे रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास, जुळे सोलापूर येथील म्हेत्रे टॉवर जवळ असलेल्या एका बंद घराचे लॉक तोडून अज्ञातांनी प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाटातून तब्बल २१७ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १ लाख २० हजारांची रोख रक्कम असा ऐवज लंपास केला होता. सदर गुन्ह्याच्या तपासात शहर गुन्हे शाखेचे सपोनि शैलेश खेडकर व त्यांच्या पथकाने तपासणी केली. तब्बल पोलिसांनी हडपसर (पुणे) येथे छापा टाकून मुख्य आरोपी सुरजितसिंग राजपालसिंग टाक याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपला साथीदार मंजित कुमार याच्या मदतीने ही चोरी केल्याची कबुली दिली. या कारवाईत पोलिसांनी १५६.५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेले साहित्य असा १० लाख ६३ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर आणि त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार जावेद जमादार, विनोद रजपूत, इम्रान जमादार, धिरज सातपुते, उमेश पवार, सुभाष मुंडे, वसिम शेख, काशिनाथ वाघे, आबा सावळे, सैपन सय्यद, विठ्ठल यलमार, राजू मोरे, सिद्धाराम देशमुख, अजय गुंड, अंकुश भोसले, बापू साठे, महेश शिंदे, अनिल जाधव, महेश रोकडे, शैलेश बुगड, महेश पाटील, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक सतीश काटे, बाळासाहेब काळे व मारुती घोरपडे यांच्या पथकाने बजावली आहे.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी ५ हजार ४०० कोटी

## कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे अभिवचन

## करमाळा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे 'मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था' असे नामांतर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

राज्यभरातील सर्व विद्यार्थ्यांना सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून त्यांच्या आवडीचे तसेच कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी पुढील पाच वर्षात एकूण ५ हजार ४०० कोटीचा निधी खर्च करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

या कार्यक्रमास आमदार नारायण पाटील, माजी आमदार राम सातपुते, नगराध्यक्ष मोहिनी सावंत, जिल्हा परिषद सदस्य रश्मी बागल, प्रमुख पाहुणे सुनील आंबेकर, औद्योगिक प्रशिक्षण संचालक सतीश सूर्यवंशी, सहसंचालक चंद्रशेखर ठेगडे, कौशल्य रोजगार उद्योजकता सह आयुक्त संगीता खंदारे, प्रा. मनोज बिडकर यांच्यासह विविध मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच विद्यार्थीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. लोढा पुढे म्हणाले की, राज्य शासनाने पुढील पाच वर्षात ५ हजार ४०० कोटीचा निधी उपलब्ध करून सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे आधुनिकीकरण करून कौशल्य आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच येत्या ६ महिन्यांच्या कालावधीत टाटा उद्योग समूहाच्या आर्थिक सहकार्यातून प्रत्येक जिल्ह्यात दोन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा तसेच राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक संस्थेत शॉर्ट टर्म कोर्सही सुरू करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.

शहराबरोबरच गावातील युवकांना कुशल बनवण्यात येईल, असा भर देत गाव आणि देश आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी कौशल्य विकास महत्त्वाचा आहे. मदनदास देवी यांच्या कार्याच्या प्रेरणेतून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शासनाच्या वतीने मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतर करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

मदनदास देवी यांचा जन्म करमाळ्यात झाला असून, विद्यार्थ्यांसाठी आणि देशासाठी केलेल्या त्यांच्या कार्यामुळे करमाळा वाशीयांसाठी अभिमान आणि प्रेरणेची बाब आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती व शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे, असे आवाहन श्री. लोढा यांनी केले. यावेळी आमदार नारायण आबा पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा नामांतर समारंभ पार पडला. या प्रसंगी कोनशिलाचे अनावरण करण्यात आले. तसेच वृक्षारोपण करून व्यासपीठावर स्वर्गीय मदनदास देवी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक मनोज बिडकर यांनी केले, आभार आयएमसीचे चेअरमन खुशालचंद राठी यांनी व्यक्त केले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा

या कार्यक्रमाच्या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदनदास देवी यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्याविषयी गौरवउद्गार काढले. तर या प्रशिक्षण संस्थेचे नामांतर मदनदास देवी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे झाल्याने विद्यार्थ्यांच्या मनात त्यांचे प्रेरणादायी विचार सदैव राहतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री यांनी चित्रफितीच्या माध्यमातून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे...




### ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेला समाजसेवक पुरस्कार

**बार्शी, दि. ३० जून-**

प्रबुद्ध भारत चारिटेबल ट्रस्ट अंतर्गत श्रावस्ती बुद्ध विहार बार्शी येथे समाजात कुशल कर्म करणाऱ्या सेवाभावी संस्थेचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी या संस्थेचा सन्मान खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे तसेच ट्रस्टचे अध्यक्ष विष्णू कांबळे व टी.एस. मोरे यांच्या हस्ते समाजसेवक पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे सदस्य गणेश सातारकर यांनी स्वीकारला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, सचिव अजय तिवारी, सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार माणकोजी ताकभाते, सुनील फल्ले, सुरेंद्र स्वामी, सायरा मुल्ला, सुनिता गायकवाड उपस्थित होते. अध्यक्ष राहुल वाणी यांनी हा पुरस्कार आपल्या संस्थेस समाजसेवेसाठी मिळाला असला तरी खरा अर्थाने या पुरस्काराचे मानकरी संस्थेस बार्शीतील दानशूर व्यक्ती, मित्र परिवार, संस्थेतील सदस्य तसेच नाव न टाकणाऱ्या अटीवर जे आर्थिक स्वरुपात मदत करतात त्यांचा हा सन्मान आहे. तेव्हा हा सन्मान मी सर्व बार्शीकरांना समर्पित करतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे श्रावस्ती बुद्ध विहार बार्शी, माता रमाई महिला मंडळाचे अध्यक्ष व सर्व सदस्य यांनी जो पुरस्कार आम्हाला दिला त्याबद्दल तसेच या सन्मान सोहळ्यासाठी संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित राहिल्याबद्दल अध्यक्ष राहुल वाणी यांनी आभार मानले.



### पुन्हा स्वामी सेवेची संधी मिळाली हे परमभाग्य : डीवायएसपी टाकणे

**अक्कलकोट दि. ३० जून-**

हजारो किलोमीटर वरून लोक स्वामीच्या दर्शनार्थ येतात. तीर्थक्षेत्र अक्कलकोट स्वामीच्या चरणी सेवा सादर करतात. आठच महिन्यापूर्वी अक्कलकोटहून नांदेडला बदली झाली. पुन्हा अक्कलकोटवासीयांची सेवा करण्याची व स्वामी च्या सेवेची व स्वामीच्या दर्शन सेवेची संधी लाभली. हे माझे परम भाग्यच आहे, असे भावपूर्ण गौरवोदगार विभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे यांनी काढले. विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार यांची पुणे येथे बदली झाली. अक्कलकोट विभागीय पोलीस अधिकारीपदी राजेंद्र टाकणे यांनी नुकताच पदभार स्विकारला. याप्रसंगी विभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे बोलत होते.



### मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात वटपौर्णिमेचा सण साजरा

**मंगळवेढा, दि. ३० जून-**

मंगळवेढा शहर व ग्रामीण भागात घरोघरी महिलांनी भारतीय संस्कृतीमधील वटपौर्णिमेचा सण वडाच्या झाडाची पूजा करुन सात फेऱ्या मारुन जन्मोजन्मी हाच पती मिळो व त्याला दिर्घायुष्य लाभो, अशी मनोभावे प्रार्थना सौभाग्यवती महिलांनी केली. यंदा २९ जून रोजी वटपौर्णिमेचा सण आला असून या पार्श्वभूमीवर घरोघरी महिलांनी घराची स्वच्छता करुन घराच्या अंगणात वटवृक्षाचे झाड रांगोळीच्या माध्यमातून काढल्याचे चित्र होते. ग्रामीण भागात तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर मंदिराच्या आवारात असलेल्या पुरातन वडाच्या झाडाला पुजण्यासाठी ब्रम्हपुरी, माचणूर, रहाटेवाडी, मुंढेवाडी, बेगमपूर व अन्य गावातून महिलांनी येवून मनोभावे पूजा केली.



### मंद्रुप परिसरात कारहुणवी सण उत्साहात

**मंद्रूप, दि. ३० जून-**

मंद्रूपसह परिसरात शेतीशी आणि मातीशी असलेले नाते जपणारा पारंपरिक कारहुणवी सण उत्साहात साजरा करण्यात आला. वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलजोडीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी बैलांचे पूजन करून पारंपरिक पद्धतीने सण साजरा केला. कारहुणवीनिमित्त बैलांना अंघोळ घालून त्यांना आकर्षक झुल, रंगीत दोरे व टिपऱ्यांनी सजविण्यात आले. शिंगांना रंग देऊन बैलजोडीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गोमातेचेही पूजन करण्यात आले. शेतकरी कुटुंबांनी बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवत पंचारतीने ओवाळून त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मंद्रूप येथील मेंडगुदले वस्तीवर धुंडाप्पा मेंडगुदले यांच्या हस्ते बैलजोडीचे पूजन करण्यात आले. यावेळी बसप्पा मेंडगुदले, संजय मेंडगुदले, उमेश मेंडगुदले, एकानंद मेंडगुदले, नागेश मेंडगुदले उपस्थित होते.

# शहरात १ ते ९ जुलै दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम

## मनपाच्या सर्व विभागांचा राहणार समन्वय

## रस्ते, नाले परिसर, भंगार व बेवारस वाहनांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेकडून १ ते ९ जुलैदरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या पुढाकाराने ही मोहीम शहरातील सर्व २६ प्रभागांत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती नियंत्रण अधिकारी शशिकांत भोसले यांनी दिली.



महापौर विनायक कोंड्याल आणि महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली विविध विभागांच्या समन्वयातून व्यापक स्वरूपात ही कारवाई केली जाणार आहे. या मोहिमेत शहरातील रस्त्यांची सर्वंकष स्वच्छता, दुभाजकांमधील माती काढणे, अनावश्यक गवत व झाडी-झुडपे हटविणे, वृक्षारोपण, विद्युत खांबांवरील जुने फलक व स्टिकर्स काढणे, रस्त्याव१रील बांधकामाचा मलबा हटविणे तसेच परिसरातील भंगार साहित्य, बेवारस वाहने आणि मोटारसायकली हटविण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

ही मोहीम केवळ घनकचरा व्यवस्थापन विभागापुरती मर्यादित नसून महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येणार आहे. विभागीय अधिकारी, सहाय्यक अभियंते, उद्यान अधीक्षक, सार्वजनिक आरोग्य अभियंते, अतिक्रमण प्रतिबंधक विभाग, संगणक प्रोग्रामर, मुख्य सफाई अधीक्षक, सफाई अधीक्षक, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, पर्यवेक्षक व कर्मचारी यांचा यात सहभाग राहणार आहे.

याशिवाय अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त यांच्यासह महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, लोकप्रतिनिधी व नगरसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक या विशेष स्वच्छता मोहिमेला यशस्वी करण्यासाठी शहरातील नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन नियंत्रण अधिकारी शशिकांत भोसले यांनी केले आहे.



# राजस्वनगर येथे योगदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

गीता सखी योगा ग्रुप राजस्वनगर व लिनस ग्रुपकडून राजस्वनगर सांस्कृतिक भवन येथे योग दिवस संपन्न झाला. गीता भालेराव यांनी २०११ पासून महिलांसाठी सुरु केलेला योगावर्ग अजूनही रोज सकाळी नियमितपणे चालू असून विनामुल्य घेतला जातो. कार्यक्रमास प्रमुख अतिथी सुवर्णा बुंदाले, योग शिक्षिका माधुरी आवटे, लिनस अध्यक्षा प्रविणा सोळंकी, अनुराधा तपसाळे, अंजली अनिखिंडी, अंजली जाधव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात अतिथी यांच्या हस्ते ओमची पूजा व दीप प्रज्वलन करुन झाली. सूत्रसंचालन उर्मिला बचुटे यांनी केले. कार्यक्रमासाठी हेमा जाधव, जयश्री जाधव, दीपा बाबर, अनिता मल्लाव, सुवर्णा सोनकांबळे, आशा मगर, संतोष शिवशरण यांनी परिश्रम घेतले.

# अनधिकृत चर्च प्रकरणाची चौकशी

## राज्य सरकार आणि मनपा ॲक्शन मोडमध्ये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

बापूजीनगर येथील शासकीय समाजमंदिराचा कथित बेकायदेशीरपणे चर्च म्हणून वापर, तसेच सोलापूर महापालिकेतील लिपिक दत्तात्रय कानेपागूल उर्फ येहान मार्क कानेपागूल यांच्या कथित गैरकृत्यांची सखोल चौकशी करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त सोनाली यादव यांना तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पाठपुरावा हिंदू जनजागृती समिती आणि हिंदू राष्ट्र सेनेने केला होता.

दरम्यान, राज्याचे विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनीही जिल्हाधिकाऱ्यांना संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. माजी मंत्री आमदार सुभाष देशमुख यांनीही या प्रकरणात तातडीने कारवाईची मागणी केली होती.

तक्रारीनुसार, समाजमंदिराचा मूळ करार संपल्यानंतरही त्याचा चर्च म्हणून वापर,



ध्वनिक्षेपकाचा त्रास, धर्मांतराचे प्रयत्न आणि धार्मिक भावना दुखावणारी वक्तव्ये होत असल्याचा आरोप आहे. तसेच कानेपागूल यांनी अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा लाभ घेऊन शासकीय नोकरी मिळवली असून सध्या ते ख्रिस्ती धर्म स्वीकारून 'जिजस गॉस्पेल सोसायटी'चे मुख्य पास्टर म्हणून कार्यरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हिंदू जनजागृती समितीने संबंधित भाडेकरार रद्द करून वास्तू सील करावी, संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंग व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. चौकशीअंती दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा समितीचे राज्य संघटक सुनील घनवट यांनी दिला आहे.

# एस. ई. एस. तंत्रनिकेतनचा तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२६च्या परीक्षेत एस. ई. एस. तंत्रनिकेतनचा तृतीय वर्षाचा निकाल १०० टक्के लागला असून ३८६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ३१३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. १४ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व आणि कौतुकास्पद यशाबद्दल एस. ई. एस. तंत्रनिकेतनचे सचिव ॲड. व्ही. व्ही. मराठे, व्हाइस चेअरमन सीए विजय जवळगीकर, तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभागांचे विभागप्रमुख प्राध्यापक वर्ग, शैक्षणिक समन्वयक, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

**गुणवंतांची विभागनिहाय टॉपर यादी**

**संगणक अभियांत्रिकी:** प्रथम वर्ष: दिक्षित विनायक (९३.५३%), द्वितीय वर्ष: हब्बु श्रिया (९१.९४%), तृतीय वर्ष: सुभेदार अमीना (९६.१२%)

**स्थापत्य अभियांत्रिकी :** प्रथम वर्ष: अँथनी शार्लिन (८६.६३%), द्वितीय वर्ष: सालुंके विनय (७९.६६%), तृतीय वर्ष: सिद्राल देवराज (८९.००%)

**इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन:** प्रथम वर्ष: पूनम केदारी (७९.७६%), द्वितीय वर्ष: कोकाटे ओंकार (८५.८८%), तृतीय वर्ष: सांगा अक्षता (९१.३१%)

**विद्युत अभियांत्रिकी विभाग:** प्रथम वर्ष: इनामदार गौरी (८६.३५%), द्वितीय वर्ष: गायकवाड अजिंक्य व कोहिंकर ओजस्विता (प्रत्येकी ८१.८८%), तृतीय वर्ष: माशाळे राधा (९०.३३%)

**यंत्र अभियांत्रिकी विभाग:** प्रथम वर्ष: खानापूरे पार्थ (८७.६७%), द्वितीय वर्ष: हवगोल समर्थ (८७.८८%), तृतीय वर्ष: हिरोळी योगेश (८८.००%)

# भालगाव ग्रामपंचायत भष्टाचारप्रकरणी उपोषण स्थगित

## तीन दिवसांत चौकशीचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जून-**

तालुक्यातील भालगाव ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराच्या चौकशीच्या मागणीसाठी माजी सैनिक व माजी उपसरपंच देवदत्त दराडे यांच्यासह ग्रामस्थांनी सोमवारी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. विस्तार अधिकारी दीपक चव्हाण व कुलकर्णी यांनी आंदोलकांशी चर्चा केली. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी तक्रारीतील सर्व मुद्द्यांची तीन दिवसांत चौकशी करून अहवालानुसार दोषींवर योग्य कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

दराडे यांनी भालगाव ग्रामपंचायतीत १५ वा वित्त आयोग व इतर शासकीय निधीचा गैरवापर करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. तसेच माहिती अधिकारांतर्गत विकासकामांची कागदपत्रे मागविण्यासाठी त्यांनी २०,७०० रुपये भरले, मात्र ग्रामसेवक रामेश्वर चौरे यांनी आजतागायत माहिती दिली नसल्याचा दावा केला आहे. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी १५ दिवसांत माहिती मोफत देण्याचे आदेश दिले होते. मात्र त्याचीही अंमलबजावणी झाली नसल्याचे दराडे यांनी सांगितले. माजी सरपंच व ग्रामसेवक यांच्या संगनमताने खोटी व दुबार बिले, न झालेल्या विकासकामांचा निधी हडप करणे आदी गैरप्रकार झाल्याचा आरोप करत संबंधित कागदपत्रे जाणीवपूर्वक लपवली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



कायदेशीर आणि शांततेच्या मार्गाने आम्ही गावात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत शासनाच्या पैशाचा होत असलेला गैरव्यवहार याबाबत प्रशासनाला माहिती विचारत आहोत. मात्र प्रशासन कोणतीही माहिती देत नाही. याला ग्रामसेवक रामेश्वर चौरे, पंचायत समितीचे अभियंता आणि अधिकारी जबाबदार आहे. यामुळे गटविकास अधिकारी यांच्यावर कोणतेही कारवाई करत नाही म्हणून उपोषणाला बसलो होतो. आज लेखी आश्वासन दिलं आहे. सात दिवसात कार्यवाही नाही झाली तर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

- **देवदत्त दराडे,** माजी सैनिक भालगाव उपोषणकर्ते

# दिलेली केस मागे घे म्हणून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३० जून-**

पोलिसात दिलेली केस मागे घे असे म्हणून एका तरुणाला आठ दहा जणांनी कोयत्याने मारहाण केल्याची घटना दे गाव नाका भागातील हब्बू वस्ती येथे आज मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता घडली.

सिद्धार्थ मल्लिनाथ कोरे (वय २२ वर्षे , रा . हब्बू वस्ती , सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो आज सोमवारी दुपारी जगताप हॉस्पिटल जवळ असताना त्याला रमजान गफूर शेख सर आठ ते दहा जणांनी मिळून पोलिसात दिलेली केस मागे घे या कारणावरून कोयत्याने मारहाण केली . यात खांद्याला जखम झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात मित्र अजय नागमोडे यांनी दुपारी दाखल केले.



# नाट्यमय सामन्यात चार वेळचा विजेता जर्मनी स्पर्धेबाहेर

**बोस्टन, ३० जून**

चार वेळच्या विश्वविजेत्या जर्मनीचा फिफा विश्वचषक २०२६ मधील प्रवास ३२ संघांच्या फेरीतच संपला. १२० मिनिटे १-१ अशा बरोबरीनंतर, पॅराग्वेने पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरी, म्हणजेच अंतिम १६ संघांमध्ये प्रवेश केला. जर्मनी हा चार वेळचा गतविजेता संघ असून, त्यांनी १९५४, १९७४, १९९० आणि २०१४ मध्ये विजेतेपद पटकावले आहे.

गुस्तावो अल्फारोच्या संघाने संपूर्ण सामन्यात उत्कृष्ट बचावात्मक कामगिरी दाखवली आणि जर्मनीच्या आक्रमक खेळाडूंना मोकळेपणाने खेळण्याची संधीच दिली नाही. बहुतेक वेळ चेंडूवर जर्मनीचा ताबा होता, परंतु लेरॉय साने, फ्लोरियन विट्र्झ आणि काय हॅवर्टझ हे पॅराग्वेच्या मजबूत बचाव आणि गोलकीपर ऑर्लँडो गिल यांच्यासमोर सातत्याने निष्प्रभ ठरले.

पहिल्या हाफमध्ये एन्सीसोने पॅराग्वेला आघाडी मिळवून दिली.



सामना जिंकल्यानंतर पॅराग्वेचा गुस्तावो गोमेझ आनंद साजरा करताना

पहिल्या हाफच्या शेवटच्या मिनिटांमध्ये, पॅराग्वेने त्यांच्या काही कॉर्नरपैकी एकाचा फायदा घेतला. मॅन्युएल न्युअरने चेंडू दूर ढकलला, पण पॅराग्वेने पुन्हा ताबा मिळवला. त्यानंतर मॅटियास गॅलार्साने एक अप्रतिम क्रॉस दिला आणि ज्युलिओ एन्सीसोने, कोणताही दबाव नसताना, एक उत्कृष्ट हेडर मारून गोल केला आणि संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या हाफमध्ये, जर्मनीने अधिक आक्रमक भूमिका बजावली आणि ५४ व्या मिनिटाला बरोबरी साधली. काय हॅवर्टझने डाव्या बाजूने आलेल्या फ्लोरियन विट्र्झच्या अचूक क्रॉसवर हेडर मारून गोल केला आणि स्कोअर १-१ असा बरोबर केला.

त्यानंतर जर्मनीने विजयी गोलच्या शोधात आक्रमण सुरू ठेवले, तर पॅराग्वेने हळूहळू आपला संपूर्ण संघ बचावात्मक पवित्र्यात आणला आणि प्रतिआक्रमणाच्या संधीची वाट पाहू लागला. तथापि, त्यांना अशी कोणतीही संधी साधता आली नाही.

जर्मन प्रशिक्षक ज्युलियन नागेल्समन यांनी पेनल्टी टाळण्यासाठी आपल्या सर्व आक्रमक खेळाडूंना मैदानात उतरवले. जोनाथन टाहने अतिरिक्त वेळेत गोल केला, पण वाल्देमार अँटोनने ऑर्लँडो गिलवर केलेल्या फाऊलमुळे पंचांनी तो गोल अवैध ठरवला. १२० मिनिटांनंतरही गोलसंख्या १-१ अशीच राहिली आणि सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआऊटवर लागला.

आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर जर्मनीने पहिली पेनल्टी घेण्याचा निर्णय घेतला, पण त्यांची सुरुवात खराब झाली. पॅराग्वेचा गोलकीपर ऑर्लँडो गिलने काय हावर्ट्झची पहिली पेनल्टी वाचवली. यानंतर दोन्ही संघांनी गोल आणि पेनल्टी चुकवल्या. अखेरीस, होजे कॅनेलने शांतपणे निर्णायक पेनल्टीचे गोलमध्ये रूपांतर करून पॅराग्वेला ४-३ असा ऐतिहासिक विजय मिळवून दिला. आता हा दक्षिण अमेरिकन संघ १६ संघांच्या फेरीत ४ जुलै रोजी फिलाडेल्फिया येथे फ्रान्स-स्वीडन सामन्याच्या विजेत्याशी सामना करेल.

◂ (वृत्तसंस्था)

## गॅब्रिएल मार्टिनेली ठरला ब्राझीलचा हिरो

### जपानचा २-१ ने पराभव, अंतिम १६ मध्ये प्रवेश

**ह्यूस्टन, ३० जून**

ब्राझीलने फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ ३२ मध्ये उल्लेखनीय झुंझार खेळ दाखवत जपानला २-१ ने हरवून अंतिम १६ मध्ये आपले स्थान निश्चित केले. ह्यूस्टन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या एका रोमांचक सामन्यात, गॅब्रिएल मार्टिनेलीने इंज्युरी टाईममध्ये (९० व्या मिनिटाला) विजयी गोल करून ब्राझीलला एक नाट्यमय विजय मिळवून दिला. कार्लो अँसेलोटीचा संघ आता राऊंड ऑफ १६ मध्ये कोट डी' आयव्होर आणि नॉर्वे यांच्यातील सामन्याच्या विजेत्याशी सामना करेल.

जपानने सामन्याच्या सुरुवातीपासूनच निर्भयपणे खेळ केला. २९ व्या मिनिटाला, ब्राझीलच्या बचावफळीच्या चुकीचा पुरेपूर फायदा घेत, कायशू सानोने चेंडूचा ताबा मिळवला, वेगाने पुढे धावला आणि उजव्या पायाने एका उत्कृष्ट शॉटद्वारे गोल करून जपानला १-० अशी आघाडी मिळवून दिली. जपानसाठी सानोचा हा पहिला आंतरराष्ट्रीय गोलही होता. पहिल्या हाफमध्ये ब्राझीलचे स्टार खेळाडू जपानचा बचाव भेदण्यात अपयशी ठरले आणि जपानने मध्यांतरापर्यंत आपली आघाडी कायम ठेवली.

**अँसेलोटीच्या बदलाने सामन्याचे चित्र पालटले**

दुसऱ्या हाफमध्ये, ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँन्सेलोटी यांनी डावपेच बदलून तरुण स्ट्रायकर अँड्रिकला मैदानात उतरवले. या बदलामुळे ब्राझीलचा हल्ला अधिक धारदार झाला. सततच्या हल्ल्यांच्या दबावाचे अखेर ५६ व्या मिनिटाला फळ मिळाले, जेव्हा गॅब्रिएल मॅगाल्हेसच्या अचूक क्रॉसवर कॅसेमिरोने शानदार हेडर मारून गोल केला आणि गोलसंख्या १-१ झाली.

बरोबरीनंतर, ब्राझीलने आक्रमक फुटबॉल खेळणे सुरूच ठेवले. व्हिनिसियस ज्युनियर देखील संघाला आघाडी मिळवून देण्याच्या अगदी जवळ पोहोचला होता, परंतु जपानचा गोलकीपर जेयॉन सुझुकीने शानदार बचाव करून त्याला रोखले. दुसऱ्या एका प्रसंगी, व्हिनिसियसचा शॉट पोस्टला लागला.

**मार्टिनेलीकडून शेवटच्या मिनिटात विजय निश्चित**

सामना अतिरिक्त वेळेत जात असताना आणि तो अतिरिक्त वेळेतच जाईल असे वाटत असताना, ब्राझीलने निर्णायक गोल केला. इंज्युरी टाईमच्या ९० व्या मिनिटाला, ब्रुनो गिमारेसने गॅब्रिएल मार्टिनेलीला एक शानदार पास दिला. मार्टिनेलीने संधी साधत गोलकीपर ज्योन सुझुकीला चकवून चेंडू जाळ्यात टाकला आणि ब्राझीलला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अंतिम शिट्टी वाजताच, ब्राझीलचा संघ आणि त्यांच्या समर्थकांनी विजयाचा जल्लोष केला, तर जपानी खेळाडूंच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती.

◂ (वृत्तसंस्था)



सामन्याच्या शेवटी ब्राझीलचा माथियस कुन्हा जपानच्या आओ तनाकाचे सांत्वन करताना

**जपानने लोकांची मने जिंकली**

पराभव पत्करूनही, जपानने संपूर्ण सामन्यात उत्कृष्ट खेळ केला. शिस्तबद्ध बचाव, वेगवान प्रतिहल्ले आणि पहिल्या सत्रातील दमदार कामगिरीने हे सिद्ध केले की, मोठ्या मंचावर कोणत्याही बलाढ्य संघाला आव्हान देण्याची क्षमता या संघात आहे. तथापि, शेवटच्या मिनिटांमध्ये, ब्राझीलच्या सतत वाढणाऱ्या दबावापुढे जपानचा बचाव अखेर कोसळला आणि विश्वचषकातील आपला पहिला बाद फेरीचा सामना जिंकण्याचे संघाचे स्वप्न पुन्हा एकदा अपूर्ण राहिले.

**आजचे अंतिम-३२ फेरीचे सामने**

**इंग्लंड वि. डीआर काँगो**
**वेळ :** रात्री ९.३० वाजतापासून
**स्थळ :** अटलांटा स्टेडियम, अटलांटा

**बेल्जियम वि. सेनेगल**
**वेळ :** रात्री १.३० वाजतापासून
**स्थळ :** सिएटल स्टेडियम, सिएटल

**अमेरिका वि. बोस्निया ॲण्ड हर्झगोव्हिना**
**वेळ :** पहाटे ५.३० वाजता
**स्थळ :** सॅन फ्रान्सिस्को बे एरिया स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को

# मोरोक्को विजयी, बलाढ्य नेदरलॅण्ड्सही स्पर्धेबाहेर

**बोस्टन, ३० जून**

फिफा विश्वचषक २०२६ च्या राऊंड ऑफ ३२ च्या चौथ्या सामन्यात, व्हर्जिल व्हॅन डाइकच्या नेतृत्वाखालील नेदरलॅण्ड्सचा संघ, अश्रफ हकिमीच्या नेतृत्वाखालील मोरोक्को संघाकडून पराभूत झाला. एस्टाडिओ स्टेडियमवर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्ये मोरोक्कोने हा सामना जिंकला. राऊंड ऑफ ३२ च्या दुसऱ्या दिवशी, दोन सामने पेनल्टी शूटआऊटपर्यंत गेले आणि दोन बलाढ्य फुटबॉल संघ फिफा विश्वचषकातून बाहेर पडले आहेत. मोरोक्कोने नेदरलॅण्ड्सला स्पर्धेतून बाहेर केले आहे.

पूर्ण वेळेनंतर स्कोअर १-१ असाच राहिला. ३० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेनंतरही एकही गोल झाला नाही, त्यामुळे स्कोअर १-१ असाच राहिला. त्यानंतर सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआऊटवर गेला. मोरोक्कोने पेनल्टी शूटआऊटमध्ये नेदरलॅण्ड्सला ३-२ ने हरवून १६ संघांच्या फेरीत प्रवेश केला. मोरोक्कोचे सध्याचे फिफा मानांकन सहावे आहे, तर नेदरलॅण्ड्स सातव्या क्रमांकावर आहे.

गोलरहित पहिल्या हाफनंतर, दुसऱ्या हाफच्या ७२ व्या मिनिटाला गाक्पोने एक शानदार गोल करून नेदरलॅण्ड्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर मोरोक्कोच्या इस्साने इंज्युरी टाईमच्या ९० व्या मिनिटाला गोल करून स्कोअर १-१ असा बरोबर केला. सहा मिनिटांचा इंज्युरी टाईम देण्यात आला. सामना एक्स्ट्रा टाईममध्ये गेला. एक्स्ट्रा टाईमच्या ३० मिनिटांत दोन्ही संघांना गोल करता आला नाही आणि स्कोअर १-१ असाच राहिला. सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला आणि मोरोक्कोने तीन वेळा गोल केले. तथापि, नेदरलॅण्ड्सच्या केवळ दोन खेळाडूंना गोल करता आला.



पेनल्टी शूटआऊटमधील पहिली किक नेदरलॅण्ड्सच्या ट्यून कूपमायनर्सने मारली, ज्याने गोल केला. त्यानंतर मोरोक्कोच्या नेल एल आयनाउईने आत येऊन क्रॉसबारच्या वरून शॉट मारला. मग नेदरलॅण्ड्सच्या जस्टिन क्लेव्हर्टने आत येऊन शॉट मारला आणि चेंडू क्रॉसबारला लागून बाहेर गेला. नेदरलॅण्ड्स १-० ने आघाडीवर होते. मग मोरोक्कोच्या सुफियान रहिमीने आत येऊन गोल केला. स्कोअर १-१ नेदरलॅण्ड्स असा बरोबरीत आला.

मग वाउट वेघॉर्स्टने आत येऊन गोल केला. स्कोअर २-१ नेदरलँड्स असा झाला. मग मोरोक्कोच्या शेम्सडाइन ताल्बीने आत येऊन गोल केला, ज्यामुळे स्कोअर २-२ झाला. त्यानंतर नेदरलॅण्ड्सच्या क्विंटन टिंबरने आत येऊन शॉट मारला, पण त्याचा शॉट गोलपोस्टला लागला नाही. स्कोअर २-२ असा बरोबरीत आला.

मोरोक्कोच्या अश्रफ हकिमीचा गोल चुकला. स्कोअर २-२ असा बरोबरीत आला. आता शेवटचा क्षण होता. नेदरलॅण्ड्सच्या क्रिसेन्सियो समरविलेचा शॉट चुकला. स्कोअर २-२ असा बरोबरीत आला. मोरोक्कोच्या इस्माईल शबारीने गोल केला आणि पेनल्टी शूटआऊटमध्ये मोरोक्कोने सामना ३-२ ने जिंकला.

नेदरलॅण्ड्सने सात गुणांसह आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले, तर मोरोक्कोनेही सात गुण मिळवून गट 'क' मध्ये ब्राझीलच्या मागे दुसरे स्थान मिळवले आणि नॉकआऊट फेरीसाठी पात्र ठरले. मोरोक्को आता १६ संघांच्या फेरीत पोहोचला आहे, जिथे त्यांचा सामना कॅनडाशी होईल.

◂ (वृत्तसंस्था)

## हरमनप्रीत आशियाई क्रीडा स्पर्धेत कर्णधार

**नवी दिल्ली, ३० जून**

इंग्लंडमध्ये झालेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत पोहोचण्यात अपयशी ठरल्यानंतरही, जपानमध्ये होणाऱ्या या वर्षीच्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी हरमनप्रीत कौरला भारतीय महिला संघाच्या कर्णधारपदी कायम ठेवण्यात आले. महिला निवड समितीने १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. रविवारी गट फेरीतील शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करल्याने संघाची विश्वचषकातील मोहीम संपुष्टात आली.

चीनच्या हांगझू येथे २०२३ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यामुळे भारतीय महिला संघ गतविजेता म्हणून आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होईल. स्मृती मंधाना संघाची उपकर्णधार म्हणून कायम राहील. विश्वचषक संघात स्थान मिळालेली यस्तिका भाटिया ही एकमेव खेळाडू आहे जिला वगळण्यात आले आहे.

◂ (वृत्तसंस्था)




# ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडीजवर ८ गड्यांनी विजय

**लंडन, ३० जून**

२०२६ च्या महिला टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या उपांत्य फेरीत, ऑस्ट्रेलियाने मंगळवारी वेस्ट इंडीजला अत्यल्प धावसंख्येवर रोखले. प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलेल्या वेस्ट इंडीजला २० षटकांत ७ गडी गमावून केवळ १२५ धावा करता आल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने १३ षटकांत विजयी लक्ष्य गाठले. बेथ मूनी (नाबाद ६१) आणि एशले गार्डनर (नाबाद ३५) यांनी चांगली फलंदाजी करीत ८ गडी राखून विजय मिळवला.

हेली मॅथ्यूज आणि कियाना जोसेफ यांनी पहिल्या गड्यासाठी ४७ धावा जोडून वेस्ट इंडीजला चांगली सुरुवात करून दिली. नवव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर वेस्ट इंडीजला पहिला धक्का बसला. मॅथ्यूज २८ चेंडूंमध्ये ३० धावा करून बाद झाली. जोसेफ दहाव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर १६ धावा करून बाद झाली. त्यानंतर स्टेफनी टेलर आणि जाहझारा क्लॅक्स्टन यांना एकही धाव करता आली नाही.



हेली मॅथ्यूज त्रिफळाचित झाली तो क्षण

त्यानंतर शेमेन कॅम्पबेलने २२ आणि चिनेल हेन्रीने १० धावा केल्या. जॅनिलिया ग्लासगो १५ धावांवर बाद झाली. डिएन्ड्रा डॉटिनने १६ चेंडूंमध्ये २६ धावा केल्या. नाणेफेकीनंतर डॉटिन जखमी झाली आणि तिच्या संघसहकाऱ्यांनी तिला उचलून मैदानाबाहेर नेले. तथापि, ती फलंदाजीसाठी परतली आणि तिने वेस्ट इंडिजला १२५ धावांपर्यंत पोहोचवले.

एका क्षणी वेस्ट इंडीजची अवस्था इतकी बिकट झाली होती की, ते १०० धावांचा टप्पाही ओलांडू शकणार नाहीत असे वाटत होते. १६ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर त्यांनी ८३ धावांत ६ गडी गमावले. ऑस्ट्रेलियाकडून सोफी मोलिन्यू, ॲशले गार्डनर आणि जॉर्जिया वेअरहॅम यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. ॲनाबेल सदरलँडने १ बळी घेतला.

◂ (वृत्तसंस्था)

## भारतीय सेनेच्या लक्ष्य-उज्ज्वल जोडीला सुवर्णपदक

### रोइंगमध्ये पदक जिंकण्याची सुरस कहाणी

**नवी दिल्ली, ३० जून**

भारतीय लष्कराचे जवान केवळ सीमांचे रक्षणच करत नाहीत तर क्रीडा क्षेत्रातही देशाला गौरव मिळवून देऊ शकतात, हे एकदा सिद्ध झाले आहे. २७ जून रोजी, स्वित्झर्लंडमधील लुसर्न येथे झालेल्या वर्ल्ड रोइंग कपच्या तिसऱ्या टप्प्यात, हवालदार लक्ष्य आणि हवालदार उज्ज्वल कुमार सिंग या जोडीने स्पर्धेतील भारताचे पहिले सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. त्यांनी लाईटवेट मेन्स डबल स्कल्स प्रकारात ६ मिनिटे २६.०९ सेकंदांची वेळ नोंदवून जगातील आघाडीच्या संघांना मागे टाकले. स्पर्धेपूर्वी भारतीय संघाला व्हिसाच्या मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागले होते, हे लक्षात घेता ही कामगिरी विशेष होती.

अंतिम फेरीत, भारतीय जोडीचा सामना नेदरलँड्स आणि हाँगकाँगच्या बलाढ्य संघांशी झाला. शर्यत अत्यंत रोमांचक होती आणि शेवटच्या क्षणापर्यंत विजेता अनिर्णीत राहिला. अखेरीस, लक्ष्य आणि उज्ज्वल यांनी उत्कृष्ट समन्वय आणि संयम दाखवत अगदी थोड्या फरकाने सुवर्णपदक जिंकले. वर्ल्ड रोइंग कपच्या इतिहासातील भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे.

**व्हिसाच्या संकटातही उत्साह कायम**

या ऐतिहासिक यशाची कहाणी सोपी नव्हती. भारतीय संघ बल्गेरियातील प्लोव्हडिव्ह येथे होणाऱ्या वर्ल्ड कपच्या दुसऱ्या टप्प्यात सहभागी होऊ शकला नाही, कारण खेळाडूंचे पासपोर्ट बल्गेरियन दूतावासात अडकले होते. त्यानंतर संघाकडे स्विस व्हिसा मिळवण्यासाठी फक्त पाच दिवस होते. परराष्ट्र मंत्रालय आणि क्रीडा मंत्रालयाच्या हस्तक्षेपानंतर, व्हिसा वेळेवर मंजूर झाले, ज्यामुळे संघाला स्वित्झर्लंडला प्रवास करणे शक्य झाले.



◂ (वृत्तसंस्था)

# इंग्लंडविरुद्ध भारत करणार दमदार सुरुवात

**चेस्टर-ले-स्ट्रीट, ३० जून**

बुधवारपासून सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत वैभव सूर्यवंशीचे बहुप्रतीक्षित पदार्पण आणि कठीण खेळपट्ट्यांवरील त्याच्या फलंदाजीतील कमतरता हे भारतासाठी चर्चेचे महत्त्वाचे विषय असतील. भारताचे सहायक प्रशिक्षक रायन टेन डोशेट यांनी म्हटले आहे की, इतर कोणत्याही क्रिकेटपटूप्रमाणे सूर्यवंशीलाही अंतिम ११ मध्ये स्थान मिळवण्यासाठी प्रक्रियेतून जावे लागेल आणि योग्य वेळेची वाट पाहावी लागेल. परंतु, या स्फोटक फलंदाजाला संघात समाविष्ट करण्याची मागणी वाढत असूनही, सूर्यवंशीने प्रक्रियेचे पालन करावे यावर व्यवस्थापन ठाम राहील की नाही, हे पाहणे बाकी आहे.

आयर्लंडविरुद्ध संजू सॅमसनचे दुहेरी अपयश हे त्याला वगळण्याचे आणि सूर्यवंशीला अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात करण्याची संधी देण्याचे कारण असू शकते. बेलफास्टमधील पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात २० चेंडूंत ४९ धावा केल्यामुळे अभिषेकला आणखी एक संधी मिळू शकते. आयर्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेत ईशान किशनही चांगली कामगिरी करू शकला नाही, तो १ आणि १२ धावांवर बाद झाला. त्यामुळे, व्यवस्थापन सूर्यवंशीला संघात घेण्यासाठी त्याला वगळू शकते, परंतु अशा निर्णयाचा वगळलेल्या फलंदाजाच्या मनोधैर्यावर काय परिणाम होऊ शकतो याचा ते विचार करतील.

सॅमसनने यावर्षी टी-२० विश्वचषकाच्या अंतिम टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी केली होती आणि आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्ससाठी दोन शतकेही झळकावली होती. मात्र, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर



श्रेयस अय्यर



हॅरि ब्रूक्स

आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या नेतृत्वाखालील संघ व्यवस्थापन कठोर निर्णय घेण्यास मागेपुढे पाहत नाही आणि ज्यांना शंका आहे ते सूर्यकुमार यादवचे उदाहरण पाहू शकतात. त्याने आयर्लंडविरुद्ध सूर्यांश शेडगे आणि प्रिन्स यादव यांना पदार्पणाची संधी दिली, ज्यामुळे सूर्यवंशीला त्याच्या आंतरराष्ट्रीय पदार्पणासाठी प्रतीक्षा करावी लागली.

वेगवान गोलंदाजांना अनुकूल असलेल्या बेलफास्टच्या खेळपट्टीवर एकही भारतीय फलंदाज सहज खेळताना दिसला नाही. जेव्हा खेळपट्टीची परिस्थिती आणि आयरिश गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीने आक्रमक फलंदाजीची शक्यताच रोखली, तेव्हा भारतीय फलंदाजांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात तिलक वर्माने सावध खेळ करत अर्धशतक झळकावले, पण ४६ चेंडू खेळून त्याचा संयम संपला. आयर्लंडने दिलेल्या १८३ आणि १५५ धावांच्या सहज गाठता येण्याजोग्या लक्ष्यांसमोर इतर भारतीय फलंदाजांचा अधीरपणाही स्पष्टपणे दिसून येत होता. यासाठी आयपीएलच्या सपाट खेळपट्ट्यांवर फलंदाजी करण्यापेक्षा वेगळ्या दृष्टिकोनाची गरज होती, पण तो दिसला नाही.

भारतीय फलंदाजांना त्यांच्या विचारसरणीत आणि दृष्टिकोनात बदल करावा लागेल, कारण इंग्लंडमधील परिस्थिती तशीच असेल आणि त्यांना अधिक चांगल्या व अनुभवी खेळाडूंचा सामना करावा लागेल.

इंग्लंडकडे जोफ्रा आर्चर, जोश टंग, साकिब महमूद आणि सोनी बेकर यांच्यासारखे शक्तिशाली वेगवान गोलंदाज, तसेच आदिल रशीद आणि रेहान अहमद यांच्यासारखे चतुर फिरकी गोलंदाज आहेत. रिव्हरसाईड ग्राऊंडवरील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची सरासरी धावसंख्या १३८ आहे आणि सर्वोच्च धावसंख्या १९५ आहे, जे येथे खेळल्या गेलेल्या गेल्या आठ सामन्यांमध्ये गोलंदाजांचे वर्चस्व दर्शवते.

◂ (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**भारत विरुद्ध इंग्लंड**
**स्थळ :** रिव्हरसाईड ग्राऊंड, चेस्टर-ले-स्ट्रीट
**वेळ :** भारतीय वेळेनुसार रात्री १०.०० वाजता
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# अल्पवयीन विद्यार्थिनीचा पाठलाग; अश्लिल शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी

## तरुणाविरुध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जून-**

एका १६ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनी महाविद्यालयला जात असताना एका २३ वर्षीय तरुणाने भररस्त्यात पाठलाग करुन अश्लिल शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी बार्शी पोलिस ठाण्यात त्याच्याविरुध्द पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पिडीत विद्यार्थिनी ही बार्शी येथील एका महाविद्यालयात अकरावी इयत्तेत शिक्षण घेत आहे. आरोपी हा तिच्या घराशेजारी राहत असून गेल्या तीन ते चार वर्षांपासून तिचा पाठलाग करुन वारंवार तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता.

या त्रासाबाबत तिने काही महिन्यांपूर्वी पालकांना माहिती दिली होती. त्यानंतर तिच्या आईने आरोपीसह त्याच्या कुटुंबीयांना समज देऊन अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये, अशी ताकीदही दिली होती.

सोमवार दि. २९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ती विद्यार्थिनी मैत्रिणीसोबत पायी महाविद्यालयला जात असताना बार्शी न्यायालयाजवळील जनावरांच्या कोंडवाड्यासमोरील रस्त्यावर आरोपीने स्प्लेंडर दुचाकीवरुन तिचा पाठलाग सुरु केला. पंचायत समिती कार्यालयासमोरील रस्त्यावर दुचाकी आडवी लावून तिचा मार्ग रोखला.




तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असता तिने विरोध करताच आरोपीने तिच्याशी अश्लील व गलिच्छ भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर घाबरलेल्या विद्यार्थिनीने व तिच्या मैत्रिणीने तेथून पळ काढला. आरोपीने काही अंतरापर्यंतही पाठलाग केला.

पिडीता ही घरी जाऊन आई-वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. तेव्हा, तिची आई आरोपीच्या घरी जाब विचारण्यासाठी गेली असता आरोपीने पुन्हा शिवीगाळ करत, 'तुला जिवंत ठेवणार नाही, गाडीखाली उडवून देईन आणि गल्लीत कशी राहतेस ते पाहतो,' अशी धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे.

## पैशाच्या व्यवहारात तरुणाने पिले कॉकरोच मारण्याचे लिक्विड

**सोलापूर :** पैशाच्या व्यवहारात एका तरुणाने कॉकरोज मारण्याचे औषध तुझ्याशी घटना मलिका अर्जुन नगर येथे सोमवारी रात्री अकरा वाजता घडली. सुनील विष्णू गरड (वय २८ वर्ष, रा.मलिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड ,सोलापूर ) असे त्या तरुणाचे नाव असून त्याने पैशाच्या व्यवहाराच्या कारणावरून राहत्या घरात सोमवारी रात्री कॉकरोच मारण्याचे औषधे पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ लाला यांनी आज मंगळवारी पहाटे सव्वा एक वाजता दाखल केले .

## दुचाकी घसरून जखमी झालेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर :** दुचाकी घसरून जखमी झालेल्या धोत्री गावच्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी सकाळी साडेसात वाजता मृत्यू झाला. सोमनाथ अनिल कोळी (वय २३ वर्ष , राहणार धोत्री , दक्षिण सोलापूर ) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव असून तो २७ जून रोजी रात्री साडेदहा वाजता सोलापूर विमानतळ येथून धोत्री गावाकडे निघाला असताना वाटेत दर्गणहळी गावाजवळ त्याची दुचाकी घसरली . त्यामुळे तो खाली पडून गंभीर जखमी झाला . त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ नागनाथ याने मध्यरात्री दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान आज मंगळवारी सकाळी मृत्यू झाला .

## पैशाच्या व्यवहारातून वाद; महिलेने पिले डेटॉल लिक्विड

**सोलापूर :** पैशाच्या व्यवहारात वाद झाल्याच्या रागात एका महिलेने डेटॉल लिक्विड पिल्याची घटना विजापूर नाका येथील झोपडपट्टी क्रमांक दोन येथे सोमवारी रात्री अकरा वाजता घडली.

रेश्मा महेबुब नदाफ (वय ३५ वर्ष, रा. झोपडपट्टी क्रमांक दोन) असे त्या महिलेचे नाव असून सोमवारी रात्री घरामध्ये पैशाच्या व्यवहारात वाद झाल्याने त्या रागात तिने डेटॉल लिक्विड पिले. याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरता मुलगा अजान याने मध्यरात्री येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## अल्पवयीन मुलीचा विवाह; आई, वडील, सासू, सासरे, पतीवर गुन्हा

**सोलापूर :** एका अल्पवयीन मुलीचा विवाह लावून देत तिला गर्भवती केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांवर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. यात पीडितेचा पती, आई-वडील आणि सासू-सासऱ्यांचाही समावेश आहे. याप्रकरणी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मुख्य सेविका प्रगती वसंत तळेकर यांनी फिर्याद दिली आहे.यातील पीडित मुलगी ही सतरा वर्ष ९ महिन्याची अल्पवयीन आहे हे माहीत असूनही तिच्या नातेवाईकांनी तिचा विवाह लावून दिला. लग्नानंतर सासरी पतीने वेळोवेळी शारीरिक संबंध केल्याने यातील अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. ४ जून २०२६ रोजी पीडितेची प्रकृती अस्वस्थ झाल्यामुळे आणि गरोदरपणातील सातव्या महिन्याची सोनोग्राफी करण्यासाठी तिला खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले असता ही घटना उघडकीस आल्याचे फिर्यादीत म्हटले. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश इंगळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## नोकरी लागत नसल्याने तरुणीने खाल्ल्या झोपेच्या गोळ्या

**सोलापूर, दि.३० जून-**

नोकरी लागत नसल्याच्या नैराश्येत एका तरुणीने झोपेच्या अति प्रमाणात गोळ्या खाल्ल्याची घटना भगवान नगर येथे सोमवारी संध्याकाळी घडली. सुनिता प्रभाकर वाघमारे (वय २८ वर्ष, राहणार भगवान नगर सोलापूर ) असे त्या तरुणीचे नाव असून नोकरी लागत नसल्याच्या तणावात तिने सोमवारी सायंकाळी राहत्या घरात झोपेच्या एकदम गोळ्या खाऊन टाकल्या. त्याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात भाऊ शरणू यांनी मध्यरात्री दाखल केले.

## पंढरपूरच्या अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास माढा तालुका जोडण्यास विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ३० जून-**

महाराष्ट्र शासनातर्फे पंढरपूर येथे नियोजित केलेल्या नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये माढा तालुक्याचा समावेश करण्याच्या प्रस्तावाला आता स्थानिक पातळीवरून तीव्र विरोध सुरू झाला आहे. माजी आमदार स्व.कृष्णराव परबत प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अभियंता विजयसिंह कृष्णराव परबत यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे या प्रस्तावा विरोधात अधिकृत हरकत नोंदवली असून, माढा तालुका सोलापूर कार्यालयाशीच पूर्ववत ठेवण्याची आग्रही मागणी केली आहे.

या प्रस्तावामुळे नागरिकांना पंढरपूरला जाण्यासाठी खासगी वाहनांचा अवलंब करावा लागेल किंवा अनेक बस बदलून प्रवास करावा लागेल. यामुळे सर्वसामान्य शेतकरी आणि नागरिकांचा वेळ आणि आर्थिक भुर्दंड मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. सोलापूर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय, विभागीय कार्यालय, जिल्हा परिषद यांसारख्या सर्व प्रमुख शासकीय कामांसाठी नागरिकांना सोलापूरला जाणे आधीपासूनच अत्यंत सोयीचे आणि मध्यवर्ती पडते. परिणामी माढा तालुका सोलापूरशीच जोडलेला ठेवावा, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, आ. नारायण पाटील, माजी आ.संजय शिंदे आणि माढा बार असोसिएशनच्या अध्यक्षांनाही सादर केल्या आहेत.

## 'खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनो' हिंदी, मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून-**

स्वर स्वामी कलासाधना प्रस्तुत खुल्लम खुल्ला प्यार करेंगे हम दोनो अंतर्गत हिंदी, मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम उत्तरोत्तर रंगतदार ठरत गेला. विविध गीतांद्वारे प्रख्यात गायिका स्व.आशा भोसले, प्रख्यात भारतीय संगीतकार स्व.आर. डी.बर्मन यांना मानवंदना देण्यात आली. गणेश हातगे, प्रियंका हातगे, राजेश हुन्नरी, सौरव हातगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

गिरीश परमार, किशोर शिंदे, प्रकाश भालेकर यांच्या हस्ते कलावंतांचा सन्मान करण्यात आला. तन्वी मॅडम यांनी आपल्या सुमधुर आवाजात, आकर्षक शेरो-शायरी आणि प्रभावी निवेदन केले. सुनील मांजरेकर यांनी कलात्मकरित्या सुंदर अविष्कार सादर केला. निखील सर यांनी ध्वनीक्षेपण तर चरण सिंग यांनी छायाचित्रणाची जबाबदारी पार पाडली.

## पॉवर मॉम', रायझिंग स्टार मॉम' संघांची विजयी घोडदौड

### इंडियन मॉडेल महिला पेरेंट्स क्रिकेट लीग : अस्मिता अंबुरे, आरती काजळे 'सामनावीर'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून -**

येथील इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित 'इंडियन मॉडेल महिला पेरेंट्स क्रिकेट लीग सिझन-२' मध्ये चुरशीच्या सामन्यांमध्ये पॉवर मॉम आणि रायझिंग स्टार मॉम या संघांनी शानदार विजय नोंदवले.

स्पर्धेतील तिसरा सामना पॉवर मॉम' विरुद्ध ' रॉयल मॉम स्ट्रायकर्स' यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना पॉवर मॉम संघाने ७ षटकांत १ बाद ४७ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना रॉयल मॉम स्ट्रायकर्सचा संघ ४.३ षटकांत ६ बाद अवघ्या १९ धावांवर आटोपला. हा सामना पॉवर मॉम संघाने २८ धावांनी जिंकला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल अस्मिता अंबुरे यांना सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

चौथा सामना ' वॉरियर' विरुद्ध 'रायझिंग स्टार मॉम' यांच्यात खेळवला गेला. वॉरियर संघाने ७ षटकांत २ बाद ३७ धावा केल्या. हे आव्हान रायझिंग स्टार मॉम संघाने ६ षटकांत ४ बाद ३८ धावा करत



अस्मिता अंबुर



आरती काजळे

सहज पार केले आणि २ विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यात आरती काजळे यांना सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

पाचव्या सामन्यात 'आयएमएस थंडर्स क्वीन्स' आणि 'आयएमएस पॉवर मॉम' हे संघ आमनेसामने होते. पॉवर मॉम संघाने दमदार फलंदाजी करत ७ षटकांत १ बाद ५४ धावांचा डोंगर उभा केला. या धावांचा पाठलाग करताना थंडर्स क्वीन्सचा संघ ६.४ षटकांत ७ बाद २५ धावांवर बाद झाला. पॉवर मॉम संघाने हा सामना २९ धावांनी खिशात टाकला. या सामन्यातही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या अस्मिता अंबुरे यांना सलग दुसऱ्यांदा सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

## निधन वृत्त...

### रुक्मिणीबाई कुंभार-जेऊरकर



**सोलापूर, दि. २९ जून-**

योगी राजेंद्र नगर माशाळ वस्ती येथील रुक्मिणीबाई दगडू कुंभार-जेऊरकर (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले, तीन मुली, सूना, जावई, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. जिल्हा परिषदेचे लिपीक विवेकानंद व दत्तात्रय जेऊरकर यांच्या त्या मातोश्री होत.

### इंदुमती घाडगे



**सोलापूर, दि. ३० जून-**

इंदुमती किसन घाडगे (वय ८०, सिंधू विहार, जुळे सोलापूर) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. 'लोकमत' सोलापूर आवृत्तीमधील वितरण विभागातील प्रवीण घाडगे यांच्या त्या मातोश्री होत.

### कुंदा कुलकर्णी



**सोलापूर, दि. ३० जून-**

माशाळनगर येथील रहिवासी कुंदा प्रभाकर कुलकर्णी (वय ७९) यांचे दि. २८ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रसाद कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

### पुष्पावती भिंगे



**पंढरपूर, दि. ३० जून-**

येथील श्री सिद्धिविनायक लॅबोरेटरीचे डॉ. महेश भिंगे यांच्या मातोश्री व ज्येष्ठ शिक्षक शि.धों. भिंगे गुरुजी यांच्या पत्नी पुष्पावती भिंगे बाई यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रखुमाई हॉस्पिटल जुना कराड नाका येथून निघून पंढरपूर येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंढरपुरातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील लोक उपस्थित होते. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखांतील ९० कर्मचाऱ्यांच्या करण्यात आल्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जून-**

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सर्व शाखांतील एकूण ९० कर्मचाऱ्यांच्या समुपदेशाने बदल्या करण्यात आल्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या नेतृत्वाखाली संगणकीय प्रणालीद्वारे या बदल्या करण्यात आल्या. आता कार्यालयीन कामकाजाला गती मिळणार असल्याचे सांगण्यात येते.

विविध संवर्गाच्या नियतकालिक बदली २०२६ च्या अनुषंगाने दि.१८ जून २०२६ रोजीच्या ज्ञापनाद्वारे महसूल सहाय्यक-१६, सहाय्यक महसूल अधिकारी-२६, ग्राम महसूल अधिकारी-३२, मंडळ अधिकारी-११ व वाहनचालक-५ अशा एकूण ९० कर्मचाऱ्यांचे बदलीचे ज्ञापन प्रसिद्ध करण्यात आले.

सामान्य प्रशासन विभागाच्या ९ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयातील टप्पा क्र. ०५ (४) नुसार सर्व विभागातील रिक्त पदे समप्रमाणात भरावीत तसेच अवघड क्षेत्रातील पदे प्राथम्याने भरण्याबाबत निर्देश आहेत.

नागरी सेवा मंडळाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या उपस्थितीत दि. ३०.०६.२०२६ रोजी सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांना समुपदेशनासाठी बोलविण्यात आले. समुपदेशनाद्वारे बदलीची शिफारस करताना कर्मचाऱ्यांचा पसंतीक्रम, प्राधान्यक्रम व यापूर्वी सेवा केलेली ठिकाणे यांचा विचार करून प्रशासनाची निकड लक्षात घेण्यात आली.

ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व सहाय्यक महसूल अधिकारी संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ साठी नेमणूक करण्यात आली आहे, त्यांना कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित कार्यालय प्रमुखांना देण्यात आले आहेत.



## सिध्देश्वर फाउंडेशनतर्फे वह्यांचे वाटप

**सोलापूर, दि. ३० जून-**

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनच्या वतीने गरजवंत मुलामुलींना वह्या वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ सामाजिक कार्यकर्ते व युवा संशोधक राहुल बुऱ्हाणपूरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक मुलामुलींना वह्या व शैक्षणिक साहित्य देऊन करण्यात आला. यात मुख्यत्वे एकल पालक व मोलमजुरी करणाऱ्या व जिल्हा परिषद शाळेतील मुला मुलींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी जीवन चाबुकस्वार यांची प्रमुख उपस्थिती होती. सिद्धार्थ सर्जे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन राजेंद्र बलसुरे यांनी केले. कार्यक्रमास विश्वनाथ आमणे, चिदानंद मुस्तारे,सचिन विभुते,बाबुराव रायगोंडे, पंढरीनाथ अग्रीकर, दिलीप बच्चुवार,गंगाधर पाटील, इरण्णा अतनुरे, सुनील कापसे उपस्थित होते. सुनील सर्जे,भीमसिंह रजपूत, डॉ गौरी सर्जे आदींनी परिश्रम घेतले.

## नीलकंठ बँक सभासदांना देणार १२ टक्के लाभांश

### पारदर्शक सेवेमुळे ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ : चेअरमन सीए नोगजा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

ग्राहकांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि सक्षम आर्थिक व्यवस्थापनाच्या बळावर नीलकंठ को-ऑप बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. मार्च २०२६ अखेर बँकेला १ कोटी ८६ लाख ३७ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे काटेकोर पालन करत बँकेने अ वर्ग ऑडिट प्राप्त केले असून एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळविल्याची माहिती नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी दिली.

बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी माहेश्वरी सांस्कृतिक भवनात अतिशय उत्साहपुर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बँकेचे व्हाईस




चेअरमन पद्मा भुतडा, संचालक रमेश राठी, चंद्रकांत तापडिया, प्रदिपकुमार शिंगवी, जमनादास भुतडा, कौस्तुभ करवा, शरद कालाणी, सचिन कोठारी, अभिजीत चिल्लाळ, किरण शेरखाने, नंदकुमार भोसले, सीएस नंदा भट्टड, तज्ञ संचालक सीए आनंद झंवर, ॲड.महेश अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला बँकेचे संस्थापक दिवंगत विश्वनाथ करवा यांना अभिवादन करण्यात आले तसेच दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रारंभी स्वागत बँकेच्या व्हॉइस चेअरमन पद्मा भुतडा यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद बलदवा यांनी मांडलेल्या मागील इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. तज्ञ संचालक सीए आनंद झंवर यांनी लेखा परीक्षित ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून दाखविले. सभेचे अध्यक्ष व बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी अहवाल वाचन व अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. चेअरमन सीए नोगजा यांनी बँकेने मागील काळात केलेल्या प्रगतीचा आलेख हा सभागृहासमोर मांडला. याप्रसंगी संचालक, अधिकारी यांनी मनोगत व्यक्त केले. सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी दिली. यावेळी विजयकुमार शाबादी यांनी मार्गदर्शन केले.याप्रसंगी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. जनरल मॅनेजर सीए शुभम सोमाणी, ब्रँच मॅनेजर गोविंद पंचारिया, प्रकाश सांगा, विश्वनाथ बळगानुरे, सुत्रसंचालन अन्नपूर्णा सामलेटी यांनी केले. आभार संचालक चंद्रकांत तापडिया यांनी मानले. यावेळी बँकेचे सभासद, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विश्वासाचा ठेवा जपत नीलकंठ बँकेची दमदार झेप

* निव्वळ नफा - १.८६ कोटी रुपये
* ठेवी - २११. ५९ कोटी
* भाग भांडवल - ५.३६ कोटी
* खेळते भांडवल - २४७.१३ कोटी
* कर्जे - १२६. ८४ कोटी,
* निधी - १५.४९ कोटी ,
* गुंतवणूक - ८७.१३ कोटी
* एनपीए - ०.०० टक्के
* ऑडिट वर्ग - अ

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## आलेगाव खुर्द येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**टेंभुर्णी, दि. ३० जून-**

माढा तालुक्याचे युवक नेते रावसाहेब देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आलेगाव खुर्द येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप सोहळा उपक्रम राबवण्यात आला. युवा नेते राजेंद्र अंगद पाटील यांच्या माध्यमातून गावातील तिन्ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना उपयुक्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माने वस्ती आलेगाव खुर्द येथे आयोजित या कार्यक्रमात तिन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्या, कंपास पेटी, अंकलिपी, पॅड आणि आकर्षक पाण्याच्या बॉटल आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर संतोष शिंदे, सरपंच सतीश केचे, उपसरपंच महेंद्र पाटील, प्रकाश केचे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मदन पवार, पै. नितीन केचे, देवराव दडस, बापुराव निकम, प्रकाश माने, हनुमंत काळे, कुंडलिक माने, तानाजी जानकर, मच्छिंद्र केचे, विजय वाळेकर, विष्णू केचे, सौदागर फुके, रामदास माने, तुकाराम केचे सागर कस्तुरे, रमेश लवटे, समाधान माने, अशोक गायकवाड, रामचंद्र पवार, तानाजी गायकवाड, धर्मेंद्र माने, भाऊसाहेब शिंदे, अमोल झोळ, महादेव जगताप, महेश आवारे, बिभीषण माने, पांडुरंग निकम, ज्ञानदेव केचे, संतोष काळे, मच्छिंद्र गायकवाड, विकास माने, राम काळे, गोरख केचे, पवन मदने, महादेव माने उमाजी जाधव, रोहीदास माने, माऊली कस्तुरे, मुख्याध्यापक धनाजी रुपनवर, काळबा भुतापल्ले, बाळासाहेब माने, मुलाणी उपस्थित होते.



## सांगोला विद्यामंदिरात अंमली पदार्थ जनजागृती मोहीम

**सांगोला, दि. ३० जून-**

सांगोला पोलीस स्टेशन व सांगोला विद्यामंदिर प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमली पदार्थ जनजागृती मोहिमे अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिक्षक मकरंद अंकलगी व उज्वला कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढून घोषणाबाजी केली. यावेळी पोलिस उपनिरीक्षक टिळेकर, स्नेहल चव्हाण, प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासाहेब नरूटे, पर्यवेक्षिका शुभांगी घोंगडे उपस्थित होत्या. यावेळी पोलिस उपनिरीक्षक संदीप गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी इ.८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये आरव बाबर प्रथम, फायजा मुलाणी द्वितीय, सोनाली मदने तृतीय तर गौरी लवटे, नम्रता मारकड यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला. या यशस्वी विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक अमोल उकळे व समाधान शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## झाड बॅग मॉलमध्ये रेनकोट व छत्रीवर ऑफर्सची धूम

**सोलापूर, दि. ३० जून-**




गांधीनगर चौकातील 'झाड बॅग मॉल' येथे रेनकोट व छत्री खरेदीवर आकर्षक डिस्काऊंट देण्यात येत आहे. येथील स्पेशालिटी म्हणजे भरभरून डिस्काउंट आणि खूप सारे ब्रँड्स असंख्य व्हरायटीनी नटलेले भव्य शोरूम. छत्री मध्ये १८० रू पासून व्हरायटीची सुरुवात होते. रेनकोटमध्ये पॉकेट रेनकोट ५० रू पासून सुरु असून विविध रेंजमध्ये उपलब्ध आहेत. रेनकोट ५XL पर्यंत उपलब्ध आहे. येथे झील, वाईल्ड क्राफ्ट, डक बॅक, गीअर, रेनक्स, अीज्रू, ऑरेंज असे अनेक बँड्स उपलब्ध आहेत. झाड बॅग मॉल येथे कोणतीही वस्तू कंपनीच्या M.R.P. वर विकली जात नसून त्यावर जास्तीत जास्त डिस्काउंट देण्याचा प्रयत्न येथे केला जातो. सोबतच ट्रेकिंगचे सर्व साहित्य येथे उपलब्ध असून ट्रेकिंग बॅग, ट्रेकिंग शूज, टेंट, स्लीपिंग बॅग ही देखील अशा सर्व वस्तू रिझनेबल रेट मध्ये उपलब्ध आहेत. तरी आपण सोलापूरकरांनी एक वेळ अवश्य भेट द्यावी असे आवाहन संचालक सागर झाड यांनी केले आहे.



## वटपोर्णिमेदिवशी संस्कृती, परंपरा, सामाजिक ऐक्य जपण्याचा निर्धार

**सोलापूर, दि. ३० जून-**

महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना सोलापूर शहराच्या वतीने वटपौर्णिमेचा पारंपरिक आणि उत्साहपूर्ण कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने व आनंदी वातावरणात संपन्न झाला. महिलांनी भारतीय संस्कृती, परंपरा आणि सामाजिक ऐक्य जपण्याचा निर्धार व्यक्त केला. महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना केवळ सामाजिक प्रश्नांवर आवाज उठवत नाही, तर आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठीही सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. महिला आघाडीच्या सोनाली भागानगरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या शहराध्यक्ष जयश्री हिरेमठ यांच्या पुढाकाराने आयोजन करण्यात आले होते. सर्व महिलांनी वडाच्या वृक्षाची पूजा करून आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

# शक्तिपीठ महामार्ग समर्थकाचा पाठलाग; मुख्यमंत्र्यांकडून थेट दखल

## सोलापूर पोलिस अधीक्षकांना चौकशीचे आदेश

### निमगावच्या शेतकऱ्याची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार; समाजकंटकांवर कठोर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि ३० जून-**

शक्तीपीठ महामार्गाला समर्थन देऊन प्रशासनाला सहकार्य केल्याचा राग मनात धरून माळशिरस तालुक्यातील निमगाव येथील शेतकरी व पत्रकार निनाद पाटील यांना अज्ञात लोकांकडून अप्रत्यक्षपणे त्रास दिला जात असून, रात्री-अपरात्री त्यांच्या गाडीचा पाठलाग करून त्यांच्या जीवितास धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या धक्कादायक प्रकाराची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट मेसेजद्वारे आलेल्या तक्रारीवरून तात्काळ दखल घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर, माळशिरस तालुका शक्तीपीठ महामार्ग समर्थन समितीच्या वतीने सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची भेट घेऊन त्यांना या गंभीर प्रकरणाबाबत नुकतेच एक सविस्तर निवेदन देण्यात आले.

शक्तीपीठ महामार्ग माळशिरस तालुक्यातील १२ गावांमधून जात असून, या महामार्गाबाबत तालुक्यात विरोध आणि समर्थन अशा दोन्ही बाजू दिसून येत आहेत. मात्र, ज्या शेतकऱ्यांनी या महामार्गाला उघडपणे समर्थन दिले आहे, अशा शेतकऱ्यांना काही अज्ञात लोकांकडून अप्रत्यक्षपणे दमदाटी केली जात असल्याचे समोर आले आहे. निमगाव येथे घडलेल्या या प्रकारानंतर पोलीस प्रशासनालाही याबाबतीत गोपनीय माहिती मिळाली आहे. यानुसार पोलिसांनी संबंधित शेतकऱ्यांना अधिक सावध व जागरूक राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संबंधित शेतकऱ्यांशी चर्चा करून सर्व बाबी जाणून घेतल्या आणि अशा समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ज्या शेतकऱ्यांना त्रास दिला जात आहे, त्यांनी प्रशासनाला शक्तीपीठ महामार्गासंदर्भात वेळोवेळी सहकार्य केले आहे. त्यामुळे अशा कायद्याचे पालन करणाऱ्या आणि सहकार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

### धमक्यांना भीक घालत नाही; गुन्हेगारांवर कठोर कारवाई होईल हा विश्वास!

''शक्तीपीठ महामार्गाचे समर्थन करून प्रशासनाला सहकार्य केल्याचा राग मनात धरून काही समाजकंटकांकडून माझ्या गाडीचा रात्री-अपरात्री पाठलाग केला जातोय. हस्ते-परहस्ते मला मारण्याची धमकीही दिली जातेय. पोलिसांकडून मला सतर्क राहण्याच्या सूचना मिळाल्या आहेत. परंतु चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, पत्रकार व शेतकरी म्हणून मी अशा धमक्यांना अजिबात भीक घालत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली असून, संबंधित लोकांचे सीडीआर लवकरच पोलिसांना मिळतील. अशा गुन्हेगारांवर नक्कीच कठोर कारवाई होईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.''

**निनाद पाटील**
(समन्वयक, शक्तीपीठ महामार्ग समर्थन समिती, माळशिरस तालुका)

## नशेत पिले गोचीड मारण्याचे औषध

**सोलापूर, दि. ३० जून-**

दारूच्या नशेमध्ये एका व्यक्तीने गोचीड मारण्याचे औषध पिल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव - कोरवली रोडवर अंत्रोळी फाटा येथे रविवारी सायंकाळी घडली. अर्जुन यशवंत कोळी वय ५५ वर्ष राहणार विंचूर ,दक्षिण सोलापूर) असे त्या व्यक्तीचे नाव असून त्याने रविवारी सायंकाळी अंत्रोळी फाटा येथे गोचीड मारण्याचे औषध पिले . त्यामुळे त्याला मंद्रूप च्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयाचा मुलगा सोमनाथ कोळी याने मध्यरात्री दाखल केले.

## बार्शीत शहर परिसरात वटपौर्णिमा साजरी
## पतीच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी सुवासिनींची प्रार्थना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जून-**

ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा म्हणजेच हिंदू संस्कृतीतील सुवासिनींसाठी अत्यंत पवित्र मानला जाणारा वटपौर्णिमा सण सोमवार दि. २९ जून रोजी बार्शी शहर व तालुक्यात साजरा करण्यात आला. पतीच्या दीर्घायुष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि अखंड सौभाग्य लाभावे या भावनेने सुवासिनींनी वडाच्या झाडाची विधिवत पूजा करुन सात जन्मांच्या सहजीवनाची प्रार्थना केली.

वटवृक्षाभोवती पवित्र दोरा गुंडाळून सात प्रदक्षिणा घालण्यात आल्या आणि पतीच्या दीर्घायुष्याची मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

हिंदू धर्मात वडाच्या झाडाला अत्यंत पवित्र स्थान आहे. वडाच्या मुळांमध्ये ब्रह्मदेव, खोडामध्ये भगवान विष्णू आणि शेंड्यावर भगवान शंकर यांचा वास



असल्याची धार्मिक श्रद्धा आहे. त्यामुळे वटवृक्षाची पूजा केल्याने कुटुंबात सुख-समृद्धी, सौख्य आणि अखंड सौभाग्य प्राप्त होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. बार्शी शहरातील विविध भागांसह तालुक्यातील गावोगावी वडाच्या झाडांजवळ महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी सामूहिक वडपूजनाचे आयोजन करण्यात आले होते.



## वंजारे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

आज डी. फार्मसी महाविद्यालयातील स्टोअर कीपर म्हणून ३७ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावल्यानंतर एन. टी. वंजारे सर सेवानिवृत्त झाले.

महाविद्यालयाचे प्रेरणास्थान, सहकार महर्षी वि. गु. शिवदारे अण्णा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हात जोडले. त्यानंतर संस्थेच्या सहसचिवांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी या छोट्याशा गावाशी वंजारे यांचे नाते जुळले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव अविनाश म्हेत्रे, रेवणसिद्ध कोळी, प्रकाश अतनुरे, लक्ष्मण बिराजदार, गंगाधर कडबगाव, मल्लिकार्जुन पोद्दार, सचिन नारायणे, रामण्णा देशमुख उपस्थित होते.




## जिल्हा नियोजन समितीकडून सांख्यिकी दिन साजरा

**सोलापूर, दि. ३० जून-**

येथील जिल्हा नियोजन समिती, जिल्हा सांख्यिकी कार्यालय व राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने २० वा राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून भारतातील आधुनिक सांख्यिकी प्रणालींचे जनक प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी भूषविले.

यावेळी हिरेमठ, सहायक संचालक, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, संगीता मोरे, उप आयुक्त, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, श्रीकांत कुंटला, सहा. जि. नि. अ., प्रितम कुंटला, सहा. जि. नि. अ., दिनकर बंडगर, सांख्यिकी अधिकारी रोहित गोरलेवाले उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रितम कुंटला यांनी केले.

## घरगुती भांडणात सळईने मारहाण तरुण जखमी

**सोलापूर, दि. ३० जून-**

घरगुती भांडणाच्या कारणावरून एका तरुणाला लोखंडी सळईने मारून जखमी करण्यात आल्याची घटना अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिरा जवळ रविवारी मध्यरात्री पहाटे घडली. प्रथमेश प्रकाश पवार (वय २५ वर्ष, राहणार शिवाजीनगर तांडा, अक्कलकोट ) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो रविवारी मध्यरात्री बारा वाजता स्वामी समर्थ मंदिराजवळ असताना घरगुती भांडणाच्या कारणावरून त्याला चेतन राठोड याने लोखंडी सळईने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने त्याला अक्कलकोटच्या आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी दुपारी बारा वाजता तो स्वतः दाखल झाला.

## आज कृषी पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून १ जुलै रोजी साजरा होणाऱ्या कृषी दिनानिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथे विशेष कृषी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला आहे. भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार यांनी ही माहिती दिली.

भाजप ओबीसी मोर्चा (सोलापूर पूर्व) यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हा सोहळा कारंबा येथील बहिर्जे नगर येथे सायंकाळी साडेसहा वाजता होईल. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, सोलापूर बाजार समितीचे माजी सभापती महादेव चाकोते, कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, पंचायत समितीच्या सभापती तेजस्विनी बोराडे, उपसभापती सुनील भोसले, सदस्या सुनीता बारसकर, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, तालुकाध्यक्ष संभाजी दडे आणि उद्योजक नागनाथ बन्ने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**भव्य सभागृहाचे लोकार्पण**

कृषी क्षेत्रात आणि कृषीपूरक व्यवसायात आधुनिक तसेच प्रयोगशील पद्धतींचा अवलंब करणाऱ्या शेतकऱ्यांना या सोहळ्यात कृषी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

याचबरोबर, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यावतीने उभारलेल्या भव्य सभागृहाचे लोकार्पणही याप्रसंगी केले जाणार आहे. सोहळ्याला शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनायक सुतार यांनी केले आहे.

**पुरस्कार विजेते शेतकरी**

- *आदर्श: विजय भोरे
- *आदर्श कृषी उद्योजक : ज्योतिष गुंड
- * नैसर्गिक विषमुक्त शेती: गणेश भुट्टे
- * आदर्श महिला : महानंद गुडे
- * आदर्श फूल उत्पादक : अशोक बहिर्जे
- * युवा शेतकरी: अक्षय गव्हाणे
- * दुग्धउत्पादक : विशाल माने, श्रीधर गायकवाड, संजय बहिर्जे आणि हरीश जाधव.

## 'ऑपरेशन शोध' अंतर्गत १२३ बेपत्ता व्यक्तींना शोधले

### मंगळवेढा पोलिसांचे मोठे यश

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २९ जून-**



मंगळवेढा पोलीस ठाणे अंतर्गत ऑपरेशन शोध मोहिम राबवून बेपत्ता झालेल्या ७३ महिला व ५० पुरुष असे १२३ बेपत्ता व्यक्तींना शोधण्यात महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ. आरती कणिरे यांना यश आले आहे. दरम्यान या शोध मोहिमेत सोलापूर जिल्ह्यात मंगळवेढा अव्वल ठरला आहे.

राज्याच्या अप्पर पोलीस महासंचालक महिला व बाल अपराध प्रतिबंधक विभागाकडून राज्यभर बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन शोध मोहिम सर्वत्र राबविण्यात आली.

दरम्यान मंगळवेढ्यात जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशाने डीवायएसपी डॉ. बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ. आरती कणिरे यांनी मंगळवेढ्यातून बेपत्ता झालेल्या ७३ महिला व ५० पुरुष असे १२३ व्यक्तींना शोधून काढले आहे.

हे सर्व सन २०१६ ते ३० मे २०२६ या कालावधीतील आहेत. महिला पोलीस उपनिरीक्षक आरती कणिरे यांनी मंगळवेढ्याचा कार्यभार घेतल्यानंतर ३५ बेपत्ता असलेल्या मुलींनाही शोधण्यात यश मिळविले आहे. तपास शोध कामात पोलीस हवालदार श्रीराम ताटे, पोलिस अंमलदार राहुल सोनकर यांनीही परिश्रम घेतले.




## वटपौर्णिमा व पर्यावरण दिनानिमित्त वटवृक्षांसह देशी वृक्षांचे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

पर्यावरण दिन आणि वटपौर्णिमेचे औचित्य साधून युगंधर फाऊंडेशन व संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूरच्या एनसीसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मी बाग, डोणगाव रोड येथे देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. वाढते तापमान, हवामान बदल आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेऊन वृक्षलागवड व त्यांचे संगोपन करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमात भारताचा राष्ट्रीय वृक्ष वटवृक्ष यास विशेष महत्त्व देण्यात आले.

तसेच पिंपळ, करंज, आंबा, कडुलिंब आदी देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे दहा वटवृक्षांची लागवड लक्ष्मी बाग परिसरात करण्यात आली. कार्यक्रमात संगमेश्वर महाविद्यालयाच्या एनसीसी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. तसेच युगंधर फाऊंडेशनच्या खजिनदार सुप्रिया माने-साबळे, सिद्धार्थ साबळे, फाऊंडेशनचे मार्गदर्शक श्रीकृष्ण माने, रत्नमाला माने, जीवक पालखे उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## निंबाळकर अध्यापक विद्यालयात उकिरडे यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**बार्शी दि. ३० जून-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी येथे दि. २७ जून रोजी राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. प्रमुख व्याख्याते म्हणून पुणे विभाग एस.एस.सी. बोर्ड अध्यक्ष औदुंबर उकिरडे हे होते. अध्यक्षस्थानी अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड हे होते. प्रास्ताविक डॉ. जे. बी. जळकुटे यांनी केले. उकिरडे यांनी अध्यापक विद्यालयाचे व उपक्रमांचे कौतुक केले. स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. गुणवत्तेला समाजात अजूनही किंमत आहे. कौशल्य आत्मसात करावीत. ग्रामीण भागातील मुले ही कोणत्याही कोचिंग क्लास शिवाय यश मिळवू शकतात, असे सांगितले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जे. पी. गायकवाड यांनी केले. आभार डॉ. उलभगत यांनी मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते.



## ‘तिमिर छेदताना’ला राजर्षी शाहू महाराज साहित्यकृती पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. ३० जून-**

राजर्षी शाहू छत्रपती महाराज जयंतीनिमित्त येथील लेखक सचिन वायकुळे लिखित तिमिर छेदताना या चरित्र ग्रंथाला पुण्यातील राजर्षी शाहू महाराज प्रेरणादायी साहित्यकृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. राजर्षी शाहू मल्टीपर्पज फाउंडेशन, सर्किट बेंच फाउंडेशन व शांतिदूत परिवार महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने देण्यात येणारा हा प्रेरणादायी साहित्यकृती पुरस्कार वितरण सोहळा पुण्यातील पत्रकार भवन येथे पार पडला. बार्शीचे लेखक वायकुळे यांनी ‘‘तिमिर छेदताना‘‘ या ग्रंथातून एका अनाथ व्यक्तीच्या यशस्वी जीवन चरित्राचा वेध घेतला आहे. त्याच्या सामाजिक जाणीव, संघर्ष, जिद्द आणि यशाचा प्रेरणादायी प्रवास प्रभावीपणे मांडला आहे. साहित्याच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार रुजविणारे आणि प्रेरणा देणारे लेखन केल्याबद्दल वायकुळे यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान आला. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित राहत खासदार प्रा. डॉ.ज्योती वाघमारे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी पद्मश्री उदय देशपांडे, सर्किट बेंच फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश राठोड, शांतिदूत परिवाराचे प्रमुख विठ्ठल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



## डोणगाव येथे महिलांनी घेतली वडाच्या संगोपनाची शपथ

**वैराग, दि. ३० जून-**

वटपौर्णिमेचे औचित्य साधून एकता महिला मंचच्या वतीने एक गाव - एक वडाचे झाड हा पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेतला आहे. उपक्रमांतर्गत डोणगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील मंचच्या सदस्यांना दोन दिवसांपूर्वीच वडाचे झाड सुपूर्द केले होते. आज दि. २९ जून रोजी वटपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर महिलांनी या वडाच्या झाडाचे भक्तीभावाने पूजन करून रोपण केले. तसेच त्याच्या संगोपनाची शपथही घेतली. याप्रसंगी एकता महिला मंचच्या पदाधिकारी सावित्री पाटील, प्रीती येरनाळे, संजीवनी शेळके आदींसह गावातील महिला उपस्थित होते.



## कारी येथे वटपौर्णिमेनिमित्त वडाच्या झाडाचे रोपण

**वैराग, दि. ३० जून-**

वटपौर्णिमेचे औचित्य साधून ‘एकता महिला मंच’ च्या वतीने बार्शी तालुक्यातील कारी येथील महिला सदस्यांना दोन दिवसांपूर्वी वडाचे झाड देण्यात आले होते. आज, दि. २९ जून रोजी वटपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर या झाडाचे भक्तीभावाने पूजन करून रोपण करण्यात आले. तसेच वृक्षाची वर्षभर रक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली. सोहळ्याप्रसंगी ‘एकता महिला मंच’च्या प्रमुख पदाधिकारी आणि सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये प्रामुख्याने स्वाती जोगदंडकर, प्रतिला जाधव, सुवर्णा व्हटकर, स्वाती व्हटकर, प्रियंका शिंदे, तनुजा कदम, अमृता माळी, सुलभा कदम, विजेता खरंगुळे, आशा वाघमारे आणि वंदना कदम या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

# वारकऱ्यांच्या ‘चरण सेवेला’ प्रारंभ

## शासनाचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे ‘चरण सेवा’ उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी




वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

### ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था आहे.

### गतवर्षी पावणेदोन वारकऱ्यांची थेट चरण सेवा

गतवर्षी राबविण्यात आलेल्या ‘चरण सेवा’ उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता.

### ८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती

शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश आदींबाबत माहिती ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोखत आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन आहे.

### आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम

‘भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची’ या संकल्पनेवर आधारित ‘चरण सेवा’ हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

# चंद्रभागेत पाण्यासाठी मुख्यमंत्र्यांना लिहिणार पत्र

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जून-**



आषाढी यात्रेत वारकऱ्यांना चांगले खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना बोलणार आहे. तसेच नदीपात्रात वेळेत पाणी सोडण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बोलणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले आहे.

आषाढी वारीच्या तयारीसंदर्भात रविवारी पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासनाची बैठक येथे पार पडली. बैठकीनंतर माध्यमांशी पालकमंत्र्यांनी संवाद साधला. त्यावेळी यात्रेच्या अनुषंगाने विविध विषयांवर पालकमंत्र्यांनी माहिती दिली.

आपण तुकाराम मुंडे यांच्याशी बोलणार असून आषाढी यात्रेत भाविकांना चांगले अन्नपदार्थ मिळावेत, अशा सूचना देणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. यात्रेसाठी चंद्रभागेत पाणी सोडण्यासाठी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे.

राज्यात जरी पाणीटंचाई असली तरी पालखी मार्गावर पाण्याची कमतरता नाही, असेही जयकुमार गोरे यांनी सांगितले. श्री विठ्ठल रुक्मिणी मुर्ती जतन आणि संवर्धनाच्या कामाचा विषय न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाने जतन आणि संवर्धनाच्या कामाला परवानगी द्यावी अशी आम्ही विनंती करणार आहोत. आषाढीपूर्वी परवानगी मिळाली तर ठिक अन्यथा आषाढीनंतर आम्ही मुर्तीच्या जतन,संवर्धनाचे काम सुरु करु असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

### मंदिर समितीच्या गैरव्यवहाराची चौकशी यात्रेनंतर

सध्या आषाढी यात्रेचे नियोजन सुरु आहे. यात्रा सुरळीत पार पडण्याची जबाबदारी आहे. आषाढी यात्रेनंतर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमधील कथित गैरव्यवहाराची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल, असे पालकमंत्री म्हणाले.

### कॉरिडॉरचे भूमिपूजन वारीनंतरच

पंढरपूर कॉरिडॉरला प्रशासकीय मंजुरी मिळाली असली तरी आषाढी वारी दरम्यान भूमिपूजन केले जाणार नाही. प्रथम बाधित मालमत्ताधारकांना योग्य मोबदला व पर्यायी व्यवस्था करुन त्यांचे समाधान केले जाईल. बाधितांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. कॉरिडॉरच काम जानेवारी पासून प्रत्यक्षात सुरु करणार आहे. पुढील वर्षीची आषाढी यात्रा कॉरिडॉरनंतरच्या पंढरपूरमध्ये भरणार आहे असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.



# सांगोला आगारास पाच नवीन एसटी बस मंजूर

### आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० जून-**

सांगोलाचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सांगोला आगारास पाच नवीन एसटी बस मंजूर झाल्या आहेत. त्या पुढील आठवड्यात सांगोल्यात दाखल होत आहेत.

सांगोला आगार हा सोलापूर-सांगली महामार्गावरील महत्त्वाचा आगार आहे. येथून दररोज अनेक गावांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि जिल्ह्यांमध्ये प्रवासी वाहतूक सुरू असते. मात्र, बसांची संख्या अपुरी पडल्याने प्रवाशांना अनेकदा गैरसोय सहन करावी लागत होती. या पार्श्वभूमीवर आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. नवीन बस मंजूर करून घेतल्याबद्दल आगारप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे आभार मानले.

यावेळी बोलताना आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले की, येत्या काळात आणखी बस आणि नवीन मार्गांसाठी प्रयत्न सुरू आहेत. जनतेला चांगली सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी सतत प्रयत्न चालूच राहतील. नवीन बस मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आ. देशमुख यांनी आभार मानले.



## राजेंद्र टाकणे यांनी घेतला ‘डीवायएसपी’चा पदभार

**अक्कलकोट दि. ३० जून-**

विभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोटचा पदभार राजेंद्र टाकणे यांनी घेतला. शिवसेना सोलापूर जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी विभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे यांचा पुष्पहार पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ डिजिटल मिडीया सोलापूर लोकसभा जिल्हाध्यक्ष राजेश जगताप, सपोनि दत्तात्रय घंटे, धनराज शिंदे, चिदानंद उपाध्ये आदी उपस्थित होते.

# अजित पवार यांच्या पाचव्या मासिकानिमित्त गरजू मुलींना सायकल वाटप



### राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ जून -**

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाचव्या मासिकानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांच्यातर्फे गरीब व गरजू मुलींना सायकल व एक हजार वह्यांचे वाटप केले. पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या हस्ते व युवा नेते प्रणव परिचारक यांच्या प्रमुख उपस्थितीत यशवंत विद्यालय पंढरपूर येथे हा कार्यक्रम झाला.

नगरसेवक संजय बंदपट्टे, निखिल परचंडे, गणेश आधटराव, विजय अभंगराव, बाबा चव्हाण, दत्ता भोसले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष मुहम्मद उस्ताद, दिलीप कोरके, अमोल परबत, सारंग महामुनी, युवराज मुचलंबे, प्रदीप तांदळे, पंकज पवार, विकी अभंगराव, ऋषिकेश रायबान आदी उपस्थित होते.संघटनेतर्फे आजपर्यंत पंढरपूर शहरातील लिंक रोड येथील डिव्हाडरमध्ये वृक्षारोपण, जेष्ठ नागरिकांना वाचनालय, बालकाश्रम येथे अन्नदान आदी कार्यक्रम राबवले आहेत.

मुख्याधिकारी महेश रोकडे म्हणाले की, अजित पवारांच्या जाण्याने निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी न भरुन येणारी आहे. प्रणव परिचारक यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा देत पंढरपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कामाचा

# स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी लागू केल्यास शेतकरी कर्जमुक्त : सातपुते

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३० जून-**

अखिल भारतीय किसान सभा शेतकरी संघर्ष समिती यांच्यावतीने शेतकऱ्यांचा भव्य मेळावा बार्शीत उत्साहात पार पडला. यावेळी मंचावर भारतीय किसान समेचे राज्य सेक्रेटरी बन्ती सातपुते, बाळासाहेब पाटील, मेळाव्याचे अध्यक्ष कॉम्रेड लक्ष्मण घाडगे, निमंत्रक कॉ. अनिरुद्ध नखाते उपस्थित होते.

अखिल भारतीय किसान सभेचे राज्य नेते कॉ. बन्सी सातपुते म्हणाले, शेतकयाला कर्जमाफी नको तर कर्जमुक्ती हवी आहे. शेतीमालाला हमीभाव व स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी देशाभरात लागू केल्यास शेतकरी कर्जमुक्ती होऊ शकतो.

शेतकऱ्यांनी राजकारण, धर्म, जात, पंथ बाजूला ठेवून आपल्या बापाने जपलेली काळीआई जपण्यासाठी व आपल्या न्याय




हक्कासाठी पुढील काळामध्ये शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या लालबावट्यासोबत शेतकयांनी संघटित व्हावे व संघर्ष करावा.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना बाळासाहेब पाटील म्हणाले, शेतकऱ्यांचा लढा हा कडवट सरकार विरोधात आहे. आपण जातीच्या प्रश्नावर एकत्र येतो परंतु शेतक-यांच्या प्रश्नावर एकत्र येत नाहीत. सरकार अदानी अंबानीचे भले करण्यासाठी सत्तेवर बसले आहे. मेळाव्यामध्ये ठराव करुन पुढील आंदोलनासाठी मागण्या केल्या आहेत. सर्व शेतकयांची सर्व प्रकारची विनाअट पूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे. या कर्जमाफीमध्ये मायक्रोफायनान्स (एमएफआय) सर्व स्वयंमदत बचतगट व खाजगी हे सर्व कर्ज माफ झाले पाहिजे यासह अन्य मागण्या करण्यात आल्या.

यावेळी रमेश भोईटे, सरपंच वडाचीवाडी, लक्ष्मण घाडगे, अनिरुद्ध नखाते, हरी पवार, मार्तंडआबा जगताप, बाळासाहेब शिंदे, राजू ढेंबरे, रमेश पिंगळे, सुभाष पिंगळे, लहू आगलावे, जावेद पठाण बाळासाहेब जगदाळे, शेषराव जगदाळे, बाळासाहेब ओव्हाळ, काका मुळे, रवींद्र उबाळे, लक्ष्मण गव्हाणे, दिलीप कदम, हरिदास शिंदे, परमेवर पाचले, धनाजी पवार, भागवत डोईफोडे, राजा चव्हाण, प्रविण मस्तुद उपस्थित होते.



## माळशिरस शहर व परिसरात वटपौर्णिमा साजरी

**माळशिरस, दि. ३० जून-**

माळशिरस शहर व परिसरात महिलांनी वटपौर्णिमा हा सण साजरा करण्यात आला. हिंदू धर्मात वटपौर्णिमा हा सण महिला मोठ्या उत्साहात साजरा करतात. जेष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा करण्यात येतो. सौभाग्यवती महिला आपल्या पतीला उत्तम आयुष्य व उत्तम आरोग्य लाभण्यासाठी हे व्रत करतात. महिला वडाच्या झाडाची पूजा करतात. वड हा वृक्ष दिर्घायुषी असल्याने वृक्षाचे संवर्धन व जतन व्हावे या हेतूने या वडाच्या झाडाची पूजा करण्याची परंपरा आजही टिकून आहे.आज या वडाची पूजा करण्यासाठी महिलांनी श्रीनाथनगरमधील वडाच्या झाडाच्या ठिकाणी गर्दी केल्याचे दिसून आले.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी नवनाथ गुल्हाने

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.३० जून-**

रोटरी क्लब या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या बार्शी शाखेच्या अध्यक्षपदी रोटेरियन नवनाथ गुल्हाने यांची सन २०२६-२७ या वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष म्हणून त्यांचा कार्यकाळ १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ असा राहणार आहे. या कालावधीत ते रोटरी क्लब ऑफ बार्शीच्या विविध सेवा व सामाजिक उपक्रमांचे नेतृत्व करणार आहेत.



रोटेरियन नवनाथ गुल्हाने हे महाराष्ट्र क्लासेस, बार्शीचे संचालक असून गेल्या अनेक वर्षांपासून ते शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शणि शैक्षणिक प्रबोधनासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश संपादन केले आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना रोटेरियन नवनाथ गुल्हाने यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, युवक विकास आणि समाजोपयोगी सेवा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा मानस व्यक्त केला.



### महत्त्वाचे...



### वटपौर्णिमेनिमित्त एकता मंचचा खेडभाळवणी येथे कार्यक्रम

**वैराग, दि. ३० जून -**

वटपौर्णिमेनिमित्त एकता महिला मंचच्या वतीने एक गाव -एक वडाचे झाड हा उपक्रम हाती घतला आहे. उपक्रमांतर्गत पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथे महिलांनी वडाच्या झाडाचे भक्तीभावाने पूजन करून रोपण केले. झाडाचे संगोपन करण्याची सामूहिक शपथही घेतली. मीनाक्षी साळूंखे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्वाती साळुंखे, सुरेखा साळुंखे. साधना साळुंखे,धनश्री साळुंखे, कविता साळुंखे, रुक्मिणी साळुंखे, राणी साळुंखे, सुनिता साळुंखे, लक्ष्मी साळुंखे उपस्थित होते.



### श्री स्वामी समर्थ हॉस्पिटलतर्फे तीर्थ येथे वृक्षारोपण

**श्रीक्षेत्र तीर्थ, दि. ३० जून-**

श्री स्वामी समर्थ मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अक्कलकोट यांच्या सौजन्याने डॉ.संदीप इंगळे (ऑर्थोपेडिक सर्जन), प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, काशिनाथ बिराजदार, सधनशील शेतकरी संतोष वळसंगे, रामणा रोडगे, श्रीशैल पावले , गुरुशांत फताटे यांच्या उपस्थितीत ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर देवस्थान परिसर, जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा तसेच श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुल येथे १०० रोपाचे वृक्षारोपण केले. यावेळी डॉ.संदीप इंगळे यांनी आमच्या हॉस्पिटलकडून १०० रोपे श्रीक्षेत्र तीर्थ या ठिकाणी लागवड करण्याचे सौभाग्य मला लाभले यांची आनंद असल्याची भावना व्यक्त केली. सूत्रसंचालन श्रीशैल पावले यांनी केले.



### जगदीश कदम यांच्या महामार्ग कथासंग्रहाचे प्रकाशन

**सांगोला, दि. ३० जून-**

पणजी येथील इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात कथालेखक जगदीश कदम यांच्या महामार्ग या कथासंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी डॉ.गोविंद काजरेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष लेखक दशरथ परब, समीक्षक डॉ.अनिल काळबांडे, रानकवी श्रीनिवास मस्के उपस्थित होते. हा ग्रंथ प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी बंडू झळके, सतीश भोसले यांनी परिश्रम घेतले. आभार कवी संतोष चिले यांनी मानले.

### सांगोल्यात पेरणीयोग्य पाऊस; बळीराजा सुखावला

**सांगोला, दि. ३० जून-**

जूनच्या पहिल्या आठवड्यापासून पेरणीसाठी प्रतीक्षेत असलेल्या सांगोला व परिसरातील शेतकऱ्यांना पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच या पावसामुळे उन्हाच्या आणि उकाड्याच्या त्रासापासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पेरणीयोग्य पाऊस झाल्यामुळे शेतीच्या कामांना वेग येणार असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या पावसामुळे सांगोला परिसरातील निसर्गाला नवीन संजीवनी मिळाली असून नागरिकांमधून आनंद व्यक्त होत आहे. सदर पावसामुळे ऊस, डाळिंब, मका या पिकांना फायदा झाला असून सूर्यफूल व बाजरी या पिकांची पेरणी करण्यासाठी पेरणीयोग्य पाऊस झाली असल्याची प्रतिक्रिया सांगोला शहरातील गावडे वस्ती येथील प्रगतशील शेतकरी सुनील प्रकाश गावडे यांनी दिली.

### कृषी दिनानिमित्त आज जि.प.मध्ये कार्यक्रम

**सोलापूर, दि. ३० जून-**

कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा व जिल्हा परिषदेचा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त बुधवार, १ जुलै रोजी सकाळी १० वाजता जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषी दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असून, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कृषी समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी व कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी केले आहे.

# आषाढीसाठी १६ हजार गॅस सिलेंडरची व्यवस्था

## २६ गावात राहणार पालख्यांचा मुक्काम; प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो वारकरी याची दिंड्यांद्वारे भाविक चालत येतात. त्यांना मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने तब्बल १६ हजार गॅस सिलेंडरची सोय केल्याची माहिती प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी खास दैनिक तरूण भारतशी बोलताना आज (दि. ३०) दिली.

दिंडीतून आलेल्या भाविकांना दर्शन कमी वेळेत व सुलभपणे व्हावे यासाठी १० जुलै पासून व्हीआयपी दर्शन बंद तसेच मंदिर परिसरात नो वेहिकल झोन करण्याचा निर्णय जिल्हा



प्रशासनाने घेतला आहे. याच धर्तीवर पंढरीत आषाढी एकादशीनिमित्त येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना स्वयंपाकासाठी व इतर पेय पदार्थ निर्माण करण्यासाठी गॅस सिलेंडरची गरज असते. गतवर्षी याच दिंडीतील वारकऱ्यांना १४ हजार ९०० गॅस

#### ११ पथके तैनात

इतकेच नाहीतर यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुरवठा विभागाच्या ५० कर्मचाऱ्यांची ११ पथके तैनात केली आहेत. या पुरवठ्याची जबाबदारी जिल्ह्यात ३ गॅस कंपन्यांना आणि २२ एजन्सींना दिली आहे. आलेल्या मानाच्या पालख्यांचा जिल्ह्यातील जवळपास २६ गावात मुक्काम असतो. या मुक्कामाच्या ठिकाणी आमचे कर्मचारी गॅसचा मागणी तसा पुरवठा करणार आहेत. रॉकेलची पूर्वी सोय व्हायची मात्र आता कोणाकडेही स्टोव्ह नसल्याने केरोसीनची कोणीही मागणी केली नसल्याचीही माहिती पडोळे यांनी दिली.



सिलेंडरची सोय केली होती. यंदा यामध्ये ११०० ने वाढ करून १६ हजार गॅस सिलेंडरची सोय केली आहे. वारकऱ्यांना गॅस जोडणी करून देण्यासाठी आणि बिघडलेला सिलेंडर-शेगडी दुरूस्ती करून देण्यासाठी १ मेकॅनिक टीम तयार आहे.

यंदा पाऊस उशिराने पडला असला तरी लगबगीने पेरणी उरकून राज्यातील बळीराजा, तमाम वारकरी आणि इतरही अनेक नागरिकांची पाऊले पंढरीच्या वाटेकडे पडणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही लाखो भावीक पंढरीत दाखल होणार आहेत. यातील अनेक भावीक दर्शनरांगेत कितीही वेळ लागला तरी श्रींच्या चरणाचे दर्शन घेतात आणि आपली गाऱ्हाणी पांडुरंगाला सांगतात आणि मगच आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात.आषाढी सोहळ्यासाठी आता देश-विदेशातूनही भाविक येत आहेत. यामुळे या वारीला वेगळेच महत्व प्राप्त होत आहे. या वारकऱ्यांसाठी एसटी विभाग, वीज कंपनीप्रमाणेच जिल्हा पुरवठा विभागाचे अधिकारी-कर्मचारी काम करतील, असा आशावादही जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी व्यक्त केला.

## कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी तालुकास्तरीय समित्या गठीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर केली आहे. या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे व जलदगतीने करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्या आदेशानुसार तालुकास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली.

तालुकास्तरीय समितीमध्ये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था हे अध्यक्ष म्हणून, तालुका लेखापरीक्षक/उपलेखापरीक्षक व तालुका समन्वयक गटसचिव हे सदस्य म्हणून तर सिनिअर बँक इन्स्पेक्टर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहणार आहेत. या समितीच्या माध्यमातून योजनेची अंमलबजावणी पारदर्शक पद्धतीने होणार आहे. समितीचे कामकाजात ३१ मार्च पर्यंतचे सर्व रेकॉर्ड अद्ययावत करणे, माहिती अचूक भरणा करून सादर करणे, पात्र शेतकऱ्यांचे आधार कार्ड, फार्मर आयडी, सेव्हींग खाते क्रमांक व कर्जरोखा तपासणीवेळी उपलब्ध करणे, नियुक्त लेखापरीक्षकांना आवश्यक दप्तर उपलब्ध करून देणे, वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणे तसेच कोणताही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणे यांचा समावेश आहे.

# ६ इंचापर्यंतची ओल पाहूनच पेरणी करा

### जिल्ह्याला यलो अलर्ट मात्र पाऊस गायब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात सोमवारी जोरदार पाऊस झाला असून, सध्याही सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील विविध जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. मात्र पाऊसधारा बरसत नसल्याने शेतकरी चिंतातूर आहे. जिल्ह्यात आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने सोमवारी जोरदार सलामी दिल्याने जिल्ह्यातील काही तालुक्यात चांगली ओल गेली मात्र काही तालुक्यात अजूनही पाऊस कमीच असल्याने त्या भागातील शेतकऱ्यांनी ६ इंची म्हणजेच अर्धा फूट ओल गेली का पाहूनच खरिपाची पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

रविवारी सायंकाळी शहर आणि

#### जून महिन्यात पडलेला तालुकानिहाय पाऊस

उत्तर सोलापूर ६५.०३ मिमी, द. सोलापूर ९३.०, बार्शी ८२.५, अक्कलकोट ८०.३, मोहोळ ७२.१, माढा ६४.५, करमाळा १०६.२, पंढरपूर ६८.८, सांगोला १०१.०, माळशिरस ९६.०९, मंगळवेढा ७४.१ असा जिल्हाभरात सरासरी ८२.९ मिमी पाऊस नोंदला गेला आहे. दरम्यान, ६ इंचाची ओल गेल्यावरच म्हणजेच ७५ ते १०० मिलीमीटर पाऊस पडल्याशिवाय पेरणी करू नये, असे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आले होते; त्यानुसार ज्या भागात ओल गेली आहे, अशा शेतकरी बांधवांनी आता जमिनीचा वापसा होताच पेरणी करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.



जिल्ह्याच्या विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली.

हवामान विभागाकडून राज्यातील काही जिल्ह्यांना ऑरेंज तर कही जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

एकंदरीत, पाऊस सुरू झाल्याने सध्या शेतकरी बांधवांत समाधानाचे वातावरण दिसून येत आहे. या हंगामात सोयाबीन, मका, कापूस, उडीद, मूग, सोयाबीन आदी पिके शेतकरी बांधव घेत असतात. जिल्ह्यातील अनेक प्रगतशील शेतकऱ्यांनी एप्रिलमध्येच बि-बियाणे, खतांची सांगड घालून ठेवली आहे. आता पाऊसधारा पडत असल्याने बळीराजात समाधानाचे वातावरण आहे.

## विवाहितेच्या विनयभंगप्रकरणी दोन आरोपींची शिक्षा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जून -**

मंगळवेढा तालुक्यातील भाळवणी येथील विवाहितेच्या घरात प्रवेश करून विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी बिभीषण पाटील व गोरख पाटील (रा.भाळवणी) यांची शिक्षा पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने कायम ठेवली आहे.

सदर घटनेप्रकरणी मंगळवेढा येथील न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग यांनी दोन्ही आरोपींना दोषी धरून एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा व द्रव्य दंडाची शिक्षा सुनावलेली होती. शिक्षेबाबत आरोपींनी पंढरपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल केलेले होते. सदर अपिल ओंकार देशमुख अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश पंढरपूर यांनी नामंजूर करून खालील न्यायालयात झालेली शिक्षा कायम केली. आरोपी पक्षाने असा युक्तिवाद केला की, आरोपींना खोटेपणाने केस मध्ये गुंतवले आहे. पीडित व तिचे पती बेकायदेशीररित्या इलेक्ट्रिक कनेक्शन घेत होते. त्याला आरोपींचा विरोध होता त्यामुळे पीडित व तिचे पती आरोपींवर चिडून होते.

घटनेदिवशी आरोपी एका मयताच्या अंत्यविधीसाठी गेले होते. ते घटनास्थळी हजर नव्हते, त्यामुळे घटनेशी आरोपींचा संबंध नाही. त्यामुळे शिक्षा रद्द करण्याचरी विनंती केली. त्यानुसार अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने मंगळवेढा न्यायालयात पीडिता व साक्षीदार यांचा झालेले एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करून आरोपींचे अपील नामंजूर केले.

सरकार पक्षातर्फे सारंग वांगीकर यांनी काम पाहिले तर मंगळवेढा पोलिस स्टेशनतर्फे कोर्ट पैरवी म्हणून एम. आर. मुलाणी कार्यरत होते.

### बाथरूममध्ये पाय घसरून पडलेल्या इसमाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

बाथरूम मध्ये पाय घसरून पडलेल्या गुंजेगाव येथील एका ६६ वर्षीय वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी सकाळी सहा वाजता मृत्यू झाला. शिवाजी लिंबा सलगर (वय ६६ वर्ष, रा. गुंजेगाव, दक्षिण सोलापूर असे त्या मयत इसमाचे नाव असून ते २५ जून रोजी सकाळी राहत्या घरात बाथरूम मध्ये पाय घसरून पडले होते .यात जखमी झाल्याने त्यांना येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान आज सोमवारी सकाळी सहा वाजता मृत्यू झाला .

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा संयम संपला

### ६ जुलैपासून जिल्हा परिषदेसमोर बेमुदत उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जून-**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सेवा व आर्थिक मागण्यांकडे प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधूनही ठोस निर्णय होत नसल्याने अखेर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा संयम संपला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद कामगार युनियनच्या वतीने सोमवार, ६ जुलै पासून जिल्हा परिषद येथे बेमुदत उपोषण व धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

युनियनचे प्रदेशाध्यक्ष मोहन लामकाने आणि प्रदेश सरचिटणीस दिलीप जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शासनाच्या विविध आदेशांची ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे हजारो ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना आर्थिक व सेवाविषयक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. संघटनेने निवेदनात थकीत वेतन, २५ व ५० टक्के वेतनाचा प्रश्न, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी (पीएफ), उपदान, अपघाती विमा, अनुकंपा नियुक्ती, कोविड काळातील २३ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता, सेवानिवृत्तीचे वय वाढविणे, वेतन प्रणालीतील त्रुटी दूर करणे तसेच शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी यासह १८ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.

यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष अरुण सुर्वे, राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष दोरकर, जिल्हा सचिव बालाजी पवार, अमोल मोरे, लिंबाजी काकडे, पांडुरंग खरात, विजय आरबळे, अमोल बोराडे, संगप्पा संगशेट्टी, बाबासाहेब निमगिरे, नागेश लोंढे, संग्राम नागणे, नितीन सावंत, गुरुबा भोसले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्येही अन्न व औषध विभागाची विशेष तपासणी

## जिल्हा अन्न व औषध खाते अलर्ट मोडवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जून-**

अन्न औषध प्रशासन, म. राज्य, सोलापूर कार्यालयातील सहायक आयुक्त (अन्न), सा. ए. देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी उ. मु. एखंडे व सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी अक्कलकोट शहरामध्ये श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील अन्न व्यावसायिकांची एकुण २३ तपासण्या केलेल्या आहेत. तसेच पेढा व बर्फीचे ३ नमूने घेण्यात आलेले असून, सदर नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत. एकंदरीत, या महिन्यात अन्न व औषध विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अवघ्या जिल्ह्यातच अन्नात भेसळ करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यास सुरूवात केल्याने जिल्ह्यातील नागरिकांतून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### तब्बल १६०० जणांची खाद्य व्यावसायिक प्रमाणपत्रासाठी नोंदणी

येथील अन्न व औषध प्रशासन विभागात सध्या खाद्यपदार्थ व औषध विक्रेत्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. कायमच शांत असलेल्या या विभागात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हालचालीही वाढल्या आहेत. यापूर्वी वर्षभरात सुमारे एक हजार खाद्य व्यावसायिक नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करत असत. गेल्या अवघ्या एकाच महिन्यात ही संख्या १६००च्या वर पोहोचली आहे. परवाना व नोंदणी नसलेल्या आस्थापनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याने मागील ३० दिवसांत १,५०० लघु खाद्य व्यावसायिक आणि १०० मोठ्या खाद्य व्यावसायिकांनी नोंदणी प्रमाणपत्रासाठी जिल्हा अन्न व औषध प्रशासनाकडे अर्ज दाखल करण्यात झाले आहेत.

**- साहेबराव देसाई, सहायक आयुक्त, अन्न सुरक्षा प्रशासन**

अक्कलकोट नगरीमध्ये अन्न व्यावसायिकांच्या ३० तपासण्या करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी १३ अन्न व्यावसायिकांविरुध्द कलम ६९ नुसार तडजोड प्रकरणे दाखल करुन एकुण रु. १६०००/- दंड आकारण्यात आला असून, तो शासनखाती जमा करण्यात आला आहे. तसेच २ पेढींना सुधारणा नोटीस पाठविण्यात आल्याचीही माहिती सहाय्यक आयुक्त देसाई यांनी दिली आहे. इतकेच नाहीतर या पुढे देखील गोपनीय माहितीच्या आधारे अक्कलकोटमध्ये अन्न आस्थापनांची विशेषत हॉटेल, कॅन्टीन, रेस्टॉरंट व इतर आस्थापना यांची विशेष तपासणी करण्यात येणार आहे. अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांचे नियमांचे पालन करावे, तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायदामधील नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तपासणीवेळी आढळून आल्यास योग्य ती कारवाई घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी, असे आवाहन देसाई यांनी केले आहे.

राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी धडाकेबाज आदेश काढताच सोलापूरचे अन्न व भेसळ कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी खडबडून जागे झाले आणि त्यांनी अवघ्या एकाच महिन्यात जिल्ह्यातील विविध ठिकाणी छापे टाकून कोट्यवधींचा भेसळ माल हस्तगत केला आहे. दरम्यान, आषाढी वारीतही या विभागाकडून विविध पथके स्थापन केली असून, मायक्रोप्लॅनिंग करण्यात आले आहे. अन्न आणि औषध प्रशासनाकडून राज्यभरात धाडसत्र सुरु आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाला हानी होईल, असं खाद्य पदार्थ विकणाऱ्या हॉटेल, मिठाईचे दुकाने यांच्यावर मोठी कारवाई होत आहे.